ई साहित्य प्रतिष्ठान®

# वैशाचा पाऊस. . .

सुषमा कृष्णा जाधव

# पैशाचा पाऊस

सुषमा जाधव

ई साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नाव : पैशांचा पाऊस

प्रकार : कादंबरी

लेखिका : सुषमा कृष्णा जाधव

पत्ता : ५/२०१, गुरुशरणम कॉम्प्लेक्स, विश्राळी नाका,

रायगड बाजार रोड, जुने पनवेल, जिल्हा - रायगड, पिन-४१०२०६

फोन नंबर - ८६५२५४७७६९

मुखपृष्ठ. अंतर्गत सजावट :

Last Bench Design

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

www.esahity.com

9869674820

©esahity Pratishthan® 2013

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

• या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक. सिनेमा. सिरियल. स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान ही कवी, लेखक व वाचकांनी मिळून चालवलेली चळवळ आहे. नवीन उदयोन्मुख लेखकांसाठी हे व्यासपीठ आहे, आणि खेडोपाडी व देशोदेशी पसरलेल्या मराठी वाचकांसाठी वाचनाचे साधन आहे. ई पुस्तके. आता स्मार्टफ़ोनवर डाऊनलोड करून वाचता येतात. आपण या चळवळीचे भाग होऊ शकता. आपल्या ओळखीच्या लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांनाही विनामूल्य ई पुस्तके पाठवू. नवीन वाचक आणि नवीन लेखकांचे या चळवळीत स्वागत आहे

ही कादंबरी काल्पनिक नाही. पूर्णतः सत्य, वास्तव घटनांवर आधारित आहे. परंतू या कादंबरीतील सर्व व्यक्ती, स्थळे व प्रसंग या पूर्णतः काल्पनिक असून त्यातील कोणाचेही जिवंत वा मृत व्यक्तींशी साम्य आढळल्यास तो पूर्णतः योगायोग मानावा.

अर्पण पत्रिका

समाजातील सर्व शोषित स्त्रियांच्या सन्मानार्थ समर्पित. ही कादंबरी वाचून थोडी जरी जनजागृती झाली तर मी माझ्या कादंबरी लिहिण्याचे सार्थक झाले असे समजेन .

------------------------------सुषमा जाधव

गटारनाल्यात न्हाणारे नागवे पोर

डुबक्यांवर डुबक्या घेते मजेत हसत

मी रस्त्याने जाताना बघतो सांस्कृतिक शहारून

तेव्हा माझ्या मनगटावरच्या शॉकप्रुफ़ घड्याळात

असतात वाजलेले पावणेआठ.

समस्त मानवांच्या घड्याळांत पावणेआठ.

मंगेश पाडगांवकर

(सलाम)

THE TIMES OF INDIA | Mumbai

# Sindhudurg murder mystery solved

TNN Dec 23, 2003, 01.40am IST

THANE: Four of the seven bodies found in the jungles in Sindhudurg district have been identified as those of a Navi Mumbai family who were duped by a trio acting as go-betweens for fake tantriks, said the Vashi police on Monday.

The police have arrested the three men, Santosh Chawan, Yogesh Chawan and Amit Shinde for duping and killing the seven people. The victims were apparently promised that currency notes would rain down on them.

December 28, 2013 7:16:30 PM IST

साप्ताहिक सकाळ

# अंधश्रद्धेपोटी केला माय - लेकराचा खून

Saturday, July 13, 2013 AT 05:48 PM (IST)
सकाळ साप्ताहिक

**गुप्तधन, पुत्रप्राप्ती वगैरे कारणांसाठी नरबळी, हा प्रकार महाराष्ट्रात नवीन नाही. अगदी नित्यनेमाने असे प्रकार होत नसले, तरी ते अगदीच थांबलेलेही नाहीत. अशा काही गाजलेल्या प्रकरणांत पोलिसांनी केलेला तपास.**

अंधश्रद्धा कोणत्या थराला जाईल हे सांगता येत नाही. स्वार्थ खूप मोठा असतो आणि त्यापलीकडे अंधश्रद्धा असते; ती मित्रत्व, माणुसकी सारे विसरायला लावते. अंधश्रद्धेतून माणसांचे जीव घेणाऱ्यांना आपण काय करतो आहोत, हे कधीच कळत नाही. ते केवळ स्वार्थासाठी खून करत असतात. हे भयावह आहे.
मायलेकांचे खून केल्यानंतर ज्या ठिकाणी खून करशील तिथे पैशाचे लाल गाठोडे मिळेल, असे एका मांत्रिकाने सांगितल्यानंतर एका तरुणाने हे कृत्य केले. सुनील बबन पाचंगे (वय 28, रा. दापोडी, सध्या. रा. चाकण, ता. खेड) या तरुणाने आपला मित्र धनंजय राजू जगताप (वय 22) याचा लोणावळ्याजवळील खंडाळा येथे अष्टमीच्या दिवशी ता. 18 एप्रिल रोजी डोक्यात कोयत्याने वार करून, डोक्यात दगड घालून चेहरा विद्रुप करून रात्री बाराच्या सुमारास खून केला. त्यानंतर धनंजयची आई श्रीमती दुर्गाबाई राजू जगताप (वय 55) हिचा ता. 21 एप्रिल रोजी दशमीला चाकण-शिक्रापूर रस्त्यावरील साबळेवाडी (ता. खेड) येथे रात्री बाराच्या सुमारास चाकूने गळा चिरून त्यानंतर विहिरीत ढकलून देऊन खून केला. आईचा खून पूर्वेला व मुलाचा खून पश्चिमेला करण्यात आला. दोन दिशेला योग्य तिथीला तसेच रात्री बाराच्या सुमारास खून केल्यानंतर त्या ठिकाणी पैशाचा पाऊस पडेल, पैशाचे लाल गाठोडे मिळेल या अंधश्रद्धेपोटी सुनील पाचंगे याने या दोन मायलेकांचा बळी घेतला. या आरोपीला न्यायालय शिक्षा देईल; पण हकनाक गेलेल्या निष्पाप जीवांचा काय दोष होता?

बुधवार, २७ मे २००९

लोकसत्ता

लोकरंग प्रत्येक रविवारी | चतुरंग प्रत्येक शनिवारी

मुखपृष्ठ Leading International Marathi News Daily मुखपृष्ठ

(सविस्तर वृत्त)

**नांदोस हत्याकांड**

**चौघांना फाशी**

**सावंतवाडी, २६ मे/वार्ताहर**

पैशांचा पाऊस पाडण्याचा बनाव करून सिंधुदुर्ग
जिल्ह्यातील नांदोस येथे मुंबई, पुण्याच्या १०
जणांचा निर्घृण खून करणाऱ्या चार जणांना जिल्हा न्यायालयाने सोमवारी फाशीची शिक्षा ठोठावली, तर अन्य दोघाजणांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. मुख्य आरोपी संतोष मनोहर चव्हाण, अमित अशोक शिंदे, योगेश मधुकर चव्हाण या चौघांना न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली, तर प्रमुख आरोपीचा मामा सूर्यकांत अनंत कोरगांवकर व तानाजी सीताराम गावडे यांना सबळ पुराव्याअभावी निर्दोषमुक्त केले. विशेष सरकारी वकील ॲड. अजित भणगे यांनी ही माहिती दिली.

२९ सप्टेंबर ते २ नोव्हेंबर २००३ या कालावधीत हे खून झाले होते. बडोद्याच्या रामजी बाबासाठी काम करणारा रिक्षाचालक संतोष चव्हाण याने बक्कळ पैसा मिळत असल्याने रामजी बाबासाठी काम करण्याचे सोडून स्वत: संतोषबाबा बनला. मालाड येथे एक रिक्षाचालक म्हणून व्यवसाय करणाऱ्या संतोष याने पैशाचा पाऊस पाडण्याचे अनेकांना आमिष दाखविले. तीन लाख दिल्यास तीन कोटी रुपये मिळतील असा दावा केला. पैशाच्या लोभापायी अनेकजण अंधश्रद्धेचे बळी ठरले. त्यांनी संतोष व त्याच्या साथीदारांना पैसे दिले. हे पैसे परत देण्यासाठी त्यांनी तगादा लावला. शेवटी मालाड सोडून संतोष चव्हाण व त्याच्या साथीदारांनी मालवण-नांदोस गाठले. तेथे प्रत्येकाला बोलावून त्यांचा निर्घृण खून केला. मुंबईहून हेमनाथ ठाकरे आणि पुण्याहून शंकर सारंगे २९ सप्टेंबर २००३ रोजी सिंधुदुर्गात दाखल झाले. त्या दोघांनाही वेगवेगळ्या ठिकाणी त्यांनी नेले. प्रथम शंकर सारंगे याच्या मानेवर लोखंडी रॉड मारून खून केला, नंतर हेमनाथ ठाकरे याला पाण्यात बुडवून ठार मारले. पुण्याचे दादासाहेब दिनकर चव्हाण आणि विजयसिंह दुधे यांना ३० ऑक्टोबर २००३ रोजी ठार केले. त्यानंतर बदलापूरचे संजय गवारे व मुंबईचा बाळा मिशाळ यांचाही निर्घृण खून केला. पुणे येथील केरुभाऊ माळी, त्याची पत्नी अनिता व अल्पवयीन मुले राजेश व संजय यांचाही निर्दयी खून केला. पैशाचा पाऊस पाडणाऱ्या, अंधश्रद्धेचा बनाव करणाऱ्या आणि त्याला सहकार्य करणाऱ्यांनी १० जणांचा खून केला.



शब्दांना सत्याची धार
प्रहार



पहिले पान » तात्पर्य November 21, 2012 06:10:40 AM | Author प्रहार

# अतिधनलोभाचे बळी!

**शिक्षणाचे प्रमाण वाढत असूनही या शिक्षणाचा शेवटी उपयोग होतो काय, असा प्रश्न पडण्यासारख्या घटना समाजात नित्य घडत असतात. अलीकडे भानामती, अंगात येणे, नवसाला देव पावतो म्हणून नवस बोलणे, अशा प्रकारांना ऊत आला आहे.**



शिक्षणाचे प्रमाण वाढत असूनही या शिक्षणाचा शेवटी उपयोग होतो काय, असा प्रश्न पडण्यासारख्या घटना समाजात नित्य घडत असतात. अलीकडे भानामती, अंगात येणे, नवसाला देव पावतो म्हणून नवस बोलणे, अशा प्रकारांना ऊत आला आहे. माणसाला धनेषणा आणि पुत्रेषणा कधी स्वस्थ बसू देत नाहीत. लोक आपल्या पोटी मुलगा जन्माला यावा म्हणून वाटेल ते करायला तयार होतात. त्यात स्त्री-पुरुष असे दोघेही आघाडीवर असतात. समाजात पैशालाही अवाजवी प्रतिष्ठा दिली जाते. प्रत्येकाला आयुष्यात बक्कळ पैसा हवा असतो. ज्यांना चांगल्या मार्गाने भरपूर पैसा मिळतो, त्याला समाजात आदराचे स्थान असते; पण ज्यांना चांगल्या वा अवैध मार्गानीही पैसा मिळत नाही, ते लोक अघोरी मार्गाला लागतात. जादूटोणा, गुप्तधन किंवा करणी करून पैसा मिळवण्याचा ते प्रयत्न करतात. दुर्दैवाने अशा लोकांना पैसा मिळवून देण्याचे आमिष दाखवून अघोरी मार्गाचा रस्ता दाखवणा-या भामटय़ांचीही समाजात कमी नाही. अघोरी मार्गानी पैसा मिळतो, किंवा आहे तो पैसा दुप्पट होण्यावर ते विश्वास ठेवतात. अमक्या देवीला बोकड कापले की पैसा मिळतो, अंगठीत अमुक एक खडा बसवला की, अर्थप्राप्ती होते, तमुक देवाची वारी केली की, नोकरी मिळते, असे मानणारे लोक दररोज अनेक प्रकारचे विधी करीत असतात. अशा मार्गाला लागणा-यांमध्ये सुशिक्षितांचे प्रमाणही खूप मोठे आहे. त्यांचे अनुकरण अशिक्षित लोकांनी केले तर त्यांना तरी दोष कसा द्यायचा? एकूण काय, तर सगळा समाजच अशा अंधश्रद्धांच्या मागे लागलेला दिसत आहे. पैशाचा पाऊस पाडण्याच्या निमित्ताने पनवेलजवळ घडलेला प्रकारही अंगावर शहारे आणणारा आहे. येथे तंत्रविद्येचे कारण पुढे करून सोमवारी चौघांची हत्या करण्यात आली. पण हे खून नेमके कसे झाले, या चौघांना मारून कोणाच्या अंगणात पैशाचा पाऊस पडणार होता, याचा नेमका खुलासा अद्याप झालेला नाही. या प्रकरणात पकडण्यात आलेल्या मांत्रिकानेही फार काही स्पष्ट केलेले नाही. पण नोटांच्या पावसाची भुरळ पडलेल्या या सुशिक्षित तरुणांना असा पैशांचा पाऊस पडत नसतो हे कसे लक्षात आले नाही, ही नवलाची बाब आहे. असा पैशाचा पाऊस पाडता आला असता तर सरकारने नाशिकच्या नोटा छापण्याच्या प्रेसवर कोटय़वधी रुपये खर्च करायचे काय कारण होते? त्यासाठी सरकारने असाच एखादा मांत्रिक बोलावला असता किंवा जनतेलाच पैशाचा पाऊस पाडूनच ते वापरा, असे सांगितले असते. इतके साधे सूत्र न लक्षात येण्याएवढी समाजाची मती भ्रष्ट झाली आहे, याचे वैषम्य वाटते. आज पैशाच्या लोभामुळे माणसातील विवेकशक्ती संपत चालली आहे. आपण घेतलेल्या शिक्षणातून आपल्यावर चिकित्सा करण्याचा संस्कारच न झाल्याने असे प्रकार घडतात. समाजासाठी पनवेलचे हत्याकांड हा मोठा धडा आहे. शिवाय अशा ढोंगी साधू, बुवांचा शोध घेऊन त्यांच्यावर कारवाई करण्याची वेळ सरकारवर आली आहे. त्याबाबत सरकारने हयगय करू नये.


ई साहित्य प्रतिष्ठान®
वैशाचा
पाऊस. . .
सुषमा कृष्णा जाधव

_____1_____

रूप हळू हळू आकार घेत होतं... नको तिथे खचत होतं.. नको तिथे उभाऱ्या घेत होतं. कापड सगळं लपवायला कमी पडत होतं. मानेने छातीत घुसावं तरी किती?! अन शालीन शालीन म्हणून लोकांनी लाजवावं तरी किती? लोकांनी असं उचलून धरलं म्हटल्यावर किरण अजून कोमेजून जायची. घराबाहेर निघू नये असे वाटूनसुद्धा खोबऱ्याच्या वाटीसाठी किंवा असेच काही सटर फटर कामासाठी दिवसातून एकदा तरी झक मारत बाहेर निघायची. गिधाडं जणू वाटच बघत असायची. जिन्यात, गल्लीत, रस्त्यात... दुकानदारही लाळ गाळायचा सुटला नाही. मग ही अंग चोरट्यासारखे चोरत पुढून पाठी टाकलेला ओढणीचा पदर पाठून पुढे घ्यायला लागली. हे सोपं होतं. सुरक्षितही होतं. पुढून पाठीपेक्षा पाठून पुढे ओढणी घेणं. यौवनाची चिन्हे बेमालूम झाकली जायची. त्यावेळी तिला वाटायचं दुपट्टा जाळीदार जोर्जेटचा नसता तर किती बरं झालं असतं. किंवा आईने आपल्याला बाहेर पाठवूच नये, किंवा आपण सर्वात लहान का नाही? किंवा सर्वात महत्वाचे म्हणजे आपण मुलगीच का झालो? तेही देखणी!! आरश्यात बघायला हवे वाटायचं आणि नकोही! तारुण्य सुलभ भुते आत शिरायला लागली होती. आरश्यातल रुपडं बघितलं कि हरखून जायला व्हायचं. अनभिज्ञ स्पर्शाची ओढ हवीहवीशी वाटायची. मग जिन्यातला वाट अडवणारा जग्या आठवून ती पटकन आरश्यासमोरून दूर व्हायची. प्रेम आणि भीती एकत्र का नांदाव्यात? प्रेम म्हणजेच भीती असते काय? आपल्या आईलाही आबांबद्दल हेच वाटत असेल काय? रात्रीचा आबा आईला ओढायचा तेव्हा ती दचकून जागी व्हायची आणि चादर तोंडावर ओढून घेऊन कानात बोटे कोंबायची. तरीही आईचं वैतागणं धुसफुसणं बोटातून आत झिरपायचंच त्यावेळी आईला अशीच भीती वाटत असेल काय? जशी आपल्याला आत्ता वाटते. किरण आरश्यात बघत विचार करायची. आईलाही असेच जग्गे भेटले असतील. तीही सुंदर होती. मग ती आपल्याला का बाहेर पाठवते? तिला कळत नसेल काय? काय काय बरं नाही आवडून घ्यायचं आपण? आपल्याला तर सगळंच चांगलं आवडतं. वाईट कोणाला आवडेल? मग आपलं काय चुकतं? रस्त्यावरचे सिनेमे दाखवतात ते आवडतात. खुल्या चांदण्यांनी भरलेल्या आकाशाखाली बसून सिनेमा पहायची मज्जाच काही न्यारी असते. बायका एका बाजूला..पुरुष दुसऱ्या बाजूला. खूप सुरक्षित वाटायचं. पण घरी परतताना असं व्हायचं नाही. सर्व गर्दी ठरवून एकत्र झाल्यासारखी गडबडीने चालायची, त्यात वेग असायचा, जो तो का जी ती त्या गर्दीतून बाहेर पडायला बघायची. आणि एके दिवशी काखेतून एक हात खस्स्कन आत शिरला आणि

विजेच्या वेगाने तिने तो दूर करून घराकडे धूम ठोकली. आताही आठवून तिने दुपट्टा निट  कवटाळून घेतला. आणि पिशवी उचलून नाईलाजाने दुकानात निघाली.

_____XXX_____

_____2_____

मुसळधार पाऊस पडत होता. जूनचे अखेरचे दिवस असल्यामुळे आभाळ कसं गच्च भरलं होतं. वर बघताच वाटत होतं, हे आत्ता स्वत:चा भार असह्य होऊन धाडकन खाली कोसळेल. असं कोणतं भांडं असेल ज्यात आपण ह्याला हळूच गोळा करून घेऊ आणि एखादा मोठ्ठा खड्डा खोदून त्यात ह्याला रितं करू, जेणेकरून नेहमी आपल्याला मे महिन्यात भेडसावणारा पाण्याचा प्रश्न तर नाहीसा होईल. रोज कामावरून घामाने लडबडीत होऊन, ट्रेनच्या प्रवासात मिश्र वासांचे जंतू अंगावर चिटकवून घेत, रस्त्यावरून भुर्रदिशी पळणाऱ्या गाड्यांनी फेकलेल्या धुराळ्याचा लेप त्यावर लावत घरी येतो आणि मोठ्या उत्साहाने अंगावर आठवडाभर न धुतलेला टॉवेल घेत नळ खोलतो तर पाण्याऐवजी सॉंsss आवाजा पाठोपाठ उगाचच नाटकी रडणाऱ्या बाईसारखे दोन टिपं टाप टाप करीत बादलीचा कोरडा तळ ओला करतात. वैतागाने नळाची आई-बहिण काढत कसेतरी मडके तिरके करून चार दिवसांचं शिळं पाणी घशात रितं करतो. वासाने झोपही धड लागत नाही. सकाळी तीच तऱ्हा. ऑफिसात जाऊन बुड टेकवायलाही लाज वाटते. म्हनं साहेब आपण!! च्यायला कुठं नशीब झक मारीत होतं जेव्हा आपण पैदा झालो होतो. आईला पण आपल्याला पैदा करायला हाच टाईम गावला होता. असलं रंडकं नशीब कपाळी चिटकवून या भंगार जगात फेकण्यापेक्षा नख लावलं असतं तर मरणोत्परांतही तिचे पाय धुवून प्यायलो असतो.

आयला.. जन्मलो तेही भर पावसात, प्रेम केलं तेही भर पावसात, मुंबईला आलो तेही भर पावसात, नोकरीला लागलो तेही... हं.. तरीबी आपण कोरडेच कसे?!! न सुटणारे कोडे आहे राव. सोडवण्याच्या नसत्या फंदात पडू नका.. अधिकच गुंतून जाल. गुमान खाली मान घालून चालायचं.

आभाळ बरसतंय..बरसू दे. तुज्या बाचं काय जातंय लेका गिऱ्या. एकवार आकाशाकडे नजर टाकत गिरिधर खिन्नपणे हसला आणि हातातली छत्री नीट सावरून धरत स्टेशनच्या रोखाने चालायला लागला.

## ____3____

चर्चगेट रेल्वे स्थानकावर ही ssss गर्दी!! अबब!! केवढा हा कोलाहल!! किती हा माणसांचा लोंढा!! आत घुसायला देखील भीती वाटत होती. आपलं हे साठ किलोचं साडेपाच फुटी शरीर असं सहजासहजी त्यागर्दीच्या अक्राळ विक्राळ जबड्यात द्यायला त्याचं मन धजावत नव्हतं. गर्दी कमी होईल या आशेने उगाच इकडे तिकडे रेंगाळून परत गिरिधर स्टेशनवर आला. पण उलट गर्दी अधिकच वाढली होती. तिच्याकडे बघताना त्याचे डोळे चक्रावत होते. एवढी सगळी माणसं? ही नक्की कुठे जात असतील? ही सर्व जन्माला आली तेव्हा केवढा मोठा कोलाहल माजला असेल.. घाबरून त्यांच्या आयांनी कानच बंद केले असतील.. त्याच्या डोळ्यासमोर कवायतच उभी राहिली. स्वत:शीच हसत, मजेत शिळ घालत तो पुन्हा पाठी फिरून समुद्राच्या दिशेने चालू लागला.

कट्टा फुल्ल भरला होता. रंगीबेरंगी कपडे घालून पाठमोरी बसलेली युगुलं तो निरखून पाहू लागला. कसं असेल यांचं आयुष्य? काय बोलत असतील ते? हातात हात घालून भविष्याच्या गोड स्वप्नात गुंग होऊन जन्मोजन्मी भेटू अशी एकमेकांना आश्वासने देत असतील? एकमेकांच्या नकळत हळूच स्पर्शून गोड शिरशिरी शरीरभर रेंगाळत ठेवत असतील? का....अरेच्च्या!!. पक्का दिसतोय!! त्याचं लक्ष त्या पांढऱ्या शर्टवाल्या तरुणाकडे गेलं. प्रेयसीच्या खांद्यावर हात टाकून तिला हळूहळू फुलवत असतानाच तिचं लक्ष चुकवून त्याने पलीकडच्या तरुणीला डोळा घातला होता. ती पोरगीही पक्की डांबिस. पटकन डोळा मिटून मिश्किल हसली. गिऱ्या खदखदून हसायला लागला. अगदी पोट पकडून हसायला लागला इतका कि हसता हसता त्याच्या डोळ्यातून पाणी यायला लागलं. आजूबाजूची जोडपी आपापली कामे थांबवून त्याच्याकडे अशा तऱ्हेने बघू लागली कि येडा बिडा दिसतोय की काय. त्यांची नजर पाहून तो अधिकच चेकाळला. मुद्दामच वेड्यासारखं हसायला लागला. खांद्यावर कोणाची तरी थाप पडली तसं थांबून त्याने वळून बघितलं.

"अरे बाब्या तू?!! "आश्चर्याने त्याने समोरच्या किडकिडीत दिसणाऱ्या तरुणाकडे बघितलं आणि त्याला इतक्या जोराने मिठी मारली कि दोन तीन हाडं करकरल्याचा आवाज त्यालाही जाणवला.

"लेका तुझी तब्येत काही सुधारत नाही. तू असाच टी.बी. पेशंट राहणार."हसत हसत गिरिधर म्हणाला. बाब्याही बेफिकीरपणे हसला. बाब्या उर्फ बबन पावसकर..फ्री लान्सर पत्रकार. गिरीचा खासम खास मित्र.

"जाने दे यार..चालायचंच. इथे कोणाला कुस्ती लढायला जायचंय? पोरींचा शौक आपल्याला नाही. तेव्हा तिला दाखवायचं म्हणून फिगर मेंटेन करायला आपल्याला वेळ नाही. तू सांग तुझं काय चाललंय सध्या? आणि असं वेड्यासारखं काय हसत सुटलास? "बाब्या म्हणाला

"काही नाही यार...आपले पुराने दिवस आठवले. तो समोरचा पोऱ्या बघितलास? कातरलेली चड्डी घातलेला? तो रे पांढरा शर्टवाला...साला पलीकडच्या पोरीला लाईन मारत होता. साली ती पण पक्की डांबिस. त्याला रिस्पॉंस देत होती. विशेष म्हणजे त्याची पोरगी त्याच्या जवळच बसलेली आहे...आणि तिचा छब्याही तिच्या बाजूलाच आहे. ग्रेट राव!! काय मग ट्राय करूयात का? लाईन क्लियर आहे."गिरीने हळूच डोळा मारत विचारलं.

"चल यार कुठेतरी निवांत बसू. तू कधीही सुधारणार नाहीस. पूर्वी होतास तसाच आहेस अजूनही. थोडीफार तरी सुधारणा झाली का नाही? "बाब्याने गिरीच्या पाठीवर थाप मारत विचारलं

छट यार..या बाबतीत आपण कृष्णाचे अवतार आहोत. सध्या त्याचाच रेकॉर्ड मोडायचा विचार आहे. तुला एक तरी गटली का नाही? का अजून कोरडाच?"गिरी हसतच बोलला

बाब्याने हसून मान हलवली.

"छयाऽऽऽ तुला मित्र म्हणवून घ्यायला लाज वाटते. बरं आज येतोस का? हवी ती घे. तुझी पसंती."गिरीने बाब्यापुढे टाळीसाठी हात केला

"तू चल यार...समुद्राची हवा तुला मानवत नाही असं दिसतंय, चल."बाब्याने त्याला खेचतच चालवलं.

पण बाब्याचं गिरीपुढे फ़ार वेळ चाललं नाही. अखेर गिरिधरच्या सांगण्यावरून ती दोघे एका हॉटेलमध्ये घुसले. तो बार होता. डान्सिंग फ्लोअरवर अधनंग्या तरुणींचे हिडीस नृत्य चालले होते. गिरिधरने हसून त्याच्याकडे बघितले.

"सुधर गिऱ्या आता तरी सुधर. किती दिवस हे असं सुरु राहणार? "

"सुधरायचा जमाना गेला यार. आता फक्त भोग. सुटेपर्यंत भोग. ते भोगावेच लागणार. यातून बाहेर पडायचा मार्ग सापडत नाही तोपर्यंत ही घुसमट ही अशीच सुरु राहणार. "समोरचा व्हिस्कीचा ग्लास त्याने एका दमात रिकामा केला. ती घसा चिरत आत गेली. तिचा दाहही त्याच्या मनाचा दाह शांत करू शकली नाही. उलट तो अधिकच भडकला. बाब्या त्याचं बारकाईने निरीक्षण करत होता. विषयांतर करावं म्हणून त्याने विचारलं,

"काय करतोस सध्या?"

:"वही पुराना काम. एका प्रतिष्ठित एन जी ओ साठी काम करतोय. फावल्या वेळात पेंटिंग. कामाच्या निमित्ताने किती शहरं पालथी घातली. नुसती भटकंती. आत्तापर्यंत किती मैल चाललो असेन मलाच मोजदाद करता येणार नाही. भोवळ येउन इथेच पडेन....खूप पिछाडलेली आहेत आपली लोकं. न्याय मिळत नाही त्यांना. अंगावर धड वस्त्र नाही. पुरुष कमरेला फाटकी चड्डी गुंडाळून स्वतःची टीचभर इज्जत तरी वाचवू शकतो. पण त्या माउलीचे काय? कुठूनही पहा..फाटक्या छिद्रातून वासनेने वखवखलेली नजर त्याच्या पार छेद घेतेच. किती लपवावं तिने? वस्त्रालाच शरीर पुरत नाही अशी अवस्था. मनं पुरती मेलेली. आपण नग्न आहोत याची जाणीवही त्यांना होत नाही यार!! अगदी परक्या माणसा समोर सुद्धा! साला त्यांना बघितलं ना कि आपल्या कपड्यांचीच आपल्याला लाज वाटू लागते. वाटतं द्यावी फेडून ही कापडं..आणि दिगंबर अवस्थेत ह्या हायफाय सोसायटी वाल्यांच्या समोर फ्री स्टाइल डान्स करावा. पैशाची गंगा धो धो वाहतेय त्यांच्या घरात... त्याचा एक लहानसा ओघळ जरी ह्या लोकांच्या घरासमोरून गेला तरी तरुन जातील ती. छ्या ssss साल्याचं नशिबाच गांडू. "गिरिधरने सिगारेट सुलगावून एक मोठा झुरका घेतला. धुरांची वलय सोडत तो विचारमग्न झाला.

"कसला विचार करतोस एवढा? "

"कसला नाही यार... आपलं सहजच. "बोटांच्या टिचकीने त्याने सिगारेट वरची राख ऍश ट्रे मध्ये झटकली., "जुने दिवस आठवताहेत. तुला माहित आहे बाब्या, तेव्हा मी नववीला होतो.घरात अठरा विश्व दारिद्र्य. आई मजुरी करून आम्हा भावंडांची पोटं भरायची. बापाचा घरात पत्ता नसायचा. आणि मी...."तो थांबून हसू लागला,"हे भेळवाले भेळ विकताहेत ना..तसा मी विकायचो. त्या बदल्यात कधी पैसे मिळायचे तर कधी खाण्याचे पदार्थ...शेंगदाणे किंवा असंच काहीतरी. गल्लोगल्ली ओरडत फिरायचो. ' भेल घ्या भेल' आणि आज सुटाबुटात एअर कंडीशन केबिनमध्ये खुर्चीत बसून साहेब झुलतोय. काय दिवस होते ते. अरे माझी आई कोण्या ब्राम्हणाच्या घरी गेली कि तिला त्याच्या स्वैपाक खोलीत प्रवेश नसायचा. बाहेर बसायची ती. मग केव्हातरी कान नसलेल्या

कपात चहा यायचा. बशी नाही.... तो कप खास तिच्यासारख्यांसाठीच..पण तीही पक्की स्वाभिमानी स्त्री. नको म्हणायची नि चालू लागायची. तिच्यामुळेच तर मी इतका शिकून मोठा साहेब झालो. पण त्या जखमा अजूनही चिघळताहेत. आता तर एकटेपणाची जाणीव अधिकच त्रास देऊ लागली आहे. हं.....”त्याने खोलवर उसासा टाकला आणि रिता झालेला ग्लास पुन्हा भरू लागला.

“गिरी पुरे कर आता. खूप झाली. कशाला जाळतोस स्वत:ला? मरशील अशाने लवकर.”

“मरशील!! काय बोलतोस! अरे ही आहे म्हणून तर मी जिवंत आहे अजून. नाहीतर पटकन केव्हाच आपलं रामनाम सत्य झालं असतं.”गिरीने वर बोट दाखवलं.

“लग्न का करीत नाहीस? किती दिवस एकटा राहशील? तुला सोबतही होईल. आणि एकदा का संसारात रूळलास कि तुझी ही दारूही सुटून जाईल. “

“इतक्या असताना लग्न करून त्या बिचारीवर तरी अन्याय कशाला करू?”

“बी सिरियस यार..मस्करी करीत नाहीय मी”

“मला आवडेल अशी एकही मुलगी माझ्या पाहण्यात आलेली नाही अजून. सगळ्या शो पीस काचेच्या बाहुल्या. एक जरी टिचकी मारली तरी खळकन फुटतील. माझ्याशी लग्न करणारी कशी स्ट्रॉंग हवी. ह्या मुंबईच्या मुलींमध्ये ती हिम्मत नाही. लग्नानंतर पळून आईच्या कुशीत जाऊन लपायची.अं हं...कोणी मुलगी माझ्याशी लग्न करायला तयार होईल असे वाटत नाही. आणि जरी तयार झाली तरी मी तिच्यापासून काहीही लपवणार नाही. सगळं सांगून टाकणार”

“म्हणजे झालंच तर...अशाने ती पळूनच जायची.”

“त्याला आपलं नाईलाज आहे. तिला अंधारात ठेऊन संसार करायची आपली इच्छा नाही.”

“मी ट्राय करू का?”

“ तू?!!”, गिरिधर आश्चर्याने त्याच्याकडे बघू लागला, “कशाला माझ्या बिचाऱ्याची मस्करी करतोयस. स्वत:साठी अजून एकही शोधली नाही आणि ब्रह्मचारी बुवा माझे स्वयंवर मांडायला निघालेत!!”

“मी तर लग्नच करणार नाही, तेव्हा शोधायचा प्रश्न येतोच कुठे? मी तुझं बोलतोय. तुझी ही अवस्था बघवत नाही मला. आतल्या आत जळतो आहेस आणि वरकरणी हसत आहेस. तुझी वेदना तुझ्या चेहऱ्यावर पसरलीआहे. ती न वाचता येण्या इतका वेडा नाही मी. पत्रकार आहे मी. एखाद्याच्या

चेहऱ्यावरचे भाव सहज वाचू शकतो मी. आणि तुला तर मी पूर्ण ओळखून आहे. कशाला एका मुलीपायी संपवतोस स्वत:ला? "बाब्याला त्याची केविलवाणी अवस्था बघवत नव्हती. आठ वर्षांपूर्वीचा गब्रू जवान.. सारं जग जिंकण्याची उर्मी असलेला.. आज दारूच्या पूर्ण अधीन गेला होता. रोज बाटली आणि बाई मध्ये स्वत:ला तीळ तीळ मारत होता. प्रेमभंग झालेले खूप बघितले. पण याच्यासारखा नाही. कोणीही पठ्ठ्याला हसत हसत पोरगी देईल. पण हा त्यातून बाहेर तर आला पाहिजे. तो पुढेही अजून बोलणार होता. पण गिरिधरने ग्लासातली व्हिस्की एका दमात रिकामी केली आणि केसातून खसाखसा हात फिरवला. तिरीमिरीतच तो उभा राहिला.

"चल निघूया..उशीर झालाय. "बाब्या नको नको म्हणत असतानाही बिल त्यानेच भरलं. चालताना त्याच्या झोकांड्या जात होत्या.

"मी पोहोचवतो तुला रूमवर."

"छ्या ss ट"त्याने बाब्याचा हात झटकला, "तुला काय वाटलं..मला जास्त चढलीय? अरे अख्खा बार पिऊनही ताठ उभा राहण्याची ताकत आहे ह्या पठ्ठ्यात. काय समजलास काय..गिरिधर म्हणतात मला..काssय गि..री..ध..र.."त्याने छातीवर हात आपटून सांगितलं,"तू जा, आपली ती वाट पाहत आहे. तुझ्यामुळे अडकून पडलीय बिचारी...निघ लवकर."

बाब्याने हॉटेलच्या गेटकडे बघितलं. मघाची डान्स करणारी तरुणी त्यांच्याच दिशेने पाहत होती. त्याने बघताच तिने सराईत हसू फेकलं. काही न बोलता पुन्हा भेटण्याच्या वायद्यावर तो तिथून निघाला. तसं त्याने शीळ घालून तिला खुण केली..

_____XXX_____

_____4_____

आबाने आईचे डोके दाणकन समोरच्या भिंतीवर आपटलं होतं. आज तो पुन्हा दारू पिऊन आला होता. किरण भावंडांबरोबर थरथरत उभी होती. आपण आता संपलो. आपलं जीवन आता नक्की बरबाद होणार. हातातली दहाची नोट तिला अजूनही फेकता आली नव्हती. आबांच्या मित्राने बळेबळे तिच्या हातात कोंबली होती. "याचा खाऊ खा"असे तो प्रेमाने म्हणाला होता. जाता जाता तो वेगळ्याच नजरेने तिच्याकडे बघत होता. का ते आत्ता आईच्या बोलण्यातून कळत होते.

"माझी पोरगी त्या मसनवट्याला द्यायची नाही सांगून ठेवते. जीव घेईन मी तिचा पण कोणाच्याही गळ्यात बांधायचं नाही माझं सोन्यासारखं लेकरू."खाडकन आबाचा हात तिच्या कानाखाली पडला होता. भेलकांडत ती भांड्यांवर आदळली. मग लगेचच चवताळून उठली. आबा बडवत होता आणि ओरडत होता. "काय कमी आहे त्याच्यात? एकटा आहे. कमवता आहे...विनापाश आहे...व स्वत:हून मागणी घालत आहे किरणला. "

"पण बायको जाळून मेली आहे त्याची, त्याचे काय? वयाने तुमच्या वयाच्या जवळपास आहे हो.".

किरणच्या पायाखालची जमीन सरकली....अरे देवा! आता मी काय करू? आबा ऐकणार नाहीत. आई त्यांच्या मारापुढे, दारूपुढे कमजोर पडेल... म्हणूनच त्याने स्वैपाकघरात ती एकटी आहे असे बघून बळेच तिच्या हातात दहाची नोट कोंबली होती तर!! त्याचा स्पर्श भयानक वाटला होता. गटकन आवंढा गिळला गेला. आबासमोर बोलायची तिची हिम्मत नव्हती. तिने मधलीकडे बघितलं ती काळजीत! आणि तिला कसली काळजी वाटत होती हे तिने दोन दिवसांपूर्वीच बोललेल्या वाक्यातून कळून आले होते. तिने सांगून टाकले होते, "ताई, तुझ्या लग्नाचे जर लवकर बघ. नाहीतर मी थांबून राहायचे नाही."

आबा आणि आईचे बोलणे थांबायची चिन्हे दिसत नव्हती. पर्स काखेला मारून ती निघाली तरी कोणाच्या लक्षात आले नाही. बाहेर अनेक डोळे तिच्यावर खिळलेले. काही खिडकीतून, काही बाल्कनीतून, काही दाराआडून...डोळेच डोळे!! नेहमीचे असले तरी आज ती त्या डोळ्यांचा सामना करू शकत नव्हती. इथून पळ काढायला हवा. पण कसा? कुठे? आबाने कोणी नातेवाईकही धरून ठेवले नव्हते...कि ज्यांच्याकडे ती जाऊन राहील. पायऱ्या उतरत उतरत ती दचकून उभी राहिली. जिना अडवून जग्ग्या उभा होता आणि तिच्याकडे बघून हसत होता.

"येतेस का घरी?"

तिला दरदरून घाम फुटला.

"घाबरू नकोस. सगळे आहेत घरात. तुझा बाप शांत होईपर्यंत बस. अगं मी काही खाणार नाही तुला. "तो अजूनही हसत होता. तिने सर्व बळ एकटवून त्याला ढकलला आणि ती वेगात पळत सुटली. पाठीमागून त्याच्या कळवळून ओरडण्याचा आवाज येत होता...तरी ती थांबली नाही. तिच्या नजरेसमोर एकच घर दिसत होते.

मीना..तिची बालमैत्रीण.

मीनाच्याही घरचे वातावरण फारसे वेगळे नव्हते. बाप सावत्र होता. पण आबासारखा नव्हता. पण मीनाला त्याला बाप म्हणवून घेणे जमत नव्हते. आईच्या शेजारी सख्ख्या बापाऐवजी दुसराच कोणी निजलेला बघून तिला मळमळायचे. कारण कळत्या वयात तिचा बाप मेला होता. त्याचा प्रेमाने डोक्यावरून फिरलेला हात अजूनही हटला नाही असेच वाटत होते. तिच्या धाकट्या बहिणीने केव्हाच लग्न केले होते. त्या बहिणीने आधीच मोठीला वॉर्निंग दिली नव्हती. पण मीना कमावती होती. टयूशन्स घेत होती. महिन्याला पंधरा हजार कमवत होती. थोडेफार दागिनेही जमा केले होते. किरणकडे काहीही नव्हते. महिना सतराशे रुपये नोकरी होती. पण सर्व पगार आईला द्यावा लागायचा. साधे अंडे जरी खायचे म्हटले तरी दहादा विचार करावा लागायचा. लहानपणी उपभोगलेले ऐश्वर्य आठवायचे आणि त्यातच तृप्त व्हायची. किरणला धापा टाकत आलेले बघून तिने तिला थंड पाणी दिले आणि कपाटातून पैसे काढून पर्स मध्ये भरले. डोळ्यानेच तिला खुणावत ती बाहेर पडली.

जुहूच्या वाळूत रेघोट्या ओढत किरण रडत होती. मीनाने तिला रडू दिले. आज कित्येक दिवसातून कोंडलेला बांध मोकळा झाला होता. बराच वेळ गेल्यावर ती शांत झाली.

"हं..आता बोल काय झालं? "

"आबा माझं लग्नं ठरवताहेत."

"कोणाशी?"आनंद व्हायच्या ऐवजी मीनाच्या कपाळाला आठ्या पडल्या. ती आबाचा स्वभाव जाणून होती.

"माधव अंकल बरोबर..."

"काऽय!! माधव अंकल!! त्या येड्या बरोबर? तुझ्या आबाला काय वेड लागलंय?"

“त्याने हे बघ मला दहा रुपये दिलेत… खाऊ साठी. “तिने चुरगळलेली नोट तिला दाखवली,”आजकाल रोज असंच होत आहे मीना. रोज कोणीतरी येतं आणि मागणी घालतं. आबा सगळ्यांना माझ्या मुलीशी लग्न करणार का विचारतात. त्यांच्या मित्रांनाही.. लाळ गाळत बघत असतो जो तो माझ्याकडे. चिंध्या चिंध्या होतात गं शरीराच्या आणि मनाच्याही. मला मुळात लग्नच करायचं नाहीय. कोण कसा भेटेल काय माहिती? आई- आबांचे उध्वस्त आयुष्य बघून माझं तरी लग्न करण्याचं धाडस होत नाहीय.”

“पण लग्नं तर करावेच लागणार ना सोना एक ना एक दिवस. माझीही अवस्था तू बघतेसच. माझ्या आईचा आणि त्या बापाचा रोमान्स दिवसेंदिवस फ़ुलत आहे. त्यांना या तरुण पोरीकडे बघायला वेळच नाहीय. गम्मत आहे ना?”ती हसतच म्हणाली,”मी आहे काय नि नाही काय..त्यांना सारखीच. पण तुझे तसे नाही. तू खूप सुंदर आहेस. कोणाही ऐऱ्यागैऱ्याच्या हाती पडू नकोस. “

“काय करू गं मी? जीव द्यावासा वाटतो. काल गच्चीवर जीव द्यायायला निघाले होते. छोट्याने पकडले. “

“एक काम करूयात का किरण?'

“काय?”

“आपण पेपरमध्ये जाहिरात दिली तर?”

“कसली?”

“लग्नाची?”

“काय लग्नाची?! “ती आश्चर्याने ओरडली. आजूबाजूचे लोकं त्यांच्याकडे बघायला लागले.

“शु sss ओरडतेस केवढ्याने!! जरा हळू ओरड. हे बघ मॅरेज ब्युरो चालवतात काही जण. आपणही नोंदणी करू. निदान आपल्याला हवा तसा नवरा तर शोधता येईल. काय वाईट आहे त्यात? “दोघींचे डोळे लकाकले. दुसऱ्याच क्षणी किरण नर्व्हस झाली.

“पण आबा?”

“तेवढं तर धाडस तर करायलाच हवं. तू तुझ्या आईला तयार कर. ती साथ देईल तुला.”

“पण हे सगळं करण्यासाठी पैसे?”

"मी थोडे भरेन. काही तुझ्या आईला सांग. "

"ठीक आहे. मग कधी जायचं?"

"आधी तुझ्या आईला तर तयार कर. बाशिंगच बांधून बसली आहेस."किरणला लाजताना बघून ती जोरजोरात हसू लागली.

_____XXX_____

_____5_____

ब्युरोवाल्या बाई खूप सोज्वळ वाटत होत्या. त्यांना बघून किरणची आई खुश झाली. येताना प्रचंड तणाव होता. पोरीला विकायला चालवल्याची भावना त्या बिचाऱ्या माउलीला होत होती. पण नाडकर्णी बाईंना बघून तिला हायसे वाटले.

"तुमच्या अपेक्षा सांगा ताई. "

"मुलगा चांगला हवा..कामाला असावा.. बस माझ्या पोरीला सुखात ठेवलं म्हणजे देव पावला."

"तुमची मुलगी सुंदर, सुशील आहे. मिळेल हवा तसा. तुमचे नाव नोंदवून घेते. पण मला तुमच्या घराचा पत्ता द्यावा लागेल...योग्य वर मिळाला तर··· वर मुले घरी येतील..तुमच्या मुलीला बघायला. चालेल ना?"

"घरी? इथे नाही? " किरणने आईकडे घाबरून बघितले..

"नाही..आम्ही स्थळ शोधून देतो. बाकी सर्व वर- वधूच्या घरी ठरतं. तुमच्या अपेक्षा लिहून द्या. "

"आम्ही फक्त पोरगी देऊ शकतो हो. आमची तेवढी ऐपत नाही"

"तुम्ही तुमच्या माफक अपेक्षा तर लिहा. होऊन जाईल ठीक सगळे. "

आबा काय करेल..मुलांसमोर नाटक करेल का?........ भीतभीतच त्यांनी फॉर्म भरला.

"उद्या पेपरला येईल. सलग तीन दिवस येईल. मग कोणाचा फोन आला तर तुमचा नंबर देईन. ठीक आहे?"

"ठीक आहे."

बाहेर पडल्या तरी त्या दोघींची हृदये धकधक करत होती. रात्री डोळ्याला डोळा लागत नव्हता. कधी उजाडते असे किरणला आणि तिच्या आईला झाले होते.

_____XXX_____

_____6_____

ती शेजारी तशीच बसली होती. अंगावरचे पांघरूण दूर जाऊन पडले होते. त्याने हळूच तिच्या अंगावर चादर टाकली. मग मनात काय आलं कुणास ठाऊक... खस्सदिशी चादर ओढली. हडबडून ती उठून बसली. डोळ्यांची मिटीमिटी उघडझाप करत त्याच्याकडे बघू लागली. गीरीधरला तिची खूप किळस वाटू लागली. ती अजूनही तशीच बसली होती. रात्रीची अप्सरा आता सडलेल्या महारोग्यासारखी वाटत होती. त्याला एकदम उमदळून आलं. तिचे कपडे तिच्या अंगावर फेकत तो तडक बाथरूम मध्ये घुसला. आणि भडाभडा ओकला. ओकतच राहिला. तरी त्याची शिसारी कमी होईना. डोकं गच्च धरून तो तसाच खाली बसला. थंडगार पाणी अंगावर घेतलं. काथ्याने अंग घासघास घासलं….खसाखसा चूळ भरली. तेव्हा कुठे त्याला बरं वाटलं. टॉवेलने डोके पुसत तो बाहेर आला. ती तयार होऊन बसली होती. प्रश्नार्थक नजरेने त्याच्याकडे पाहत होती. त्याने पाकिटातून नोटा काढल्या. मोजून तिच्याकडे फेकल्या.

"चालू लाग,"घोगऱ्या आवाजात तो बोलला. त्याची नजरच अशी होती कि काही बोलण्याचे तिला धैर्यच झालं नाही. पर्स उचलून ती निघून गेली. दरवाजा लावून घेत त्याने कॉटवर अंग झोकून दिलं. तसाच उताणा पडून गरगर फिरणाऱ्या पंख्याकडे तो टक लावून पाहू लागला.

आजकाल असं का होत होतं, त्याचं त्यालाच कळत नव्हतं. पण अलीकडे त्याला त्याचीच घृणा वाटत होती. जीवन नकोसं वाटत होतं. कधी वाटायचं जावं असंच आणि झोकून द्यावं एखाद्या ट्रेनखाली.. एका सेकंदात खेळ खल्लास. तसा त्याने खूप वेळा प्रयत्नही केला होता. काही वेळा पोलिसांनी पकडलं...घरी आणून सोडलं आणि काही वेळा समोरून धडधडत येणारी ट्रेन बघून त्याचं हृदय धाड धाड उडायला लागायचं. तो मग पटकन उठून बाजूला व्हायचा. घरी येउन आठ दहा ग्लास पाणी प्यायलं तरी थडथडणारं हृदय शांत व्हायचं नाही. मरायला शरीर अजून तयार होत नव्हतं. जगण्याची इतकी तीव्र लालसा असावी माणसाला?!! रोज तीळतीळ मरतोय..पण साला एकदाही हिम्मत करू शकलो नाही. थू ss तुज्या ss त्याला स्वत:ची खूप घृणा वाटली. रागाच्या भरात कॉटच्या कठड्यावर दाणकन डोकं आपटून घेतलं. लगेचंच सनक भरल्यासारखा आरशासमोर जाऊन उभा राहिला. स्वत:ला न्याहाळू लागला.

....दाढी खूप वाढलीय..चेहऱ्यावरून हात फिरवत तो स्वत:शीच पुटपुटला. वेगळ्याच धुंदीत त्याने शेव उरकली. कडक इस्त्री केलेले कपडे अंगावर चढवले. केसातून हात फिरवत ते व्यवस्थित बसवले. आरशातल्यास्वत:च्या छबीकडे बघत हळुवार शीळ घातली.

' अजूनही काही वाईट दिसत नाही आपण. बस डोळ्याखाली जरा काळी वर्तुळ उमटली आहेत. च्यायला ही दारू आपला पीछा सोडायला तयार नाही. काय तब्येत होती राव तेव्हा. हा हा म्हणता आठ वर्षे झाली. रोज सकाळी तांब्याभर दुध पिउन व्यायाम करायचो. दंडाच्या बेडक्या ह्या sss फुगायच्या. वीस गडी एकाच वेळी आडवे करण्याची ताकत होती. आणि आता स्वत:चाच जीव नकोस झालाय."दंडाच्या पिचकलेल्या बेडक्यांना दाबत त्याने उसासा टाकला. ' बाब्या म्हणतोय ते काही खोटं नाही. हळूहळू मारत चाललोय आपण स्वत:ला. कोणीतरी माझं हवं….. माझं स्वत:चं. माझ्या सुख-दुख्खात सहभागी होणारं. ह्या चार भिंतींच्या आत जीव घुसमटतो. भीती वाटते रात्रीची. कितीही स्वत:ला आकसून घेत झोपलं तरीही एकटेपणाची जाणीव नष्ट होत नाही. मग वेश्या खोलीवर बोलावाव्या लागतात. नको असतं सर्व ते. पण नाईलाज असतो. आपल्याला सोबतीची गरज भासते.

गेल्याच आठवड्यात मावशी आली होती तिच्या मुला बरोबर. तीही लग्नाच्या पाठी लागली होती. बिचारी जाताना रडत होती. आणि आपण परक्यासारखे दूर कोपऱ्यात उभे... जाणून बुजून कडवटपणा आणतो आपण. कशासाठी हे सर्व? ते काही नाही.. आपण लग्न करायचेच. तिच्या आठवणीने झुरणे योग्य नाही. ती तर मजेत असेल. आपल्या नवऱ्याच्या कुशीत... आपली आठवणही तिला येत नसणार. मग आपणच का स्वत:वर अन्याय करून घेतोय? लग्न करायचंच, पण आपल्याला पसंत पडलेल्या मुलीशीच...आणि तिला आपलं पूर्वायुष्य मात्र सांगून टाकायचं. लग्नानंतर कुणी शेण खाण्यापेक्षा आपण सांगितलेलं बरं...ठरलं तर मग....काय होईल ते होवो. बूट घालून तो ऑफिसला जायला निघाला. निघताना त्याच्या चेहऱ्यावर मंद स्मित होतं.

गिरिधरने पोटभर जेवण केलं होतं. तृप्तीचा ढेकर देत..बडीशेप चघळत त्याने टी पॉयवरचा टाइम्स ऑफ इंडिया उचलला. ऑफिसमध्ये सहजच नजर फिरवली. सर्वजण गप्पात रमले होते. लेडीज खिदळत होत्या. बाहेर राप राप पाऊस पडत होता. त्याच्या केबिनच्या काचेतून खळाळणारा समुद्र खूपच सुरेख दिसत होता. खुशीतच त्याने पेपर वाचायला सुरुवात केली. आज काही चांगलं घडणार असं मनोमन वाटत होतं.सहजच त्याची नजर मॅरेज सदराकडे गेली. 'वर हवा' ...अपेक्षा जास्त नव्हत्या. वयही बरोबर होतं. आंतरजातीय चालेलशी...जाहिरातीखाली फोन दिला होता. काय करावं...करूया का फोन? जमलं तर जमलं. तो टक लावून त्या जाहिरातीकडे पाहत होता.

त्याला त्यात काहीतरी विशेष वाटत होतं. त्याने नंबर फिरवला. पलीकडून एका माणसाने फोन उचलला. त्याने मुलीची माहिती विचारली तर त्याने जास्त काही न सांगता तिच्या घरचा फोन दिला. त्याने पुन्हा नंबर लावला व भेटायची वेळ ठरवून घेतली. अनामिक हुरहुरीने त्याचं मन भरून गेलं. भेट अजून चार दिवसांनंतर ठरली होती. तोपर्यंत गावी जाऊन यावं. मावशीच्या कानावर ही गोष्ट घालावी. इतरही बरीच कामे होती. पाच दिवसांची रजा टाकली. संध्याकाळच्या एसटीने सातार्‍याला निघाला.

मुंबई सुटलं तसं त्याला हायसं वाटलं. पिंजर्‍यातून बाहेर पडणार्‍या पक्षाला नक्की असाच आनंद होत असणार. दोन्ही बाजूला माळरान. सगळं कसं हिरवागार. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे गारवाही छानहोता. ती ओलसर हवा त्याने भरभरून आत घेतली. अंग थोडसं पसरून दिलं. शेजारी बसलेला तरुण चिडून त्याच्याकडे बघू लागला. त्या तरुणाने स्वत:ला आकसून घेतलं. आयला...आगाऊच दिसतंय. पोरीसारखं अंग आकसून घेतंय. हिजडा तर नाही ना..पण समजायचं कसं? दिसत तर नव्हतं तसं. पण काय सांगावं..देवाची करणी नी नारळात पाणी!!

“जरा नीट बसता का? “त्याने बायकी स्टाइलने विचारलं.

“तिच्यायला .... साला ही ब्याद आपल्याच बाजूला यायची होती. आता आख्ख्या प्रवासभर बोंब..का रे तुला त्रास होतोय का? खातोय व्हय तुला..”खास गावरान ढंगात तो बोलला.

“नाही..जागा कमी पडते.”अर्धे ढुंगण आत तर अर्धे बाहेर अशा अवस्थेत ते बसलं होतं. चिडून गिरीने त्याचा हात धरून खस्सदीशी जवळ ओढलं.

“जरा नीट बस की राव. अर्धा लोंबकळतोयस बाहेर. मग जागा कशी पुरंल. लाजतोस काय बायकांसारखा. काही करत नाही तुला मी. नशीब समज तुझं तू ती नाहीस. आणि बॅडलक माझं तू धड ती पण नाहीस अन तोपण नाहीस. लटकलो मात्र आम्ही..”त्याचं आवाज नाही म्हंटला तरी मोठ्यानेच चढला. प्रवाश्यांत एकच हशा पिकला. कंडक्टरही त्यात सामील झाला. ओशाळून ते गप्पं बसलं.

त्याच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करत तो बाहेरच्या वातावरणाचा आस्वाद घेऊ लागला. गाडी आता घाट चढू लागली होती. वळणं वळणं घेत रस्ता जात होता. डोंगरांच्या उंचच उंच रांगा. कपारीतून झरे वाहत होते.कड्यावरून खोल बघितलं तर नुसता हिरवागार गालीचा..इवली इवली घरं..भातुकलीच्या खेळण्यासारखी. गार मोकळा वारा. कुठेही मुंबईसारखे रोगट वातावरण नाही. त्याने

कितीतरी वेळा हे सगळं बघितलं होतं. तरीही नव्याने बघितल्यासारखं वाटायचं. नग्न पावलांनी त्या हिरवळीवरून चालावं..जमिनीवर बिनधास्त लोळण घ्यावी..खूप इच्छा होत होती. पण नाईलाज होता. त्याचं बाबू राहणीमान आडवं येत होतं. नजरेनेच तो ते दृश्यअधाशासारखे पिऊ लागला. हळुवार शीळ घालत तो हिंदी फिल्मची धून गुणगुणू लागला...रिम झिम गिरे सावन..सुलग सुलग जाये मन.. भिगे आज इस मौसम में..लगी कैसी ये अगन..झाडे वेगाने पाठी धावत होती.त्याचं मनही वेगाने पाठी धावत होतं.

_____XXX_____

साहित्य प्रतिष्ठान

_____7_____

८-१० हजार लोकवस्तीचं छोटसंच गाव. सभोवताली डोंगरांच्या उंचच उंच रांगा. कृष्णा नदीचं काळाशार पाणी. ते पाणी पिउन बहरलेली शेती. गल्लीबोळातून होत होत खालच्या आळीला गेलं कि दरवाशांची वस्ती. जागोजाग उघडेबंब माणसांचे देह. फाटकं तुटकं धडूत कसंतरी गुंडाळून कामं करणारी बाया मानसं. रस्त्याच्या कडेला कचऱ्याच्या ढिगावर हगणारी नागडी पोरं. नेहमीसारखा खोकणारा घराशेजारचा तो म्हातारा. त्याचा तो आवाज त्याला नेहमीच नकोसा वाटे. घशापर्यंत मळमळून येई. त्याने मरावं म्हणून कितीदा विचार आले असतील. पण ते आतून नसावेत..म्हणून तो बहुदा टिकून होता. सर्व कसं नेहमीसारखं. त्यात ते त्याचं लहानसंच घर. त्या आळीत त्या घराला जात नव्हती. ते घर त्या आळीचंच होतं. सर्वांच्यासारखं... सगळेच तिथे एक होते. त्यामुळे ते वेगळं असायची किंवा मानायची कोणाला गरजच नव्हती.

"अगं ये रकमे..कुठं निघाली वं हेलपायला सकाळच्या पारी? "

समोरच्या रंगू काकीच्या ओरडण्यानं वाकळ पांघरून गुडूप झोपलेला गिऱ्या ताडकन जागा झाला. पुढे काय ऐकायला मिळतंय या आशेने त्याचे कान तयारीत होते.

"चालले पाटलाच्या मळ्यात शांत करायला. येतीस का?", रकमी तणतणली.

"आता मी येउन काय करते व बाय. म्हातारा गेलं नी थंड झालं व माय. तुम्हा तरन्यांचे दिस हायत. जाऊन ये"

"लय उपकार झाले बग. अजून रग न्हाय गेली म्हातारीची. हाडं अर्धी गेली म्हसनात.. पण त्वांड हाय का गटार.."डोक्यावरची बुट्याची पाटी सावरत ती तरातरा चालायला लागली.

गिरिधर खुशीतच उठला.एकदम मोकळं मोकळं वाटलं. असं काही ऐकायला मिळालं नाही तर त्याची दिवसाची सुरुवात व्हायची नाही. तो संवाद म्हणजे त्याचं सकाळच्या न्याहारीचा भाकरी वरचा लसणीच्या चटणीचा गोळा होता.

पुढील दोन तास तरी जिभेने सरसरून पाणी सोडणारा.

"गिऱ्या ये गिऱ्या...उठलास का? "बाहेर बामनाचा महेश त्याला बोलवायला आला होता. होता बामनाचा..पण आपण बाटवला त्याला. खाऱ्या खायला घालून त्याच्या जिभेला चटक लावली. आता

ज्या दिवशी घरात डुक्कर शिजत असेल त्यादिवशी तो घरात चिकटून बसायचा. आणि आई वैतागाने भांडी आपटायची. पण त्या पलीकडे ती काही करू शकत नसे. नागव्या समोर देवही डोळे झाकून घेतो.

“का रे..का हाक मारायला लागलास?”त्याच्या आधी आई बाहेर पोहोचली होती. नेहमीसारखीच महेशने बत्तीशी दाखवली.

“काही नाही आई “तो तिला आई म्हणायचा. बामनाचा पोर आपल्याला आई म्हणतोय म्हणून तीही फुलारून यायची. आणि म्हणूनच गप्प बसत असावी. ह्या वेळीही तिचा पेटलेला राग पाण्याचा शिंपडा द्यावा तसा शांत झाला.

“गिऱ्या ते बामनाच कार्ट आलंय बघ. सकाळच्या पारी मटणाचे वास कसे लागतात ह्यांच्या नाकाला? तोंड वासून हसतंय मुर्दाड. जा बघ कि रं..लोळत काय पडलास..उठ की..”

आता मात्र तो उठला. वाकळ झटकून कोपऱ्यात ठेवली. महेशला डोळ्याने खुणवत तो आत गेला. चुलीवर लालभडक उकळत होतं. वासाने त्याच्या नाकपुड्या फुरफुरल्या.

“कवा पकडलं?”

“सकाळच्यालाच..बा गेला हुता. रग्गड आलंय आपल्या वाटणीला. दोन दिस तरी पुरंल “

“मंग बेस झालं.”' तो खुशीने बोलला. तशा तिच्या आठ्या चढल्या.

“का रं?..तो म्हश्या असणार न्हवं का...”

“नाही पण वाटीभर दिलं तर काय बिघडतं?”

“व्हय, पण दोन तीन भाकरीही हादडतो त्या संगं त्याचं काय... त्याचा बा काही कमावून आणून देत न्हाई. तुजा बा ही काही भरवशाचा न्हाई की आणलं पोतंभर जोंधळं की टाकलं दारात. “

तो तसाच खजील होऊन कोरा चहा फुंकत बसला.

“आता पी की..गार झाला नव्हं..देईन बस “

आता त्याची कळी खुलली. एका दमात त्याने ताटली रिकामी केली.

“पण आई आम्ही इथे न्हाई जेवणार.”

"मग रं? "

"न्हाई म्हंजे, आम्ही सगळे मित्र रानात जाणार आहोत. सहा सात जण आहोत. सगळेजण थोडंथोडं आणणार हाईत खायला. त्यात आपलही थोडं. यायला उशीर हुईल."

"आरं पन ह्ये चालंल का?"

"चालतंय..सर्व चालतंय. तू भाकरी बांधून दे"

काही न बोलता ती तिथून निघून गेली. पण रात्रीच्या भांडणाची ती नांदीच होती आणि ते कळूनही गिऱ्या गप्पं राहिला, चुलीवरचं पातेलं बघून त्याच्या तोंडाला पाणी सुटलं होतं आणि रानातली पहिल्या धारेची आठवण त्याला झिंग आणत होती. आईच्या चिडचिडीकडे दुर्लक्ष करत त्याने तिने बांधून दिलेली भाकऱ्यांची चवड व मटणाचा रस्सा भरलेला डबा घेत बाहेरचा रस्ता धरला.

गिऱ्या घरी परतला तेव्हा खूप रात्र झाली होती. डोळ्यावर मस्त धुंदी होती. अंग कसं पिसासारखं झालं होतं. सारं गाव गुडूप झालं होतं. अजून घरापासून तो दूरच होता, तर मोठ्यामोठ्याने ओरडणं ऐकू आलं. जसजसं जवळ यावं तसतसा किंचाळण्याचा आवाज अधिकच स्पष्ट येऊ लागला. त्याची भेलकांडणारी पाऊले भक्कमपणे आणि वेगात पडू लागली. जवळजवळ तो पळायलाच लागला. बाप आईला गुरासारखा बडवत होता. तिच्या तोंडातून रक्त येत होतं. तिची कृश शरीरयष्टी त्याच्या रांगड्या देहाच्या माराने काडकाड मोडत होती. गिऱ्याची नशा तर केव्हाच उतरली होती. जवळपास काहीच दिसेना. सरळ पायतान काढलं. डोक्यात दुसरा कुठचाही विचार नव्हता. दिसत होता फक्त बापाचा आईच्या अंगावर पडणारा हातोड्यासारखा हात. त्याला थांबवायला हवं....कसंही करून. मग हा मार्ग पत्करावा लागला तरी चालेल. बापाच्या काही लक्षात येण्याआधीच खाडकन त्याच्या कानाखाली जाळ निघाला.

_____XXX_____

_____8_____

गाडी गचकन गचका देऊन थांबली. गिऱ्याचं डोकं दाणकन पुढच्या सीटवर आपटलं. डोकं चोळत नकळत त्याने ड्रायव्हरची आईबहिण काढली आणि लगेचच गप्प झाला. समोर कुत्रं आडवं आलं होतं. ड्रायव्हर हुशार होता. त्याने कुत्रंही वाचवलं होतं आणि घाटात उतरणारी गाडीही. त्याने वाकून बाहेर पाहीलं केवळ फुटभराचं अंतर होतं जीवन मरणात. म्हणजे इथेही मृत्यूने दगा दिला तर. बहुतेक आपल्या नशिबी जगणेच दिसतंय. काय वाढून ठेवलंय त्या नशिबालाच माहित. मनात त्या तरुणी बद्दल विचार चमकून गेला. तिच्याशी लग्न व्हावं याचाच हा संकेत नसेल कशावरून? इतक्या मुली आयुष्यात आल्या.. पण हिला न पाहताच हिची ओढ का वाटावी?! शरीरातले सगळे झरे असे खळखळ का वाहू लागावेत?! तिला भेटलंच पाहिजे. ह्यावेळी मात्र काही खोडा पडू नये.

तो मावशीला भेटून परत निघाला. त्यांना तशी कल्पना दिली होती. त्यांचं म्हणणं एकच...कुणाशी का लग्न करेना..पण कर एकदाचं. त्याची पसंत चांगलीच असेल याबद्दल सर्वांचीच खात्री होती. तो लग्नाला तयार झाला यातच त्यांना धन्य झालं होतं. भाऊही खुश होऊन त्या रात्री फुल्ल प्याला होता आणि त्यानेही हात धुवून घेतले होते. अशा संधी सोडायला तो कधीही तयार नसतो. मुंबईला आल्यावर पुन्हा मन झाकोळून गेलं. ह्या शहराने आपला थेंब न थेंब शोषून घेतला आहे...तरीही हे शहर पिछा सोडायला तयार नव्हतं. जितक्या वेगाने दूर जाण्याचा प्रयत्न करत होता, तितक्याचं वेगात आत खेचला जात होत होता.

घरी येउन अंघोळ करावी तर नेहमीचीच बोंब. डोकं सणकलं. गावची कृष्णा आठवली. तिचं काळशार पाणी डोळे मिटून स्पर्शून घेतलं. दुसरे कपडे चढवत नेहमीचाच बार गाठला. चिक्कार प्याला. ती तरुणी पलीकडेच कुठेतरी राहत होती. मधे फक्त रेल्वे रुळांची लक्ष्मण रेखा. बारमधली पोरगी उगाचंच लगट करत होती. पण आज तो शांतच होता. त्या गूढ तरुणीचे डोळ्यासमोर त्याला पाहिजे त्या पद्धतीने चित्र रंगवले. मुंबईची म्हणजे चंट असणार. तंगड्या दिसणाऱ्या लांड्या फ्रॉक पासून ते बॉब केलेल्या केसापर्यंत तिला कुंचल्याने रेखाटलं व तिच्या भोवती तो फुलपाखरासारखा पिंगा घालू लागला. त्या चवचाल पोरीकडे दुर्लक्ष करत तो घराकडे निघाला. घरी आल्यावर त्याने सरळ कॉटवर अंग पसरून दिले. रात्रभर स्वप्नांची माळच माळ. नुसता झिम्मा चालला होता.

उठला तेव्हा खूपच उजाडलेले होते. अंग खूप जड झालेले होते. उठल्याबरोबर तिचा विचार आला. काय करावे?... प्रथम तिच्याशी बोलणे करावे का?... जर ठीक वाटले तर पुढची बोलणी. तो पाहण्याचा प्रकारच नको. तिलाही बरं..मलाही बरं. ऑफिसला पोहोचताच फोन केला. भेटण्याची नक्की वेळ ठरवून घेतली. तो काय कपडे घालणार आहे इथपर्यंत. त्याचं सगळं बोलणं ऐकणारी त्याची स्टेनोही मिश्किल हसत होती. त्यालाही हसू आलं. एकंदर सगळंच गुलूगुलू वाटत होतं. त्यात हे मधाळ वातावरण. एक प्रकारच्या धुंदीतच तो ट्रेनमध्ये घुसला. गर्दीचही काही वाटलं नाही. एकदाचा संकेत स्थळी पोहोचला. संकेत स्थळ होतं बसस्टॉप....जागा पण काय निवडली होती. आता जर त्या ठिकाणी गर्दी असेल तर तिला कशी हुडकून काढायची? पण मनात तिचे स्केच तयार होतेच. त्यात फिट बसणारी हुडकू लागला. स्टॉपवर जास्त गर्दी नव्हती. जेमतेम सहा सात माणसेच उभी होती. अशी कोणी तरुणी तिथे दिसेना. तसा तो कोपऱ्यात जाऊन उभा राहिला आणि तिची वाट बघू लागला. तासभर तो तसाच उभा होता. शेवटी कंटाळून फेऱ्या घालायला लागला. शेवटी बस आली आणि सगळी माणसे चढली. इतक्यात लाईट गेली. घामाने अंग पार भिजून गेले होते. आता त्याचं डोकं सटकलं. तिरीमिरीतच तिच्या घरी फोन केला. तिची आई फोनवर आली, कळलं की ती आली होती.

"आली होती?!! मग मला दिसली कशी नाही? माझ्याशी बोलली का नाही?!! "

"ती बाहेर परक्याशी आजपर्यंत बोलली नाही. त्यामुळे तिला जमलं नाही. तुम्हाला बघितलं तिने, पण न बोलताच परत आली."

"कमाल आहे. पण मला दिसली का नाही? "त्याच्या मनातल्या स्केच सारखी त्याला कोणीच दिसली नव्हती. बाहेर कुणाशीही न बोलणारी ही पोरगी बघायची त्याला अनावर इच्छा झाली. दुसऱ्या दिवशी तिच्या घरी जाण्याचं त्याने पक्कं करून टाकलं. तो अधिकच तिच्याविषयी विचार करू लागला.

_____XXX_____

_____9_____

एकापाठोपाठ चित्रविचित्र मुले....मुले काय माणसेच... भेटायला येत होते. किरणला आता उबग आला होता.आबा जाणून बुजून पिउन तर्र होऊन पडत होता. त्याच्या प्रिय व्यक्तीला तिने नकार जो दिला होता. पण तिच्या लहान भावंडांना खूप मजा वाटत होती. त्यांना हे सगळे नवीन होते.... आणि तिलाही. आपला जणू बाजारच मांडला आहे असे वाटत होते. काळे, बुटके, जाडे, थोराड, बायको मेलेले, एक मुलगी असलेले,..कोणाची बायको जळून मेलेली होती..तर कोणाची पंख्याला लटकून..पण सर्व श्रीमंत होते. तशात एक अतिशय उंच माणूस आला. दरवाजातून त्याला आतही येत येईना. किरणची बहिण श्याल्मली हसायला लागली.

"ताई, ह्याच्याशी लग्न करताना..माळ घालताना ह्याच्या कडेवर तुला बसावं लागेल. "

न राहवून तिलाही हसू फुटलं. खरंही होतं ते. सहा फुटाच्या वर तो होता. डोलकाठीच की. ती आता थकली होती. मनाने खचली होती. इतकी मुलं आली पण एकही तिच्या मनात उतरला नव्हता. म्हणजे आपलं लग्न कधीच होणार नाही की काय? म्हणजे आबा म्हणेल त्याच्या गळ्यात माळ घालावी लागणार की काय? पुन्हा जीव देण्याचे विचार मनात घर करू लागले. मनात घालमेल सरू असतानाच दरवाज्यावरची बेल वाजली.

"देवा पुन्हा?? आता बस कर रे बाबा हे धिंडवडे..."

बेल पुन्हा वाजली. आबा झोपले होते. आई भावंडेही झोपली होती. तिने दरवाजा उघडला. बाहेर एक साधारण उंचीचा तरुण उभा होता. काही क्षण ती त्याच्याकडे बघत राहिली. तोही नजर हटवेना.

"कोण?"तिने नजरेनेच प्रश्न केला.

"गिरिधर..गिरिधर माने."

_____XXX_____

_____10_____

जिना चढताना गिरिधर अस्वथ होत होता. कोण असेल?  कशी असेल? आपल्याला हवी तशी असेल का? का इतरांसारखीच?  बघू तर खरं. मला बघूनही न बोलणारी ही तरुणी निश्चित काही खास वाटत होती. हिम्मत करून बेल वाजवली. बराच वेळ झाला तरी कोणी दरवाजा उघडेना. पुन्हा बेल वाजवली. ह्यावेळी पावलांचा आवाज आला. दरवाजा हळूच किलकिला झाला आणि दोन पाणीदार डोळे त्याच्यावर खिळले. डोळे बघताच एक विजेचा झन्नाटा मेंदूत घुसला. जुने संदर्भ लागू लागले. असेच डोळे होते ते. पण हिच्या डोळ्यात काहीतरी विशेष आहे. काही गूढ बोलताहेत. जर हीच ती तरुणी असेल तर बस्स ठरले. आपण हिच्याशीच लग्न करणार. किती निरागस डोळे हे. अजिबात पाप नाही. त्याला स्वत:चीच किळस वाटली. आपण हे असे बरबटलेले... ही अस्पर्श...पण ही आपल्याला बदलेल. ती डोळ्यांनीच बोलत होती.."कोण?"

"गिरिधर..गिरिधर माने "

हातानेच थांबवत तिने दरवाजा लोटला. पाचच मिनिटांनी पुन्हा उघडला. परत तीच...आत बोलावत होती.

"या.."

घर छोटेसेच होते. कॉटवर वृद्ध व्यक्ती झोपली होती. मुलीचे वडील असावेत. त्याला बघताच हसून नमस्कार केला. दारूचा भपकारा नाकात घुसला. हातभट्टीची मारली असावी. तिच्या आईने हसून स्वागत केले. ती आतल्या खोलीत गेली होती. तोपर्यंत संवादाला सुरुवातही झाली होती. काय करता? कुठे राहता?...ती थोड्याच वेळात तयार होऊन आली. मघाशी केस विस्कटलेले होते. आता नीट विंचरलेले होते.

"कशाला विंचरलेस?  तशीच छान दिसत होतीस तू."तो मनात हळुवार म्हणाला.

"ही माझी मुलगी किरण. हिलाच वर बघत आहोत आम्ही. "

त्याने खोलवर सुस्कारा सोडला. अखेर आपलं अंदाज खरा ठरला तर. तो सुखावून ऐसपैस झाला.  किरणच्या बहिणीबरोबर त्याने हास्यविनोद करायला सुरुवात केली. छान घरगुती मोकळेपणा

निर्माण झाला. किरणही मधून मधून हसत होती. तिला बहुतेक आपण पसंत पडलेलो आहोत असं दिसतंय.

"आम्ही तुम्हाला काही देऊ शकणार नाही.  आमची परिस्थिती नाही. फक्त पोरगीच देऊ.", तिची आई काकुळतीला येउन म्हणाली. बाप तर बोलायलाच तयार नव्हता.

"मला काही नको. किरण अशीच आली तरी हरकत नाही. मी तयार आहे लग्नाला."

"आम्ही दोनच दिवसात सांगतो तुम्हाला.  किरणचे मतही विचारात घेतले पाहिजे."

"ठीक आहे. मी परवा फोन करतो."

त्याने निरोप घेतला. तिथून जायला मन तयार होत नव्हतं.

एक प्रकारच्या धुंदीतच तो घरी आला.  बारमध्ये जायची पण इच्छा झाली नाही. पूर्ण दिवस पडून राहिला. दिवसभर स्वप्नांच्या बागेतून त्याने तिच्याबरोबर फेरफटका मारला. तिला कोणकोणते कपडे चांगले दिसतील ते ठरवून टाकले. लग्नाची तारीखही नक्की केली. दोन दिवस त्याच धुंदीत गेले. त्याने अधीरपणे फोन लावला. तिच्या बहिणीने उचलला.

"हेलो,  मी गिरिधर बोलतोय."

"सॉरी, तिचे लग्न ठरलेय", गरमागरम शिसे कानात ओतल्याचा भास झाला.

"म्हणजे?!"

"कालच एक स्थळ पसंत आलंय. लग्नाची तारीखही निश्चित झालीय...सॉरी. "फोन ठेवला गेलाय.

सॉरी...हे काय नवीन?!  आपण तर तिला पसंत होतो. म्हणजे तिचे डोळेच बोलत होते. आणि एकाच दिवसात तिचे लग्न ठरले म्हणजे काय?!!' त्याची अवस्था वेड्यासारखी झाली. न राहवून तो अखेर बारकडे वळला. त्या दिवशी तो खूप प्याला. चालताच येईना तेव्हा मित्राने सोबत केली.

"यार राहुल,  मजाच संपली यार जिंदगीची."

"काय झालं सांगशील का नाही"

त्याने सर्व काही त्याला सांगितलं.

"छट..मला नाही वाटत.  काहीतरी गडबड आहे. एका दिवसात तिचे लग्न ठरणे शक्य नाही.तुझी जात सांगितली होती का?"

"हो "

"मग झालंच तर. त्यामुळेच नाकारलं असणार. "

"मला नाही तसं वाटत.  तिच्या घरातील सर्वांनी मला पसंत केलं होतं."

"अरे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे वेगळे असतात. साला या जातीनेच तर गांडूपणा केलाय. या उच्चवर्णीयांना आपल्या पोरी कुजल्या तरी चालतील. पण खालच्या जातीतला मुलगा ह्यांना आपल्या पोरीला चालत नाही. तू कशाला रडत बसलायस. चिक्कार देखण्या मुली मिळतील तुला.  चांगली नोकरी आहे. धडधाकट आहेस. एका दीडदमडीच्या  पोरीसाठी मरतोयस. "

"नाही रे..मला तसं वाटत नाही. परवाच तर गेलो होतो. इतक्यात कसा विचार बदलला त्यांनी?"

"तेच तर म्हणतो मी. तू पुन्हा का जात नाहीस.. सरळ विचार त्यांना, का नाकारलं ते. एका दिवसात काय कोणाची लग्न ठरतात? काय राजाची पोरगी आहे ती.."

"असं म्हणतोस? "त्याला थोडा हुरूप आला, "मग जाऊ म्हणतोस.."

"जा..उद्याच जा."राहुलने त्याच्या पाठीवर थाप मारली.

कुठेतरी आशेचा किरण चमकला. तडक तो रूमवर आला आणि ड्रॉवर मधून पेपर काढले, नि लिहायला बसला. किरणला लव्हलेटर. अशी कितीतरी पत्रे त्याने कितीतरी पोरींना लिहिली होती. पण हे वेगळं होतं. लिहून झाल्यावर ते पत्र पंचवीस पानांचं झालं. त्याने मन पत्राद्वारे मोकळे केलं होतं. ते पत्र कसंही करून तिच्यापर्यंत पोहोचायला हवं होतं.  तिच्या घरी जाण्याचं धाडस होत नव्हतं. तिच्या कॉलनीत जाणाऱ्या पोस्टमनला  त्याने पकडलं.

"अहो काका,  माझं एक काम करणार का?"

म्हातारा पोस्टमन त्याच्याकडे बघत राहिला.

"माझं एक लेटर एका घरी पोहोचवणार का?"

"अहो मग पोस्ट करा. ही कोणती पद्धत पोस्टमनलाच लेटर द्यायची. "येडा दिसतोय असे भाव पोस्टमनच्या डोळ्यात.

"थोडा वेगळा मामला आहे. लग्नाचा. त्या मुलीच्या हातात पत्र पडायला पाहिजे. आजच..आत्ताच. नाहीतर तिचं लग्न दुसऱ्या कुणाशी होऊन जाईल. हे पैसे ठेवा तुमच्या जवळ. "त्याने शंभरच्या काही नोटा बळेबळे त्याच्या हातात कोंबल्या. म्हाताऱ्याच्या चेहऱ्यावर हसू उमटलं. तो तयार झाला. तोपर्यंत गिरिधर बिल्डींगच्या खाली थांबला. पोस्टमन काम फत्ते करून आला तेव्हा गिरीच्या जीवात जीव आला. आता तिच्या प्रतिक्रियेची वाट बघणं हाती होतं.

_____XXX_____

_____11_____

"आई, मला तो मुलगा ठीक वाटत नाही. काहीतरी लपवतोय असं वाटतं. दिसतो भोळा पण तो ठीक नसावा."

"तुला सर्व तसेच वाटतात. एक तरी चांगला वाटावा! कसं होणार अशाने तुझं?"

" ताई अशाने तुझं लग्नच होणार नाही. बसशील मग आयुष्यभर रडत."श्याल्मली धुसफुसत म्हणाली.

"श्यामा, तू माझ्यासाठी थांबू नकोस. तुझं तू करून टाक. मला लग्नच करायचं नाहीय. आयुष्यभर त्रास सहन करण्यापेक्षा तशीच.. अविवाहित राहणे चालेल मला."

"बघ किरण..मुलगा मला चांगला वाटतो. इतकी मुलं बघितली आपण. पण हा वेगळा वाटला. तुला सुखात ठेवेल तो. "आई अजूनही त्याची बाजू घेत होती. आता तर मुले येणही बंद झालं होतं. त्यामुळे उरला सुराला आधारही तुटला होता. हा एकंच मुलगा होता ज्याच्याकडून काही आशा होती. त्यामुळे त्या बिचारीची घालमेल वाढली होती. तितक्यात दरवाजावरची बेल वाजली. पोस्टमन एक जाडजूड पाकीट घेऊन उभा होता. पाकिटावर तिचे नाव होते.

"माझ्या नावाचं लेटर!! मला कोण पत्र लिहिणार?!"तिने उत्सुकतेने वाचायला घेतलं. पंचवीस पाणी लव्हलेटरच ते. गिरिधरने पाठवलेलं. त्याचे आयुष्याच त्याने पत्राद्वारे खुले केले होते. पण त्यातील एक गोष्ट तिला खटकली. तिच्या अर्धवट राहिलेल्या शिक्षणाचा त्याने उल्लेख केला होता. तिच्यापेक्षा देखण्या मुली मिळाल्या असत्या..या वाक्याने तो तिला गर्विष्ठ वाटला. नसत्या आशंकेने ती घाबरून गेली. या जमान्यात असे पंचवीस पानांचे लव्हलेटर कोणी लिहितं का?! काहीतरी गडबड आहे.

"आई मला काही ठीक वाटत नाही बघ. "

"पोरी इतके उन्हाळे पावसाळे बघितले आहेत मी. माझी नजर धोका खायची नाही. तू कर ह्या पोराशी लग्न. तुझ्या बापाचा त्रास भोगण्यापेक्षा लग्न करून स्वतःचा संसार उभा कर. ज्या घरात पडशील तिथे सुख पसरवशील. पण इथे राहू नको राजा. आपण त्या मुलाला पुन्हा बोलवू. नीट बोल

त्याच्याशी. त्याच्याबरोबर तू अजून एक शब्दही बोलली नाहीस. असा एकदम टोकाचा अंदाज काढणे बरोबर नाही. वेळ हातून गेली की शहाणपणा येउन उपयोग नसतो."

फुल्ल दारू पिउन गाणी गात असलेल्या आबाकडे बघून तिने त्याला पुन्हा एकदा बोलवायला सांगितले. आबा तर स्वरात गात होता...प्रीतम आन मिलो..प्रीतम आआ sss न मिलो ss

_____XXX_____

______12______

गिरिधर अत्यंत खुशीत येउन सर्वांशी गप्पा मारत होता. किरणही त्यांच्यात सहभागी झाली होती. तिचे छंद, तिच्या आवडीनिवडी, त्याचे छंद, त्याच्या आवडीनिवडी..सर्व सर्व मोकळेपणाने बोलले जात होते. तो त्यांच्या घरचाच एक सदस्य असल्यासारखा वाटत होता.

"आता तर तुला काही अडचण नाही ना? अजून काय ग हवं तुला. "श्याम हळूच तिच्या कानात कुजबुजली. ती हलकेच हसली. निर्णय तिने घेतला होता. त्याच बैठकीत लग्नाची तारीखही ठरली. कोर्ट मंरेज करायचे ठरले. विचार करायला संधीच नव्हती. तिलाही ती नको होती. आता फाटे फोडायचे नव्हते.

फक्त दोघेच जाऊन नोंदणी करून आले. येता येता त्याने तिला त्याच्या घरी चालण्याचा आग्रह केला. ती भांबावून गेली.

' नको..असं येणं बरोबर दिसत नाही."

"बस थोडा वेळ. तुझा जास्त वेळ नाही घेणार. घाबरू नकोस. मी काही करणार नाही तुला. विश्वास ठेव. पण तू यावंस..एकदा तरी..असं मनापासून वाटत आहे. प्लीज...मी सोडेन तुला परत घरी. वाटल्यास तुझ्या आईची परमिशन घेतो. "तो काकुळतीला येउन म्हणाला. तिला हो ही म्हणवेना नी नाही ही. बराच विचार केल्यावर ती तयार झाली. तसा तो खुशीत आला.

घर खूप छोटसच होतं. एक पलंग..तोही छोटासाच... सोडला की काहीच नव्हतं घरात. एक टेबल, एक खुर्ची, एक स्टोव्ह बस्स. त्याने तिला खुर्चीत बसवून स्वत: खाली चटई टाकून भिंतीला टेकून बसला. बराच वेळ दोघेही एकमेकांशी बोलेनात. किरणच्या घशाला कोरड पडली होती. गिरिधरची अवस्थाही काही वेगळी नव्हती. इतक्या पोरी आत्तापर्यंत या खोलीत आल्या होत्या. पण भावी बायको म्हणून किरण या घरात आली होती. घर पवित्र पवित्र वाटायला लागलं होतं.

"किरण.."

"हुं"

"तुला अवघडल्यासारखं होत नाही ना? "

"नाही."..होत असलं तरी ती बोलून थोडीच दाखवणार होती?

"माझ्याशी लग्न करण्याचा निर्णय तुझ्यावर कोणी लादलेला तर नाही ना? "

"असं का बोलता तुम्ही?"

"काय मनात असेल ते स्पष्ट बोल. मीही आज तुझ्यापासून काही एक लपवणार नाही. "

ती मनातून हबकलीच. हा आता काय सांगणार आहे. देवा मला बळ दे. जे हा सांगणार ते निश्चितच चांगले नसणार.

"मी...माझ्यावर कोणीही निर्णय लादलेला नाही....लग्न करण्याचा."

"किरण मी एक आग आहे. माझं आयुष्य साधं नाही. खूप चढ उतार बघितलेत मी जीवनात. फाटकं आयुष्य आलं आहे माझ्या वाटेला."

ती एकटक त्याच्याकडे बघत होती. पापणी न लवता. त्याचा एकही शब्द चुकू नये म्हणून सर्व लक्ष त्याच्या बोलण्याकडे लागलं होतं. त्याचीही मघाचची भांबावलेली नजर आता स्थिर झाली होती. पण त्यात पाप नव्हते. वासना नव्हती. आणि नेमकी ती भावना किरणला वाचता येत होती. त्यामुळे तिला जरा निर्धास्त वाटत होते.

"किरण..किरण तू या घरात येणारी पहिली स्त्री नाही...अन माझ्या जीवनातही. "

त्याने बॉम्बस्फोट केला होता. किरण अंतर्बाह्य हादरून गेली. पळ काढावासा वाटत होता. पण पाय जमिनीला चिकटले होते. नजर गोठून गेली होती. तरीही त्याच्या चेहऱ्यावरून हलायला तयार नव्हती. ती काहीही बोलत नाही बघून त्याने तिच्या चेहऱ्याचे निरीक्षण केले. पण तिच्या चेहऱ्यावर कोणतेच भाव नव्हते. तो पुढे काय बोलतोय हेच जाणून घेत असावी.

"अनेक मुली माझ्या आयुष्यात आल्या. भणंग जगलो मी. "

"कुठपर्यंत? "

"काय?"त्याने न कळून विचारलं.

"बेड्पर्यंत?"ती स्पष्ट बोलली.

"हो"थोडसं थांबून तोही स्पष्ट बोलला. त्याने मनोमन ठरवूनच टाकलं होतं..आज कोणताही आडपडदा ठेवायचा नाही.

"मग मलाही...माझ्याविषयीही हाच विचार केला होतात?"

"नाही नाही..अजिबात नाही प्लीज. तू त्यातली नाहीस आणि म्हणूनच मी तुला हे सर्व सांगतोय. तुला बघितलं तेव्हाच ठरवलं होतं..लग्न करीन तर हिच्याशीच. नाहीतर नाही. पण या आधीही माझ्या जीवनात तुझ्यासारखीच एक मुलगी आली होती. घरंदाज. तिच्याशी पळून जाऊन लग्न करायचं ठरवलं होतं. सर्व नीट जमवलं होतं. मित्र गाडी घेऊन आले होते. पण ऐनवेळी भावांच्या भीतीने ती आली नाही. खूप वेळ वाट बघितली. अखेर परतलो. खूप शोध घ्यायचा प्रयत्न केला. पण पुन्हा तसं जमलंच नाही. कालांतराने कळलं की तिचं गावातल्याच एका डॉक्टरशी लग्नं झालं. मी पुरता तुटून गेलो. दारूत आणि बाईत स्वतःला बुडवून घेतलं. स्वतःवरच सूड उगवू लागलो."

"दारूही पिता?"तिचा आबा नजरेसमोरून तरळून गेला.

"हो.."

"खूप?"तिच्या नजरेत निरागसता होती. आपण हिला सोसवणार नाही असं बोलत आहोत. हिचं आयुष्य फुलपाखरासारखं कोमल असणार. पण हे गरजेचे आहे. किरण तू मला हवी आहेस...पण माझं काहीही न लपवता. घडलेली प्रत्येक गोष्ट तुला माहित असली पाहिजे. तरच आपला संसार सुखाचा होईल.

"पण मी तुला प्रॉमिस करतो की तुझ्याशी लग्न झाल्यावर मी कोणत्याही वाईट वाटेला जाणार नाही. बाई तर नाहीच नाही. पण दारू हळूहळू सोडेन मी. त्याकामी मला तुझी मदत लागेल."

म्हणजे आपण आगीतून उठून फुफाट्यात पडतोय. आबा एक पट तर हा दुप्पट.... काय निर्णय घ्यावा आता? घरात सर्वजण खुशीत आले होते....आपलं लग्न होणार म्हणून. लग्नाला नाही म्हटलं तर त्यांच्या आनंदावर विरजण पडणार होतं. आईने तर आत्तापर्यंत सर्वांना सांगितलं असणार. लग्न तोडलं तर लोकांना आयतंच कोलीत मिळेल. हे काय होऊन बसलं किरण...

"किरण..."

गिरिधरच्या हाकेने ती भानावर आली.

“अं..”

“कसला विचार करतेस?”

“मला काहीच काळत नाहीय. मी ह्याची अपेक्षा केली नव्हती. “

“तू अजूनही विचार करू शकतेस. पण तू नाही म्हटलं तर मला खूप वाईट वाटेल. इतका मी तुझ्यात इन्वॉल्व्ह झालोय. जर तू नाही तर दुसरी कोणीही माझ्या पत्नीची जागा घेऊ शकत नाही. माझ्याकडून तुला काहीही त्रास होणार नाही किरण. मला तुझ्यापासून काही लपवावंसं वाटत नाही. तुला बघितलं तेव्हा वाटलं..हिला आपण स्पर्श केला तर ही गायब होऊन जाईल. हिला जपलं पाहिजे. खरंच किरण, तुला बघून माझ्या मनात जराही वासना जागृत झाली नाही. माझ्यातला माणूस जागा झाला. मी माझं आयुष्य तुला मोकळेपणाने सांगावं असं वाटलं. मी ते लपवूही शकलो असतो. मी खराब नाही किरण. परिस्थितीने मी तसा वागलो. मी स्वत:वरच सूड उगवला म्हण ना. एखादी गोष्ट मिळत आहे असे वाटत असतानाच ती माझ्यापासून दूर जायची. काहीही केलं तरी फासे उलटेच पडायचे. मग दारू प्यायला लागलो. दु:ख विसरण्यासाठी त्याचा उपयोग होईल असे वाटायचे. पण ते कधीच कमी झालं नाही. “गिरिधर बोलत होता. त्याचे डोळे भरून आले होते. किरण आता बरीच सावरली होती. गिरिधर प्रामाणिक वाटत होता. काय संबंध त्याचा नि आपला? एखादा असता तर इतकं भयंकर आयुष्य सहज लपवलं असतं. आणि आपल्यालाही ते माहित झालं नसतं. तिला गिरिधरविषयी आपुलकी वाटू लागली. ती पुन्हा त्याच्याविषयी नव्याने विचार करू लागली.

“किरण...किरण..”गिरिधर हाक मारत होता.

' हं...' ती भानावर आली.

“मग काय विचार केलास तू?”

“कसला?”

“लग्नाचा...”गिरिधरची धाकधूक वाढली होती. समज किरणने नाही म्हटलं तर? पुन्हा कोसळून उभे राहू शकणार नाही आपण. ह्यावेळी तर नाहीच नाही.

गिरिधर खूप प्रामाणिक माणूस होता. जो माणूस लग्नाआधी इतक्या प्रांजळपणे आपल्या भावी वधूला आपले आयुष्य सांगतो तो लग्नानंतरही किती चांगला सांभाळ करेल...याचं मन अंतर्बाह्य निर्मळ आहे. हाच आपल्यासाठी योग्य पती आहे.

"मी तयार आहे तुमच्याशी लग्न करायला. "तिने हसून म्हटलं.

"काय बोलतेस तू!!.."तो आनंदाने ओरडलाच.

"खरंच.."

"वाह... ठरलेल्या तारखेलाच होईल आपलं लग्न. पूर्ण विचार केलास ना पण तू? "

"हो. पूर्ण विचार करूनच मी बोलत आहे. माझा तुमच्यावर पूर्ण विश्वास आहे."

"आभारी आहे किरण..तू माझ्यावर विश्वास दाखवल्याबद्दल. मी लगेच तयारीला लागतो. चल, आपण आत्ताच जाऊन आपल्या संसाराला जे जे लागतं ते ते खरेदी करून आणू. एकही भांडं नाही बघ घरात. तुला हवं ते घे. माझा आजच पगार झालाय. घे हे."त्याने खिशातून पगाराचं पाकीट काढून तिच्या हातात ठेवलं. तिला खूप गहिवरून आलं. आत्तापर्यंत तिचा तुटपुंजा पगार न मोजता सरळ आईच्या हातात जायचा. त्यातला एक रुपयाही खर्च करण्याचं धाडस तिच्याने होत नव्हतं. आज गिरिधर त्याचं पगाराचं पाकीट जसंच्या तसं तिच्या हातात देत होता. एक मोठा अधिकार तिला प्राप्त होत होता. तिच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. गिरिधरने पुढे होऊन तिला जवळ घेतलं. अनामिक ओढीने किरणने स्वत:ला त्याच्या मिठीत झोकून दिलं. प्रथमच परपुरुषाबद्दल तिला भीती वाटत नव्हती. गिरिधरच्या मजबूत मिठीत तिला खूपच सुरक्षित वाटत होतं. त्याच्या छातीवर डोकं टेकवून तिने भावनांना मोकळं वाहू दिलं. आज स्वत:ला मुक्त करायचं होतं. त्रास, घृणा, दडपण, भीती...सर्वातून मुक्त होऊन पूर्णपणे गिरिधर सोबत नवीन जीवनाची सुरुवात करायची होती.

_____XXX_____

साहित्य प्रतिष्ठान

_____13_____

जीवन आनंदाने जात होते. गिरिधरसोबत ती खूप खूष होती. दोघांचा संसार...राजाराणीचा संसार. गिरिधर त्याच्या कामाच्या निमित्ताने बाहेर जायचा. तेव्हा तिला सोबतच घेवून जात असे. दरवेळी नवे नवे लोक..नव्या नव्या जागा तिला बघायला मिळायच्या. तिच्यासाठी हे सर्व नवीन होतं. पण हे जीवन तिला आवडू लागलं होतं. मजा वाटत होती. नवीन दालन खुले झाले होते. ती प्रत्येक दिवसाच्या नोंदी ठेवू लागली. त्या नोंदींची गिरीला एकप्रकारे मदतच होऊ लागली. कामाच्या निमित्ताने तो तिला आदिवासी पाड्यात येणे जाणे वाढले. त्या गरीब आदिवासी लोकांच्या घरात सारवलेल्या जमिनीवर फतकल मारून बसून जेवण्याचा तिला कोण आनंद वाटे. या वातावरणात रमून गेली होती ती.

एके दिवशी गिरी लवकरच घरी आला.सोबत त्याच्या संघटनेत काम करणारी एक स्त्री होती. सडपातळ, बॉबकट असलेली , पन्नाशीच्या आसपास असलेली ती बाई किरणकडे बघून तोंड भरून हसली. आत शिरताच तिने किरणला प्रेमाने जवळ घेतलं. किरणने बावरून गिरीकडे बघितलं तेव्हा तो खळखळून हसू लागला.

“किरण ही माझी सहकारी योजना “

तिला असं एकेरी बोलताना ऐकून ती आश्चर्यचकित झाली. त्याने किरणच्या नजरेतले भाव ओळखले.

“माझ्या मोठ्या बहिणीसारखी आहे ही..मित्र, आई...सर्व काही काही...योजनापासून काहीही लपून राहिलेलं नाही. वयाच्या मर्यादांपलीकडचं नातं आहे आमचं. “

योजना किरणचा चेहरा हातात घेऊन प्रेमाने निरखू लागली.

“गिरी , कुठून शोधून काढलस हे फूल? खूपच सुंदर आहे. तुझ्यासारख्या व्यक्तिमत्वाच्या माणसाला शोभत नाही बघ.”

“आता येताच फूट पाडणं सुरु केलं की काय तू..? निट संसार करू दे बाई आम्हाला. तू तर गाशा गुंडाळून मोकळी झालीस.. मला थोडे पावसाळे...थोडे का पूर्ण आयुष्य काढायचे आहे तिच्याबरोबर. “

"डोंट वरी, घाबरू नकोस..सुखाने नांदा..आशीर्वाद आहे माझा तुम्हाला..तथास्तु."दोघेही हसू लागले. तसे किरणलाही हसू आवरेना. योजना तिला खूप आवडली.

"या बसा ना "

"या..? बसा....? ना…? !!! ई ss ये बाई , हे असं अहो जाहो करू नको बाबा. तुझ्या पाया पडते हवं तर... म्हातारीच करून टाकलं की मला एकाच फटक्यात. अजून काही इतकी ही दिसत नाही मी. माझ्या आयुष्यात नंबरांना स्थान नाही. सो पन्नाशी बिन्नाशी गेले उडत. तू आपली योजनाच म्हण मला. कसं फुलाफुलात आल्यासारखं वाटतं."

किरणला खुदकन हसू फुटलं.

"ओ के योजना.. तुम्ही... तू मला खूप आवडलीस "

"तू ही मला खूप आवडलीस डीअर... तो हो जाय पार्टी ? लेट्स सेलिब्रेट अवर फ्रेन्डशिप. काय बोलतोस गिरी? कारमध्ये व्होड्का ठेवलीय. दोन दोन पेग होऊन जाऊ दे.,"

"व्होड्का?"किरणची प्रश्नांकित नजर बघून योजना आश्चर्याने गिरीकडे बघू लागली.

"नो , तिला काहीही माहित नाही. ती घेत नाही..."

"म्हणजे तू.."

"मी घेतो हे तिला माहित आहे. पण ती नाही घेत. "दोघे बोलत होते आणि किरण न कळून दोघांकडे टुकूटुकू बघत होती. "तुम्ही दोघे कशाबद्दल बोलताहेत ?"

"आम्ही आपली नवी फ्रेन्डशिप सेलिब्रेट करायचं म्हणतोय. मस्त जेवण बनवशील? मला तर खाण्याशिवाय काहीही येत नाही. तू खूप छान जेवण बनवतेस असं गिरीने सांगितलं होतं. म्हणून हे बघ मस्त चिम्बोऱ्या आणल्यात."गिरीच्या हातातली पिशवी तिने किरणच्या हातात दिली.

"गिरी मी घेऊन येते खालून..."गिरीकडे हसून बघत ती बाहेर गेली.

"किरण मस्त जेवण बनव यार. खूप दिवस झाले खेकड्याच कालवण खाल्लं नाही, झणझणीत रस्सा बनव. "

"बनवते ना , पण योजना काय म्हणत होती..ते व्होड्का का काय ते...काय आहे ते.."

तितक्यात योजना आत आली. तिच्या हातात शरबताच्या ३..४..बॉटल होत्या ,

"सरबत असतं ते..मस्त लागतं. तू घेणार?"

"घेईन..कोणतं सरबत आहे?"

"तुला स्ट्रॉबेरी आवडते ना..तू तेच घे."

"योजना...उगाच आगाऊपणा करू नको तू..."

"गप रे तू...जा ग्लास घेऊन ये..."

"तिला सहन होणार नाही योजना."

"अहो केवळ सरबतच तर आहे. त्यात काय एवढं.. मी तोपर्यंत वाटण वाटून घेते. आलेच मी."ती किचन मध्ये गेली. गिरी योजनाकडे डोळे वटारून बघू लागला. ती डोळ्यानेच गप्प म्हणत मिश्किल हसू लागली."बघू तरी काय करते ती."

"तिला सहन होणार नाही..तिला चढली तर सांभाळणे जड जाईल. "

"महा बोअर आहेस तू. कोण आहे इथे आपल्याशिवाय. तुला जगण्यातला आनंदच घेता येत नाही बघ. नवीनच लग्न झालेलं आहे तुमचं. जरा मस्ती करायला शिक."ती डोळे मिचकावीत हसू लागली.

"तुझं काही खरं नाही बघ.. काही झालं तर सांभाळ तूच."

"येडाच आहेस..जा तीन ग्लास आण...अरे आण ना..काही होत नाही. जा आण "

त्याने ग्लास आणून टेबलावर ठेवले. योजनाने किरणच्या ग्लासात स्ट्रोबेरीचे ज्यूस भरले आणि त्यात गुपचूप थोडी व्होड्का ओतली. गिरीने कपाळालाच हात मारून घेतला.

"किरण ये गं. काम करता करता घे सरबत."

"आलेच "

"घे "योजनाने सरबताचा ग्लास तिच्या हातात दिला."किरणने तसाच तोंडाला लावला.

"अगं हळू हळू··आरामात. काहीतरी खा."

"का पण..? सरबतच आहे ना ?"

“हो पण आरामात बस ना आमच्या बरोबर गप्पा मारत. घे हे चिप्स खा”योजनाने चिप्स ने भरलेली प्लेट तिच्याकडे सरकवली. चिप्स चा एक तुकडा तोंडात टाकत किरणने परत एक घोट घेतला.

“छान आहे चवीला सरबत..नाही?”

“जास्त घेऊ नकोस किरण. तुला सवय नाही.”गिरी काळजीने म्हणाला. तसं योजनाने त्याला दटावून गप्प केलं.

“घे गं किरण. त्याचं काय ऐकते. केवळ सरबत तर आहे. काय मस्त वास सुटलाय खेकड्यांच्या कालवणाचा...ए थोडे शिजलेले असतील तर आण ना.”

“आणते थांब..”किरण उठून आत गेली.

“योजना बस कर यार..चढेल तिला.”

“चढू दे...मला मजा बघायची आहे तिला चढल्यावर काय करते ते. खूप गोड आहे ती. कोण आहे रे इथे आपल्या शिवाय...? “तिने अजून तिच्या ग्लासात भरली. किरण प्लेट मध्ये शिजलेले खेकडे घेऊन आली. भरलेला सरबताचा ग्लास बघून तिला आश्चर्य वाटले.

“अरे परत का ग्लास भरला माझा? “

“घे गं , संपवायला पाहिजे. नाहीतर खराब होईल. तुमच्याकडे फ्रीज पण नाही ना.”

“हो ते पण आहेच “किरण म्हणाली. तिने त्यांना काही कळायच्या आताच पूर्ण ग्लास रिकामा केलं. योजना आणि गिरी अवाक होऊन तिच्याकडे बघत राहिले.

“मी पटकन भाकरी टाकून येते. प्लीज आतमध्येच घेऊन जाते माझा ग्लास.”

तिने स्वत:हून परत ग्लास भरून घेतला आणि आत गेली.

“आता काही खरे नाही गिरी..तिसरा ग्लास !! जास्त व्होड्का मिक्स केली होती...”

“तरी मी तुला सांगत होतो....”

किचनमधून भाकरी थापटण्याचा आवाज येऊ लागला. योजना आणि गिरी गप्पा मारू लागले. बराच वेळ झाला तरी किरण बाहेर येईना. भाकरी बडवण्याचा आवाजही बंद झाला होता.

“किरण झाले का जेवण.? “गिरीने आवाज दिला. तिने काहीच उत्तर दिले नाही. संशय आला म्हणून योजना आत गेली. किरण ओट्याजवळ भिंतीला चिकटून उभी होती.

“काय गं झालं? अशी उभी का?”

“मी भिंतीला चिकटलेय..”रडवलेल्या आवाजात किरण म्हणाली.

“काय !!!”योजना हसून बोलली.

“हो ना..निघतच नाही मी. प्लीज तुम्ही जेवण वाढून घेताल? मी सर्व तयार केलंय. पण वाढताच येत नाहीय. मला माफ करा. पण घट्ट चिकटलेय..काय करू?”असा बोलून ती एकदम रडायलाच लागली. योजना जोरजोरात हसायला लागली

“अरे गिरी..इकडे ये लवकर..पटकन ये..”गिरी पळतच आत आला. किरणला रडताना बघून तो घाबरला.

“काय झालं किरण?”

“ती भिंतीला चिकटलीय...”योजना हसतच म्हणाली

“काय?!!”

किरण अजूनही भिंतीला घट्ट चिकटून उभी होती. त्याला बघून जोरजोरात रडू लागली.

“ओ के..ओ के.थांब मी तुला पकडतो...चल थोडावेळ झोप..म्हणजे तुला बरे वाटेल..”तो तिला पकडून चालू लागला. योजनानेही तिला पकडले.

“पण जेवण..”

“आम्ही घेतो. तू काळजी करू नकोस. झोप थोडावेळ.”

बराच वेळ ती रडत होती. अर्ध्या तासाने तिचा डोळा लागला. तसे दोघेही बाहेर आले.

“तरी मी तुला सांगत होतो..तिला देऊ नको. पण तू म्हणजे...”गिरी चिडून बोलला. त्याला खूप वाईट वाटत होते.

“अरे सॉरी यार..मला वाटले कि ती मस्त मूडमध्ये येईल. पण अशी रडायलाच लागेल याची कल्पना नव्हती. भिंतीलाच चिकटली....”ती पुन्हा टाळी देत जोरजोरात हसायला लागली.

तोही हसू लागला.

"गिरी जप रे बाबा हिला. खूप भोळी आहे. तिला काही त्रास दिलास तर मी सोडणार नाही बघ तुला. सांगून ठेवते."

"छान!! म्हणजे मैत्रीण माझी तू..आणि आता तिची बाजू घेऊन मलाच ओरडायला लागलीस?"

"मला खूप आवडली तुझी बायको. बाहेरची काहीच हवा नाही लागली आहे तिला. आणि तू कसा आहेस याची मला पूर्ण कल्पना आहे. त्यामुळेच बजावते तुला. "

"ओ के बाबा , जपेन तिला. आधी ती कशी उठेल ते बघ "

"२ तास तर निश्चिंती आहे आता...चल आपण जेवून घेऊ. तिने इतका आवडीने स्वैपाक बनवला. आणि आपण हादडतोय. उगाच पाजली तिला..नाही.."गिरी रोखून तिच्याकडे बघू लागला.

बऱ्याच वेळाने किरण उठून बाहेर आली. शांतपणे गिरीच्या बाजूला येउन बसली. त्यांच्या नजरेला नजर मिळवण्याचे धाडस तिला होत नव्हते.

"काय झाले किरण?"

योजना हसत म्हणाली,"आत्ता नाही चिकटली ना भिंतीला.."

"तुम्ही दोघांनी माझ्या सरबतात काय मिसळले होते?"

"व्होड्का..हया योजनाने केले ते. मी नको म्हणत होतो."

"वा शहाणाच आहेस...तू नको म्हणायचं होतं ना..बायको तुझी आहे..सॉरी किरण. पण मला फक्त तुला मूड मध्ये आणायचं होतं. पण तू इतक्या पटपट घेशील असं वाटलं नव्हतं. "

"प्लीज पुन्हा असली मस्करी करू नका माझ्या बरोबर. मी काय दारुडी वाटले तुम्हाला. "

"सॉरी..सॉरी.. पण मजा आणलीस बाकी तू...काय गोड वाटत होतीस तू..हो कि नाही गिरी"

गिरी हसत होता. किरण लाजून चूर झाली. योजनाच्या सात मजली हास्याने घर दुमदुमून गेले.

"उद्या तयार राहा. आपल्याला जायचं आहे ठाकूरवाडीला. लक्षात आहे ना ?"

"अरे हो..विसरलोच..सॉरी.."

“छान..तुलाही व्होड्का चढलीय बहुतेक.?”योजना हसत म्हणाली,”ओ के बाय.भेटू उद्या.”

“बाय..”गिरी म्हणाला. ती जाताच त्याने दरवाजा लावून घेतला आणि किरणकडे एकटक बघितलं. तशी तिने लाजून उशीत तोंड लपवलं. न राहवून तो हसू लागला.

_____XXX_____

______14______

ठाकूरवाडी...जेमतेम शंभर ते दीडशे वस्तींची आदिवासीवाडी. वाडीत पाऊल टाकलं की नजरेत भरते ती स्वच्छता. डोकं ताठ ठेऊन आत शिरता न येणारी घरं. घरात शिरतानाच नवख्याचं डोकं हमखास दाणकन आदळणार. गिरिधरचं डोकं आदळल्यावर ती किती हसली होती. तिला हसताना बघू त्या बायकाही फिदीफिदी हसू लागल्या होत्या. आत शिरलं की व्यवस्थित एकावर एक मांडून ठेवलेली... मातीने घासून पुसून लक्ख झालेली भांडी...नुकतीच विकत घेतल्यासारखी. त्यातलं एक भांडं उचलून गिरीने सहेतुक तिच्याकडे बघितलं. ती ओशाळून हसली. तिला इतकी स्वच्छता जमायची नाही आणि त्यावरून गिरी कायम तिच्याशी वाद घालायचा. तिने हळूच सर्वांच्या नकळत कान पकडले. जमीन नीट मातीने सावरलेली होती. खाली मांडी घालून बसण्याचा मोह ती आवरू शकली नाही. पण त्यांनी आणून दिलेल्या चटईवर बसण्याशिवाय गत्यंतर नसल्याने ती निराश झाली.

"गरीब माणूस नेहमी आतिथ्यशील असतो किरण. त्याच्याजवळ देण्यासारखे काहीही नसते. पण जे आहे ते वाटण्याची त्याची तयारी असते. एक तीळ शंभर जणात वाटून खावा..ही म्हण बहुधा त्यांच्यासाठीच लिहिली गेली असावी."गिरी हळूच बोलला.

ज्याही वेळी ते जायचे त्या त्या ठिकाणी कितीही नको म्हटलं तरीही थम्प्सअपची बॉटल समोर यायचीच. त्याचे पैसेही देऊ देत नव्हते ते. ठाकर समाजाची ती माणसे मानीही भरपूर होती. आज पाऊसही भरपूर पडत होता....तुफान पाऊस. त्याच्या ऑफिसवरून निघाले तेव्हा कोरडेच होते. तिथे पोहोचेपर्यंत नळाखालून निघाल्यासारखे निथळत होते. रिक्षाच्या दोन्ही बाजूला त्यांनी छत्र्या खुल्या करून लावल्या होत्या. पण भन्नाट वाऱ्याने त्यांच्या ह्या कामगिरीवर खूप हसून घेतलं होतं. शेवटी तो नाद सोडून त्यांनी स्वत:ला निसर्गाच्या हवाली केलं होतं. गिरी व त्याचा सहकारी पुढच्या सीटवर..मध्ये ड्रायव्हर..बाजूला हे दोघे. पाठी किरण व इतर तीन स्त्रिया. गिरी व त्याचा सहकारी अर्ध्या ढुंगणावर बसलेले. इतका भयानक प्रवास आपल्या इथेच होऊ शकतो असे तिला वाटले. पण कोणतीही किरकिर नाही. जगण्याचा सोयीस्कर प्रकार प्रत्येकाने निवडला होता. छत्री न उघडण्याचा

शहाणपणा त्यांनी केला होता. किरणला जोरात बाथरुमला लागली होती. बाकीच्या स्त्रियांनी आपलं देहधर्म आडोश्याला उरकला होता. साडी घातल्याचा फायदा. तिचा ड्रेस होता. अवघडच होतं. कसबसं उरकून घेतलं तेव्हा कुठे जरा हलकं वाटलं. गिरिधरबरोबर येताना साडी घालायचं तिने मनोमन नक्की करून टाकलं. गिरिधर तिला बायकांबरोबर बसवून त्याच्या सहकाऱ्यांबरोबर निघून गेला. त्याच्या स्त्री सहकारीही तिच्यासोबत थांबल्या. बायकांचे ग्रुप बनविणे, त्यांना माहिती देणे, ही त्यांची नित्याचीच कामे होती. घरात अंधार...मिणमिणत्या दिव्याचा काय तो उजेड. किरण विचार करू लागली.

“ह्यांची चिल्लीपिल्ली ह्या ओल्या जमिनीवर कशी काय झोपत असतील?! आजारी पडत नसतील? काय करत असतील मग? “

“काही नाही. खाली सुके गवत टाकतो. त्यावर गोधडी टाकतो. आमच्या लेकरांना दर महिन्याला एक इंजीक्षण द्यावे लागते. ओल बाधू नये म्हणून. “

“मग कोणी लक्ष देत नाही?!”

“कोण देणार? आमच्याकडे का लक्ष देतील? जगतो आमच्या पद्धतीने.”

' हे असं?! “

“मंग काय करायचं ताई...आमच्याकडे कोणीच येत नाही. सर्व योजनांचा लाभ मोठ्या लोकांनाच मिळतो. आमच्या घरात काय शिजतं? कसं राहतू आम्ही? कोणाला काय त्याचं. तुमी आम्हाला विचारता तरी. नायतर पावसापाऱ्याच कोण येतं या आडवळणाला? तुमी बोललात. लय बरं वाटलं. “

बोलणारीनीने किरणच्या तोंडावरून बोटे ओवाळून मोडली.

“मग हे बचत गटाचं कोणी सांगितलं तुम्हाला?”

“ह्या ताईनी.”एका जाडजूड बाईकडे तिने बोट दाखवलं. सर्वजणी खाली बसल्या होत्या. ती मात्र खुर्चीत बसली होती. तिचा देहच इतका ऐसपैस होता कि खाली मांडी घालून बसणं तिला शक्य नव्हतं. काळी सावळी, पोट सुटलेलं असलं तरी चेहरा खूपच देखणा होता. विशेषत: तिचं तोंड भरून हसणं. किरणकडे बघूनही ती तशीच हसली.

“यांनीच आमचे फार्म भरून घेतले. अन बचत करायला सांगितली.”

“काय असतो बचत गट माहित आहे का?”त्या जाड्या बाईकडे दुर्लक्ष करीत गिरीची सहकारी योजना म्हणाली.

“हो...प्रत्येक महिन्याला बँकेत पैसे टाकतो. “

“आणि? “

“बस..पैसे टाकायचे. “ सर्वजणी हसायला लागल्या.

“किती टाकायचे?”

“जिला जसे जमेल तसं टाकतो. “

“बँकबुक आहे?”

“हो”

बुक बघितले. प्रत्येक महिन्याला न चुकता पैसे टाकले होते. कितीही... कसेही काढले होते. रेकॉर्ड नाही. परत भरणा नाही. पैसे टाकायचे. न चुकता काढायचे. परत टाकायचे नाहीत. बस. नोंद वही नाही. लिखाण तर दूरची गोष्ट होती. त्याच तर प्रश्नच उद्भवत नव्हता. सगळ्या अंगठे बहादूर. नाही म्हणायला एकीला थोडं वाचण्या पुरतं व सही करण्या पुरतं येत होतं. त्यामुळे ती त्यांच्यात महत्वाची ठरली होती. दोन वर्षांपासून हेच चाललं होतं. आणि पैसे टाकता तरी का विचारला तर उत्तर होतं..नाही टाकले तर जेलमध्ये जाऊ...!!!

योजना त्या जाड्या बाईवर खूप भडकली.

“काय नाव हो तुमचं?”

“मिनाक्षी घोलप.”

“काय करता तुम्ही?”

“सोशल वर्कर आहे मी.”

"हे सोशल वर्क करता का तुम्ही? दोन वर्षांपासून या गटाची काहीच प्रगती झालेली दिसून येत नाही. कोणत्या तरी पक्षासाठी काम करता का? खतावणी नाही..नीट मार्गदर्शन नाही. कशा पुढे येणार ह्या बायका?. "

घोलपबाई खजील झाली होती. ती बहुधा कोणत्यातरी राजकीय पक्षाशी संबंधित होती. ह्या माध्यमातून एकगठ्ठा मतदार गोळा करत होती. ह्या बायकांकडे प्रामाणिकपणा होता. एकीची भावना होती. हीच एक जमेची बाजू होती. एव्हाना पुरुष मंडळीही जमा होऊन ऐकू लागली होती. तीही हळूहळू बोलू लागली होती. त्यांचं असं भिजत येणं त्यांना आवडलं होतं. ही सर्व मंडळी त्यांना त्यांच्यातलीच वाटून गेली होती. किरणने तुफानी पावसाला मनोमन धन्यवाद दिले.

"आम्हाला संडास नाही ताई.  तेवढं करता येईल का? बाया मानसांनी कुठं लांबवर जायचं? आमचं गायरान आहे..तिथं बांधून द्या. "

"ग्रामसेवक..सरपंचाच्या कानावर घातलं नाही तुम्ही? तुम्हाला आत्तापर्यंत बांधून मिळायला पाहिजे होती. "

किरणला आत्तापर्यंत हळूहळू कळायला लागलं होतं.  थोडं थोडं बोलायलाही सुरुवात केली होती. गिरिधरला सभेत तावातावाने बोलताना बघून तिला बरं वाटायचं. त्याच्यासारखंच आपणही करावं असं वाटून जायचं.

"आमच्याकडे कोणीच लक्ष देत नाही. त्यांच्या संडासात आमाला जाऊ देत न्हाईत., आमची पोर खेळायला गेली तरी ओरडतात.  आमी काय मानुस नाही?  संडास बांधून दिलं होतं. एवडूसा...."हाताची ओंजळ दाखवत ती बाई म्हणाली "सायबाच ढुंगण पण मावणार न्हाई त्यात. बाजूला आडोसा पण न्हाई. मंग रान बरं न्हाई का? तेव्हढं कराच ताई. "

"बघू आपण काय करायचं ते. आधी आम्ही तुमची नावं लिहून घेतो. सांगा बरं.."

"ताई मी घेते लिहून.' घोलपबाई पुढेपुढे करू लागली. तिला आता त्यांच्यात रस वाटू लागला.

"ठीक आहे. घ्या लिहून. ' योजनाही फारसे आढेवेढे न घेत म्हणाली.

"बोल ग "तशा त्या बायका लाजू लागल्या.

' अगं नवऱ्याच नाव घ्यायला नाही सांगत. "तशा त्या अधिकच लाजू लागल्या...म्हाताऱ्याही! किरणला खूप मजा वाटू लागली.

"किती निरागस ह्या.. आणि लोकं जातीचे विष कालवून हे गोजिरवाणे रूप काळवंडून टाकतात. पक्ष्याने उडता उडता विहिरीत शिट जरी टाकली तरी ते पाणी पिलं जाईल. पण गरीबांचा हात तर दूरच त्याची सावली पडली तरी विटाळ होईल. "

"खरं आहे किरण. खरे मागासलेले कोण हा मग प्रश्न पडतो. आधी त्यांचा उद्धार करण्याचे व्रत आपण सेवाभावी संस्थांनी घ्यायला हवं. बाबासाहेब वारंवार जन्म घेत नाहीत. पण त्यांचे चेले, अनुयायी, खऱ्या अर्थाने अनुयायी म्हणवणारे गावागावात तयार झाले पाहिजेत. केवळ बुद्ध जयंती, आंबेडकर जयंती केली, गर्वाने आम्ही अमुक तमुक म्हणून नारे दिले म्हणजे ऋणातून मुक्त झाल्याप्रमाणे संध्याकाळी पहिल्या धारेची घेणाऱ्यांची संख्या कमी झाली किंवा सफ़ेदच वस्त्र नेसून आलं म्हणजे आत्मा पवित्र झाला ही मानसिकता बदलली की..आणि तळागाळातल्या वर्गाकडे थोडं आणि थोडसंच जरी लक्ष दिलं म्हणजे मानवाच्या जीवनाचे सार्थक झाल्याचे समाधान आपल्याला मिळेल. ही जातपात, छुत अछूतपणा, बहिष्कृत करण्याची वृत्ती समूळ नष्ट करण्याची ताकत आपल्यातच आहे किरण."

"खरं आहे योजना. आपली भीती आपलाच घात करते, हे जोपर्यंत आपल्याला कळत नाही तोपर्यंत हे असंच सुरु राहणार. मग एखाद्या ठाकराला पाण्यासाठी तळ्यावर येऊ न देणारा मराठा असो..वा बुद्ध जयंती, आंबेडकर जयंती साजरी करणारे बौद्ध समुदाय बघून नाकं मुरडणारी दादर चौपाटी वरची उच्चभ्रू लोकं असो. ठाकराचं पोर अंगणातल्या झाडाजवळ मुततं म्हणून इरसाल भाषेत शिव्या देणारा मराठ्याचा सुशिक्षित सभ्य गृहस्थ असो वा दलित क्लास वन अधिकाऱ्याच्या चुका शोधण्यात आयुष्य खर्ची घालणारा सवर्णी सायबा असो. या सर्वांची जातकुळी एकच. ह्या सर्वांना जात्यात घेता आलं पाहिजे. तरच त्याला खरं आंदोलन म्हणता येईल. नाहीतर पृथ्वी कालही फिरत होती..आजही फिरत आहे..उद्याही फिरत राहील. आणि या वितभर वातावरणाच्या पट्ट्यात केवळ सात आठ फुटी बुजबुजाटात असा काय फारसा फरक पडणार?! पण म्हणून माणूस गू तर खाणार नाही ना योजना?, "किरण चिडून बोलत होती. गिरिधर कधी पाठी येउन उभा राहून तिला शांतपणे निरखतोय हे तिच्या लक्षातच आलं नाही.

_____XXX_____

______15______

त्या रात्री निघायचं होतं. ट्रेनचं रिझर्वेशन आधीच करून ठेवलं होतं.  किरणने दोघांचे कपडे व्यवस्थित बांधून ठेवले होते. गिरिधर मात्र टंगळमंगळ करत होता. जायला फक्त एकच तास शिल्लक होता.

“अहो,  आवरा ना तुमचं लवकर.  उशीर होतोय. बरं वाटत नाहीय का तुम्हाला?  “तिने त्याच्या अंगाला हात लावून बघितला. ताप तर नव्हता. शंका आली म्हणून तोंडाजवळ जाऊन वास घेऊन बघितला. दारूही नव्हती घेतली. मग....

“उदास का? “त्याच्या गळ्यात हात टाकत ती म्हणाली.

“तू खूप छान बोलतेस किरण. “तो तिला जवळ घेत म्हणाला. तशी तिची कळी खुलली.

“खरंच...तुम्ही कधी ऐकलं?”

“सकाळी तू बोलत असताना मी पाठीमागेच उभा होतो. कधी शिकली तू हे सर्व बोलायला? मला कळलंही नाही!”

“तुमच्याकडूनच तर शिकले सारं. “

“माझ्याकडून?! मी कधी शिकवलं तुला?” त्याने  न कळून विचारलं.

“तुम्ही नेहमी मला बरोबर न्यायचात. तुम्हाला बोलताना मी नीट लक्षपूर्वक ऐकायचे. मला खूप आवडतं तुमचं बोलणं.  किती मुद्देसूद आणि खरं बोलता तुम्ही.  तुमच्या पश्चात काही बायका यायच्या माझ्याकडे सल्ले मागायला. त्यांना वाटायचं तुमची बायको म्हणून मलाही तुमच्या इतकं माहिती असेल. मी पण मला जमेल तसे सल्ले द्यायचे.. हळूहळू सवय होत गेली. “ती खुशीत येउन बोलत होती आणि गिरिधरचा चेहरा उतरत होता.

अचानक तिचं लक्ष त्याच्या चेहऱ्याकडे गेलं आणि ती चपापलीच.

“काय झालं?”

“काही नाही...”तो नजर चोरत बोलला.

"काहीतरी आहेच. तुम्हाला आवडलं नाही का?"

"छे छे..तू काहीतरी बोलू नकोस. मला का आवडणार नाही? खूप छान बोलतेस तू. अगदी तळमळीने...माझ्यापेक्षाही छान. पण का माहित नाही. मला उगाच धाकधूक वाटतेय."

"कसली?"

"तू माझ्यापासून दूर जाशील.."

"काहीतरीच काय?! असं का बोलता? "ती आश्चर्याने त्याच्याकडे बघू लागली. त्याचा चेहरा खूप उतरला होता. ह्यांना काय झालं अचानक?

"तू या फिल्डमध्ये नको येउस किरण "अखेर तो बोललाच.

"काय?! पण का? "आज आश्चर्याचे धक्के बसत होते तिला.

"खूप घाणेरडी माणसे आहेत या जगात. हे काम वाटतं तितकं सोपं नाही. तू वेगळ्या विचारांची आहेस. सहन होणार नाही तुला. माझी किरण हरवेल कुठेतरी या विश्वात."

"आज काय झालाय तुम्हाला? नेहमी तर मला प्रोत्साहन देतात कोणत्याही कामात. मी एखादे भरत काम केले तरी भरभरून कौतुक करता. मग गरीब लोकांना थोडी मदत केली तर तुम्हाला वाईट का वाटते? त्यांना मदत केल्याने मी कशी बरं दूर जाईन तुमच्यापासून? " तिचे डोळे आता डबडबले होते.

"ए वेडाबाई...लगेच झाल्या का गंगाजमुना सुरु!! बरं बाई ठीक आहे..नाही हरवणार तू. तू माझी आहेस केवळ माझी...माझी किरण."त्याने तिला घट्ट कवटाळली.

"चल मी लगेच अंघोळ करू येतो. लगेच निघू."

टॉवेल उचलून तो बाथरूम मध्ये घुसलाही. ती तशीच कॉटवर बसून राहिली होती. एकटक बंद दरवाजाकडे बघत.

_____XXX_____

_____16_____

गाडी सुरु झाली. सगळीकडे नुकतीच फुलत चाललेली कोवळी लुसलुशीत रात्र. अजून पाळीने चिंब न झालेल्या कुमारीकेसारखी चंचल वाटावी अशी....संपूर्ण चंद्र अवकाशात मस्तीने रेंगाळणाऱ्या ढगातून हळूच डोकावला की लग्नाला होकार देणाऱ्या लज्जायुक्त युवतीसारखी रात्र आणि एखादा रंगेला शुभ्र ढगाचा पातळ, तलम बुरखा आला की पहिल्या संभोगाच्या भीतीने गांगरलेल्या नववधूसारखी वाटावी अशी रात्र...किंवा मोठ्या काळ्याकुट्ट ढगात चंद्र बुडाला की..ऐन जवानीत मिलिटरीवाल्याची विधवा झालेली, फटफटीत चेहऱ्याची 'सुंदर बायको' वाटावी अशी रात्र! गेली २४ वर्षे जगत आलोय आपण. ३६५ x २४ = ८७६० इतक्या रात्री बघितल्या. पण अजूनही ही रात्र काही अंतकरणात पूर्ण झिरपून आपल्याला शांत करत नाही. मृत्युसारखं रात्रीचं एक न भेदता येणारं गूढ मेंदूत अतृप्तपणे किंचाळ्या मारत रहातं. मग त्या अज्ञात असलेल्या गूढ गुहा भिवावितात.

गाडीच्या खिडकीतून तिने डोकावलं तेव्हा उभ्यानं झोपा काढणारी सुस्त, शांत झाडे मागे सरकत होती. मग त्यातूनही आपल्याला अज्ञात असलेल्या शांत खेड्यातून वाट काढीत निघालेल्या चुकारू ट्रकच्या हेड लाईटसची दोन टिंब उलट्या पळणाऱ्या झाडातून दिसली की मग त्या ट्रकचा ड्रायव्हर डोळ्यासमोर उभा राहतो. त्याचा पेहराव..विडी ओढणारा, रापलेल्या चेहऱ्याचा, सतत डिझेलचा वास येणारे कपडे आणि आई-बहिणीवरून शिव्या देण्यासाठी फुरफुरणारे वास मारणारे ओठ. किरण शहारून गेली. हे कसले विचार येत आहेत आपल्या मनात!! आपण बदलत चाललोय का? तिने समोरच्या बर्थकडे नजर टाकली. गिरिधर शांतपणे झोपी गेला होता. तिने घड्याळाकडे नजर टाकली. रात्रीचे तीन वाजले होते. झोप येत नव्हती. गिरीचे शब्द कानात घुमत होते. कुठल्याशा भीतीने तिच्या शरीरावर काटा उभा राहिला. लगेचच विचार बदलून तिने बाहेर बघितलं. कुठलंसं सार्मलकोट जंक्शन पार झालं. फक्त डोक्यावरती दाट फांद्यांचा गुच्छ असलेली उंच, सरळ ताठ ताडांच्या झाडांची रांग तर कधीच विसरता येणार नाही. गरीब खेड्याच्या मिणमिणणाऱ्या दिव्यांचा पुंजकाही सहज मागे गेला. गाडीच्या पोटाखालून जोराचा गडगडाट सुरु झाला. एक वांझ नदीचं रखरखीत पात्र पार झालं. आता थोड्याच वेळात झोपही लागेल. पण तरीही जागृत नसांना सतत काहीतरी खाद्य द्यावंच लागतं ना? तिने खोलवर उसासा सोडत डोळे मिटले.

दोघे परतले तेव्हा किरण अंतर्मुख झाली होती. चार दिवसांच्या प्रवासात गिरिधर तिच्याशी जास्त बोलला नव्हता. एकांत असूनही तो पूर्वीसारखा दिसला नाही. त्यामुळे तिलाही त्याच्याजवळ जावेसे वाटले नाही. काम आटोपून ते परतले. काय झाले विचारायची तर बोलायचा की पैशांची अडचण आहे. संघटन लॉसमध्ये चाललंय म्हणायचा. सारखा संघटना सोडायची भाषा करायचा. दुसरी नोकरी शोधतो म्हणायचा. तिलाही ते खरं वाटलं. ती शक्य तितकी काटकसर करायला लागली. हट्ट करेनाशी झाली.

अशीच ती चहा पीत बसली होती. गिरी आज एकटाच बाहेर गेला होता. आजकाल तो तिला जास्त बाहेर नेत नव्हता. घर खायला उठायचं. आबांच्या पिण्यामुळे घरी जायलाही मन होत नव्हतं. आई अधून मधून भेटायला यायची. श्यामानेही लग्न केल्यापासून तिला संपर्क केला नव्हता. आईकडून तिची खुशाली कळायची. कंटाळा आला होता म्हणून आलं टाकून मस्त चहा केला होता. बाहेरचा पाऊस बघत ती चहा पीत होती. तेवढ्यात डोअर बेल वाजली. गिरी आले की काय? आजकाल तो कधीही असाच अचानक यायचा. तिने दरवाजा उघडला.

“घोलपबाई तुम्ही?!”बाहेर घोलप हसत उभी होती. सोबत एक तिशीची युवती. छान दिसत होती.

“माझ्याकडे कसं येणं केलंत अचानक? बसा ना. चहा ठेवते.”

“काम होतं हो तुमच्याकडे. “

“माझ्याकडे? बोला ना “

“आमचा एक गट आहे. एक वर्ष पूर्ण झालं आहे गटाला. पण त्यांना रेव्हाल्व्हिंग फंड अजून मिळाला नाही आहे. ग्रामसेविका पण दुर्लक्ष करतेय. आदिवासी बायकांचा गट आहे. पण मोठ्या लोकांच्या दबावामुळे या गटाला वाळीत टाकल्यासारखं केलंय. बी डी ओ ने ही डोळेझाक केलीय. माझं तर कोणी ऐकतच नाही. तुम्ही सांगून बघा. तुमचं ऐकतील.”

“अहो पण मी हे काम करत नाही. मी कोणी सोशल वर्कर नाही.”

“पण तुमचे इम्प्रेशन पडते. “

“काहीतरीच काय!! “

“प्लीज नाही म्हणू नका. “

“पण माझेही नाही ऐकले तर?”

“मग आम्ही करू काहीतरी. थँक्स ताई. “

“तुम्ही मला ताई नका म्हणू हो. लहान आहे मी तुमच्यापेक्षा. किरण म्हटलं तर चालेल मला.”

“बरं बाई किरण..हेच बरं वाटतं. गोड वाटतं बोलायला. “

“ही कोण?”

“मी सुनिता. ह्या ताई बरोबर असते. माझा व्यवसाय आहे स्वत:चा...कटलरीचा. “

“ह्या सोशल वर्कर..तुम्ही बिझनेस वुमन..मग?”

“मला ह्यांच्या बरोबर राहून खूप काही शिकता येतं. बिझनेस मिळवून देण्यासाठीही त्या खूप मदत करतात. तुमच्याविषयी ताईकडून खूप ऐकलं होतं. म्हणून आज मुद्दाम भेटायला आले. “

“असं होय...बरं झालं तुम्ही आलात ते. मी येईन तुमच्याबरोबर. पण एकटी येणार नाही. माझी एक मैत्रीण आहे. तिला बरोबर घेईन. तिला याविषयीचं बरंच ज्ञान आहे. तुम्ही ओळखता तिला …. योजनाताई. “

“त्या होय? खूप वयस्कर आहेत ना त्या?!”

“वयस्कर नाही म्हणता येणार. पन्नाशीच्या आसपास आहेत. पण त्याचा आणि या कामाचा काय संबंध?”

“नाही नाही असं नाही काही.. येऊ द्या त्यांना. उलट बरंच होईल. “घोलपबाई चपापून म्हणाली.

किरणने योजनाला फोन लावला.

'मी पाचच मिनिटात येते' ती म्हणाली.

त्या दोघी एकमेकींना नावानेच हाक मारायच्या. इतकी त्यांच्यात मैत्री झाली होती. वयाची अडचण येतंच नव्हती. गिरीही तिला योजनाच म्हणायचा. कधीही भेटली की कडकडून मिठी मारायची. आत्ताही आली तेव्हा सरळ गळ्यातच पडली.

"हाय किरण, उदास का ग दिसतेस? भांडला बिंडला कि काय गिरी? "डोळे मिचकावत ती म्हणाली. दोघींकडे लक्ष जाताच ती गप्प बसली.

"नमस्ते"दोघींनी हात जोडले.

"नमस्ते...सोsss आज कोणावर संक्रांत ओढवलीय?"

"बी डी ओ "

"ओके लेट्स गो "चप्पल घालून ती निघालीही.

_____XXX_____

साहित्य प्रतिष्ठान

_____16_____

सर्वजणी पंचायत समितीच्या कार्यालयात घुसल्या. बी डी ओ च्या खुर्चीवर एक वृद्ध व्यक्ती बसली होती. केस पांढरे झालेली, हडकलेली व्यक्ती कोणालाही जवान वाटणार नाही. किरणला ती आबाप्रमाणेच वाटली. त्याशिवाय दुसरे वाटणे शक्यच नव्हते तिच्यासारख्या स्वभावाच्या बाईला. पहिल्याच भेटीत त्यांनी सर्व समजावून सांगितलं. पूर्ण मदत करायची तयारी दर्शवली. रजिस्टर वगैरे घेऊन या..संपर्कात रहा म्हणाले. पुढच्या भेटीत घरी येतो म्हणले. चांगला अधिकारी मिळाला म्हणून सगळ्या खूष झाल्या. पुढच्याच आठवड्यात ते घरीही आले. गिरी त्यांना भेटून खूप खूष झाला. त्याची बरीच कामे मार्गी लागणार होती आता. वृद्ध माणसाबद्दल शंका कोण घेणार?!

गिरीचही मत त्यांच्याबद्दल अनुकूल झालं.

त्यानंतर त्या सर्वजणी एकेदिवशी त्यांच्या कार्यालयात गेल्या. निघताना त्यांनी किरणला 'एक मिनिट' म्हणून थांबवले.

"तुमच्याशी बोलायचे आहे मॅडम"

केबिनला दरवाजा नव्हता. सर्वजण ये जा करत होते. त्यामुळे किरणला घाबरण्यासारखे काही वाटले नाही.

"हा बहुधा पैशांची मागणी करणार"योजना जाता जाता किरणच्या कानात फुसफुसली.

"शु sss जा तू. आलेच मी. "सर्वजणी बाहेर थांबल्या.

"त्याचं काय आहे मॅडम, इथे काही बोलत येत नाही. आपण कुठेतरी बाहेर जाऊया. काय...लक्षात आलं ना?"

तो बी डी ओ आता खुर्चीत रेलून रिलॅक्स होत, हात डोक्यामागे नेत म्हणाला. किरणला विचित्रच वाटलं. सूर नवा होता. पण इतकी वृद्ध व्यक्ती असा काही विचार करेल असं मानायला मन तयारच होत नव्हतं. काही न बोलता तिने हसून त्यांची रजा घेतली. ती घरी पोहोचत नाही तोवर त्यांचा फोन आला.

"काय चाललंय? "

"कामं चाललीत सर. आत्ताच पोहोचले."

' दहा मिनिटात फोन?! हा काय प्रकार आहे? ' तिच्यातली स्त्री आता सावध झाली होती.

"कुठेतरी जाऊया. काय लक्षात आलं ना? "

"कुठे सर?"

"तुम्ही सांगा. "

"आमच्या कार्यालयात या. व्यवस्थित बोलता येईल."

"तिथे नको. तिथे मला ओळखणारे भरपूर लोकं आहेत. "

"मग तुमच्या कार्यालयात बोलू. असं काय बोलायचे आहे?"

"नाही..माझ्या कार्यालयातही नको. लोकं उगाचच संशय घेतील. "

हे काय नवीन!! प्रकरण वेगळंच दिसत होतं आणि प्रकर्षाने ते लक्षात यायला लागलं होतं. पण दुसरं मन म्हणत होतं....पैशाचा मामला असेल. असे लालची अधिकारी ठिकठिकाणी असतात. गिरिधर बरोबर राहून तिला असे लालची अधिकारी बरेच बघायला मिळाले होते. हाही त्यातलाच एक असेल. तरी पण काय प्रकार आहे हे तिला जाणून घ्यायचं होतं.

दुसऱ्याच दिवशी योजनाला घेऊन ती त्याच्या कार्यालयात गेली. सोबत बचत गटाची एक बाईही होती. ती धंदेवाली बाई होती. पण आता बचत गटातून कर्ज घेऊन स्वत:चे किरणाचे छोटेसे दुकान टाकले होते. रीव्होलव्हिंग फंड विषयी बोलले गेले.

"हो ते करू आपण...तुम्ही सर्व बायका बीपीएलच्या घ्या...."सर्व कॅसेट पुन्हा ऐकवली. महिनाभर तो हीच कॅसेट ऐकवत होतं. गाडी पुढे सरकतच नव्हती.

"तुम्हाला सर्व सपोर्ट करतो....तुम्ही किती चांगले काम करता....तर ते बाहेर जायचं काय ठरवलं? "तो पुन्हा मूळ पदावर आला होता.

"मला समजलं नाही, तुम्हाला काय म्हणायचं आहे ते? स्पष्ट बोला."

"किरण मी जरा बाहेर जाते. मला एक कॉल करायचा आहे अर्जंट...एक्सक्यूज मी".:योजना बाहेर गेली.

"त्याचं काय आहे मॅडम..इथे नीट बोलता येणार नाही. बाहेर जेवूया आणि व्यवस्थित बोलूया."

“ठीक आहे मी आणि माझे काही सहकारी येतील.”

“जास्त मॉब नको. तुम्ही आणि...ह्या महिलाही चालतील.”

बचत गटाच्या बाईला तशी कल्पना दिली होती. त्यामुळे तिचा चेहरा रागाने लालीलाल झाला होता. तसा किरणने तिचा हात दाबून तिला शांत रहायची खुण केली. वेळ मारून नेत त्या तिथून बाहेर पडल्या.

“मी चालेल म्हणतो काय भडवा..दाखवतेच त्याला. चपलेनेच हाणते त्याला. “ती बाई भयंकर चिडली होती.

योजना पोट धरधरून हसत होती.

“किरण मी जाते त्याच्याबरोबर. माझी काही ना नाही. पण माझ्या पन्नाशीच्या बाईत तो काय पाहणार?...जरी मी हो म्हटलं तरी. “

त्या सगळ्या हसू लागल्या.

असले अधिकारी नेमताना कोणालाही कल्पना नसेल की या व्यक्ती याही थराला जाऊ शकतात. घाण तळाशी गच्च जाऊन बसते. वरवरचे नितळ पाणी दिसते. पण अशी वादळे येतात आणि सर्व गढूळ होते. समाजाला हे गढूळ पाणी पचवावे लागते.

“ही कीड कधी नष्ट होणार योजना? तुम्ही आम्ही मोजकेच कमी पडतो ग. असंख्य हात एकटवले पाहिजेत ह्यांना हाणण्यासाठी.”

काम अडलं होतं. गावच्या बायका आशेने बघत होत्या. ग्रामसेविका पण त्यांना दाद देत नव्हती. नाना बहाणे निघत होते. घोलपबाई दर दिवसआड चकरा मारत होती. किरणला टाळताही येत नव्हते. तिला कळत होते की त्यांचे शोषण चालले आहे ते. त्या निष्पाप महिलांसाठी पुन्हा त्या कार्यालयात जाणे भाग होते. यावेळी घोलपबाई बरोबर होती. परत तीच नजरेची घृणास्पद भाषा. जी फक्त स्त्रीलाच समजू शकते. “काय लक्षात आले ना?....'या वाक्याने तर तिचा मेंदू हलत होता. कोणी सहज जरी हे वाक्य उच्चारलं तरी किरणला झटका बसत होता. हे थांबवायचं तरी कसं? कदाचित भ्रम असेल. उगाचच स्वत:च्या मनाचा खेळ करून घेण्यात काय अर्थ आहे?

शहानिशा तर करायलाच हवी. मग जशास तसे वागू.....

“ठीक आहे सर, कुठे भेटायचं? ह्या ताई असतील माझ्या बरोबर. “

"ठीक आहे. माझ्या घरी भेटू. कल्याणला."

थोडा जीव भांड्यात पडला. घरी...म्हणजे परिवार आहे. घाबरायचं कारण नाही. उगाचच संशय घेतो आपण. पण यात आपलं काही चुकलं नाही. स्त्रीने पदोपदी सावध राहायलाच हवं. ह्या सर्व भुतावळीत तेवढं एक करणं तर तिच्या हातात आहे.

ठरल्याप्रमाणे एसटी स्टेशन वर बीडीओ ची गाडी त्यांना न्यायला आली. पण त्याआधी फोनवर झालेला संवाद तिच्या कानात गुंजत होता.

"तुम्ही गाडीत शांतच राहा. विचारलेल्या प्रश्नांचीच उत्तरे द्या. उगाच कोणाला संशय नको. तुम्ही पुण्यावरून आला आहात. माझे नातेवाईक आहात म्हणून सांगितले आहे. तेव्हा प्लीज शांत रहा."

पुन्हा शंका...एक क्षण तिला वाटलं, परत जावं. पण विचार केला की एकदाच काय तो सोक्षमोक्ष लावावा. ह्या माणसाची जिरवावी. एकतर आपली स्वत:चीही खात्री होईल. दुसरं त्या निगरगट्ट माणसाला ताळ्यावरही आणता येईल.

कल्याणपर्यंत ती व्यक्ती एक शब्दही बोलली नाही. घराजवळ येताच त्या अधिकाऱ्याने पाण्याची बॉटल आणि कोल्डड्रिंकची बॉटल विकत घेतली. त्या दोघीही आश्चर्याने एकमेकींकडे बघू लागल्या. घर असताना पाण्याचीबॉटल कशाला?! याच्या घरी पाणी नाही की काय?! दोघींनीही सावध पवित्र घेतला. त्याने ड्रायव्हरला पाठवून दिलं.

"उगाच ही लोकं नसत्या पंचायती करतात. नाव खराब होतं. "तो दात विचकून हसला.

घरात गेल्यावर लगेच लक्षात आलं की घरात कोणीच नाही. बायको नाही..मुलं नाहीत!!

"तुमची मिसेस कुठेय?"

"ती नुकतीच घर साफ करून गेलीय. पुढच्याच आठवड्यात आम्ही राहायला येणार आहोत. "

त्याला त्या दोघींचा संशय आला होता की काय कुणास ठाऊक..त्याने त्या दोघींच्या शबनम हाताने दाबून तपासल्या

"काय आहे ह्यात? "त्याने घाबरून विचारलं.

त्याला वाटलं छुपा कॅमेरा किंवा टेप रेकॉर्डर आहे कि काय? यांनीही चेहऱ्यावरचे संशयी भाव न लपवता पाण्याची बॉटल आहे म्हणून सांगितलं. त्याने संघटनेची माहिती विचारली. उगाचच गटांची

चौकशी केली. पण नंतर एकाच गटाभोवती गुरफटून राहिला. अन्य माहिती देईनाच. शेवटी दोघी बाहेर पडल्या. त्यानेही जिन्याची वाट धरली. वाटेत तो काहीही बोलला नाही. प्रचंड घाबरून गेला होता. पण जित्याची खोड..

"पुढच्या वेळी जेवणाची पार्टी करूयात. अजून एक व्यक्ती येईल. बाहेरून जेवण मागवू. मग सविस्तर बोलू. काय लक्षात आलं ना? "घोलपच्या मांडीला तो मांडी घासू लागला. ती चप्पल काढायला वाकली. पण रस्त्यात तमाशा नको म्हणून किरणने तिला गप्प बसवलं.

"आपल्याजवळ काही पुरावा नाही. हा काहीही बोलू शकतो. "काहीही न बोलता त्या तिथून निघाल्या.

त्यानंतर त्या बायकांच्या गटाचे काम करायला तो ग्रामसेविकेला विरोध करू लागला. गट विस्तार अधिकारीही हो ला..हो.. नाही ला नाही यापुढे सरकेना. बायकांना पूर्णपणे सक्षम करून त्यांना सर्व योजनांची माहिती द्यायची आणि त्यांनाच धाडसाने बोलायला शिकवायचे ठरले. अपेक्षित असर झाला. आदिवासी बायकांच्या व मराठ्यांच्या बायकांच्या गटाने ग्रामसेविकेला चांगलंच धारेवर धरलं. भर ग्रामसभेत तिला रडवलं. गावचे तळे साफ करण्याचे काम भांडून मिळवलं. संघटनेच्या सल्ल्याने त्या बायका परस्पर पंचायत समितीत जाऊन आपल्या अडचणी सांगू लागल्या हे यश असाधारण होतं., अबोल गटाला..शोषित गटाला वाचा मिळाली होती. त्यांचा विजय त्यांनीच मिळवला होता. ह्यांनी फक्त मार्ग दाखवला होता. पुढे जाऊन मत्स्य विक्रीचा उद्योग करून त्या गटांनी स्वतःच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून आणला होता. दरम्यान त्या बी डी ओ ची बदली झाली. स्त्रीसुलभ सहजतेने या सर्वजणींनी हुश्श केलं. अजून पुढे काय वाढून ठेवलं होतं काय माहित. असली गलिच्छ श्वापदे जागोजाग दिसत होती. पण आता बळ आलं होतं. एकीचं बळ.

_____XXX_____

## _____17_____

गिरिधर शांतपणे झोपला होता. पण किरणची झोप उडाली होती. रात्रीचे दोन वाजले तरी तिला झोप येईना. आजकाल ह्याला काय झालं होतं कोणास ठाऊक..तिला समजेनास झालं होतं. पूर्वीसारखा तो राहिला नव्हता. लग्न होऊन सहा महिने झाले होते. अजूनही पाळी चुकली नव्हती. पण हेही कारण असू शकत नव्हतं त्याच्या अशा विक्षिप्त वागण्याचं. आपल्या ह्या कामामुळे तर तो असा विचित्र वागत नसावा ना? पण त्यानेच तर शिकवलं होतं सारं..मग?! पण त्याचा पुरुषी इगो तर डोकं वर काढत नसेल ना? विचारांसरशी ती चमकली. एकटक त्याला निरखू लागली. किती बालिश नी गोंडस दिसतोय हा झोपेत. झोपेत असताना त्याच्या ओठाला विशिष्ट मुरड पडायची. ती तिला खूप आवडायची. आत्ताही त्याच्या ओठाची पापी घ्यायचा अनावर मोह झाला. पण त्याचवेळी त्याने कूस बदलली.

मगाशी ती झोपेतून दचकून जागी झाली होती. झोपेत हाताचा पंजा कॉटच्या कोपऱ्यावर मारला होता. मस्त गोळी तयार झाली होती. स्वप्नात ती आकाशात विहार करत होती. कसं नितळ आणि शांत आकाश होतं. निळाशार समुद्र डोक्यावर तरंगत आहे आणि ती खाली उभी राहून, मान थोडी वाकडी करून त्याकडे एकटक बघत आहे....पापणी न लवता. आपल्या बरोबर सफेद केसांचे पुंजके घेऊन तो निरंतर वहात आहे. या सॉसररुपी जगाच्या मधोमध ती हात पसरून उडण्याचा जसा अभ्यास करत आहे आणि अचानक शेकडो खेकडे तिच्या अंगावर चाल करून येत आहेत. तिने घाबरून हाताला झटका दिला. दुसऱ्याच क्षणी वेदनेचा जाळ डोक्यात घुसला आणि ती जागी झाली होती. वेदनेने तिची झोप पळाली होती.

कुठून येतात ही स्वप्ने? झोपायच्या वेळी तर दूरपर्यंत असे विचार मनात नव्हते...ना ही खेकड्यांना फिरायला परमिशन होती. त्यांना आपल्या अंगाखांद्यावर फिरण्याची परवानगी ती स्वप्नातही देऊ शकत नव्हती. मग हे विचार का आले? आपण काल दिवसभर दु:खी तर नव्हतो ना?..नाही...मग अत्यंत ख़ुशी?... इतकी पण नाही. कोणा दुसऱ्याच्या दु:ख्खाची बोच?..बहुतेक होय...काय होती ती?...आपल्याला गरिबांची सेवा करायला का मिळत नाही....ह्या विचारांनी आपण व्यथित होतो. या एका विचाराने तिच्या मनाचा कोपरा न कोपरा व्यापून इतकं विक्राळ रूप धारण केलं होतं....कि ज्या गोष्टीने तिला शिरशिरी येत होती, तीच गोष्ट करोडोच्या रुपात तिच्या अंगावर सरसरत राहिली होती...म्हणजे भयाच्या अंतिम सीमेपर्यंत पोहोचली होती. आणि जागे होता होता

पण जखमेच्या रुपात दु:ख देऊन गेली होती. पण विचार शृंखलेला मजबूत करून गेली. तिचं अंतर्मन तिला या कामापासून दूर जाऊ देत नव्हतं. मानवी मन सुखाला लवकर विसरून जातं. पण दु:खाला वर्गाच्या स्वरुपात साठवणूक करत आठवत ठेवतं. दु:खाची तीव्रता दुपटीने..तिपटीने वाढवून त्याला झिरपत ठेवतं....वारंवार. दु:खाच्या अनुभूतीमध्येच त्याला अतीव आनंद वाटू लागतो. आपलेही बहुधा असेच झाले असावे. आत्ताही आपल्याला काय आठवते? गिरिधर सोबत घालवलेले एकांतातले अविस्मरणीय क्षण? समृद्धी? त्याचे जीव तोडून प्रेम करणे? का आपण त्याच्या या विक्षिप्त वागण्याचे अवडंबर माजवत आहोत? सुख आणि दु:ख..दोहोतून जात असताना आपण तटस्थ भावनेने का बघू शकत नाही? आणि मग स्वत:लाच वेदना देतो. प्रत्यक्ष अप्रत्यक्ष स्वरुपात आपण स्वत:चेच नुकसान करून घेतो. पण अज्ञानामुळे ते जणू शकत नाही. आणि मग बोलून जातो...आत्ता आत्ता तर ठीक होतो..अशी काय जादू झाली? कोणाची नजर वगैरे लागली कि काय?...या संपूर्ण विश्वात आपण कणभरच आहोत किरण..पण त्याचवेळी आपण विश्वभरही आहोत. आपल्या विचार तरंगांनी त्यात बदल घडवून आणण्याची शक्ती आपल्यात आहे. आपण चांगल्या विचारांचं फौंडेशन पक्कं केलं पाहिजे. आपल्या विचारांचं एक संरक्षक कवच आपल्या भोवती तयार होईल. आपल्या सानिध्यात आलेल्या दुष्ट प्रवृत्तींना चांगल्या प्रवृत्तीत बदलतील. मग कोरसमध्ये प्रगती होईल. मग सुखाची झोप येईल आपल्याला. मग शरीरावर खेकडे सरसरणार नाहीत. किरण स्वत:शीच हसली.

' हे काय झाले आहे आपल्याला?! असा विचार कसा आणि कधीपासून करू लागलो आपण? गिरिधर नेहमी लेक्चर द्यायचा. सुरुवातीला ती कंटाळायची. पण नंतर त्याच्यावरच्या प्रेमापोटी तिला त्याचं बोलणं आवडू लागलं. नंतर तिला ते इतकं आवडू लागलं की ती ते त्याच्या नकळत रेकॉर्ड करू लागली. तो गेल्यावर ती ऐकत असे. त्याचे विचार केव्हा नसानसात प्रवाही होऊ लागले ते तिलाही कळलं नाही. आता त्याची पूर्ण कल्पना तिला आली. शिष्य तयार झाला होता आणि गुरूला त्याचाच त्रास होऊ लागला होता. ती त्याच्याच शरीराचा एक भाग बनली होती आणि गळू समजून तो कापू पहात होता. तिने डोळे मिटले तेव्हा डोळ्यांच्या कडा वाहू लागल्या.

_____XXX_____

______18______

घोलपबाई व सुनिता कांदेपोहे खात होत्या.  खूप दिवसांच्या उपाशी असल्यासारख्या खात होत्या.  किरणने पुन्हा प्लेट भरली.

"खूप आहेत. लागले तर अजून घ्या. "

"तसं नाही हो ताई...किरण..सॉरी, जीभ वळतच  नाही एकेरीवर  यायला. काल उपास होता ना. घरून निघतानाही काही खाल्ले नव्हते. खूप भूक लागली होती. शिवाय तू इतके टेस्टी कांदेपोहे बनवलेत की आवरतच नाही भूक. "

"खरेच मस्तच झालेत,  झणझणीत. "सुनिता म्हणाली.

"अजून देऊ?"

"नको बाबा, बस.  थँक्स."

"बरं काय काम काढलेत आज?  प्लीज, ती गटांची कामे करणे बंद केलंय मी.  मला धावपळ झेपत नाही. "

"काही गुड न्यूज? "सुनिता डोळे मिचकावत म्हणाली.

"छे हो,  तसं काही नाही. पण घराकडे दुर्लक्ष होतं. मग हे चिडतात. तुम्ही ते सोडून बोला."

"तुमच्याकडे पाच रुपयाची नोट आहे का? "घोलपच्या डोळ्यात चमक आली.

"पाच रुपये? पाच रुपये कशाला पाहिजे तुम्हाला? "

"बोल ना..आहे का?"

"अं..आहे. कालच ऑटोवाल्याने दिली होती. पण फारच नरम आहे. देते थांबा."

किरणने पर्स मधून पाचची नोट तिला दिली. ती निरखून बघत तिने तोंड वाकडं केलं.

"ही नाही ग..ज्याच्यावर पाच हरणांचे चित्र आहे ती. "

“म्हणजे?! “ती आश्चर्यचकित झाली. हे काय नवीन!!

“अगं ती नोट मला दिलीत तर पन्नास हजार देईन तुला. “

“काय sss?!!! पाच रुपयांचे पन्नास हज्जार!!! “ती जवळजवळ किंचाळलीच, “काय बोलता तुम्ही? हे कसं शक्य आहे? कोण मूर्ख आहे हा? पन्नास हजार देणारा?”

“आहे, तू सांग आधी.. आहे का?”

“पण अशी नोट तर मी खूप पूर्वी...म्हणजे माझ्या लहानपणी बघितली होती. माझे आबा पगार आणायचे, त्यात असायची. अंधुकसं आठवतंय मला.”

“तीच ती, आहे का? “

“नाही आत्ता कशी असेल?”

“बरं चार आणे आहेत काय?”

हिला भिक मागायची काय गरज पडली बरं? विचारांसरशी तिला हसायला यायला लागलं. बहुधा तिचे विचार घोलपने ओळखले असावेत.

“भिक नाही मागत मी. मी सांगेन तुला समजावून सगळं. “

“पण चार आणे? आहेत...मला चिल्लर जमा करण्याची सवय आहे. एका डब्यात जमा करते मी. आणते..”

“आण लवकर..”त्या दोघी उतावीळ झाल्या होत्या. डबा गादीवर उपडा करून त्या चिल्लर वर तुटून पडल्या. आता मात्र किरणला हसू आवरेनास झालं. ती पोट धरून हसायला लागली. पण त्या दोघींचे तिच्याकडे लक्षच नव्हते. चार आण्याला उलटं पालट करून त्या बारकाईने बघत होत्या. सर्व बघून झाल्यावर त्या निराश झाल्या.

“काय झालं? आहेत ना एवढे चार आणे. “

“१९७०-७१ च्या सिरीजचे नाहीत. '

“आता हे काय नवीन? घोलप बाई तुम्ही मला आज शॉक देण्याचं ठरवलंत कि माझी फिरकी घेताय? “

“नाही ग बाई, हे बघ ह्या ह्या चार आण्यावर वर्ष लिहिलंय की नाही? “

“हो मग? “

“ते विशिष्ट वर्ष असलं की हवं आहे त्या लोकांना. “

“कोणत्या लोकांना?”

“आहेत..१९७०,१९७१, १९६१, १९६२ अशी काही वर्षे टाईप केली असली की मागतील तेवढे पैसे देतात आणि पाच रुपयाची पाच हरणांची चित्र असलेली नोट मिळाली तर लॉटरीच लागली आपली. तुला मिळाली तर सांग. आम्हाला त्यातले १० टक्के दिले तरी बस आहेत. तुझ्या एवढ्या ओळखी आहेत तर बघ कोणाकडे तरी निश्चित असतील. “

“मस्करी करताय काय माझी ताई? “

“अगं खरंच..मी पूर्वीच तुला बोलणार होते. पण त्यावेळी आपली एवढी ओळख नव्हती. म्हणून धीर झाला नाही. आता तू आमची चांगली मैत्रीण झाली आहेस. तुला सांगायला काही भीती वाटत नाही. “

खरंच जर असं असेल तर. आपल्याला ती नोट मिळाली आणि ही बाई म्हणते त्याप्रमाणे जर पैसे मिळत असतील तर किती त्रास कमी होईल आपला. गिरिधरची वणवण थांबेल. किती कष्ट करतो तो. तो खूप खुश होईल. आपल्यावरची नाराजीही दूर होईल त्याची.

“असावेत..माझ्या ओळखीच्या लोकांना सांगते. “

“खरंच सांग. पण मला हे समजले नाही ह्या पैशाचं ते करतात काय? आणि कोण लोकं आहेत ही? एवढे पैसे कसे काय देतात? “

“हे पैसे पूजेसाठी वापरतात.”

“पूजेसाठी? कोणत्या पूजेसाठी? “

“ते सांगेन तुला. आधी नोट तर शोध. “ती सांगायला तयार नव्हती. अजून तिला किरणचा विश्वास वाटत नव्हता.

“ठीक आहे मी कळवेन मिळाली तर. “

त्यांनी पुन्हा चार आणे तपासले. नोटेचं पुन्हा पुन्हा बजावून सांगत त्या निघून गेल्या. संध्याकाळी गिरिधर आल्यावर तिने त्याला सर्व सांगितलं.

"तुला वेड लागलंय काय किरण? घरात एकटं बसून बसून तुझं डोकं खराब झालंय. मुल असतं तर त्याच्यात गुंतून राहिली असतीस. मग असल्या पांचकळ गोष्टींकडे लक्ष द्यायला तुला वेळ मिळाला नसता. "तो चिडून म्हणाला. नेमकं किरणच्या मर्मावर त्याने बोट ठेवलं होतं. तिचे डोळे पाण्याने डबडबले.

' यात माझा काय दोष?"

"तुझा काही दोष नाही. माझाच आहे. लोकांची पोरं बोट धरून फिरतात त्यांच्या आईबापाचे तेव्हा स्वत:तच काही कमी असल्याचा न्यूनगंड निर्माण होतो. "

"मग मी काय करू? मलाही वाटतं आई व्हावसं. पण...."ती रडायला लागली. त्याला खूप वाईट वाटलं.

आपण असं हिला दुखवायला नको पाहिजे होतं. हे काय बोलून बसलो मी? यात बिचारीचा काय दोष? इतका जीव लावते आपल्याला. पण ती समोर आली की चिडायला होतं. का ते कळत नाही. इतकं प्रेम करते की ... नाटक तर करत नाही ना असं वाटायला लागलं आहे आजकाल. साल्या इतक्या पोरी आयुष्यात आल्या..पण एकजात पैशासाठी नागड्या व्हायला तयार...झवाड्या साल्या. ही मिळत नव्हती तोपर्यंत तिच्या पाठीपाठी धावत होतो आणि आता आपली झाली तर संशय घेतो. काय झालं आहे आपल्याला? तिची तुलना इतरजणी बरोबर का करतोय आपण? गिऱ्या लेका, वेडा झालायस तू. होईल मुल कधीतरी. आणि नाहीच झालं तर जग उध्वस्त होणार आहे का? लगेच झेंडे गाडणार आहोत का आपण? च्यायला..स्वत:च्या वीर्याच्या मजबुतीचे पुरावेच मागायला लागलो की आपण. म्हणजे मादीने फक्त झवून घ्यायचे नि पिलावळ काढायची. आपण शिक्कामोर्तब करायला मोकळे!! साला आपण प्रेम करायला लायकच नाही. तुम्ही एकटेच बरे होतात. संसार करणं आणि तो केल्यावर यशस्वी करणं तुमच्या बसचं काम नाही. सुधर गिऱ्या..आता तरी सुधर. किरण सारखी जोडीदारीण मिळायलाही भाग्य लागतं. आयुष्यभर रांडा फिरवण्यात आणि बाटली ढोसण्यात वेळ वाया गेला तुझा. तिला सोबत कर, प्रेम कर. तिचे भाव विश्व उध्वस्त करण्याचा तुला काही एक हक्क नाही. त्याने तिला जवळ घेतलं. लहान मुलासारखी ती त्याला बिलगून रडू लागली. तो तिच्या डोक्यावरून हात फिरवत राहिला.

"किरण सोन्या माफ कर मला. मला काय झालंय तेच कळत नाहीय. कदाचित माझा पुरुषी इगो उफाळून वर आला असावा. तुला सर्व लोकं विचारतात, इज्जत देतात, कौतुक करतात..त्याने माझा इगो हर्ट झाला असावा. कोणीतरी तुला माझ्यापासून दूर नेतंय असं वाटत मला. तू तशीच...जशी लग्नाच्या वेळेस होतीस..तशीच हवी मला. अबोध, अजाण. पण मी स्वार्थी आहे. असा विचार करणं मला शोभत नाही. तुला जग खुले करून दाखवणंही हवं आणि वर तू अडाणीही असणं हवं. हे कसं शक्य आहे. तू खूप हुशार आहेस. तुला योग्य गुरूची गरज होती. मला अभिमान वाटायला पाहिजे होता की तू मला गुरुसमान मानतेस. मी खूप हलकट आहे गं "तोही गहिवरला, "हे बघ किरण, जग खूप खराब आहे. तुझ्यासारख्या स्त्रीचा इथे टिकाव लागायचा नाही. खाऊन टाकेल हे जग तुला. पावलोपावली नालायक लोक आहेत. तुला समजणारही नाही. हे नोटांचे प्रकरण मी खूप वर्षांपासून ऐकत आहे. पण मला नक्की सांगता येणार नाही.... की खरं काय आहे ते. गुंड प्रवृत्तींचे लोक यात इन्वोल्व्ह असतील. तुला झेपणार नाही हे सर्व."

"पण ती घोलप बाई म्हणाली की आपल्याला काही करावे लागणार नाही. फक्त नोटा तिला द्यायच्या. शिवाय खरं कारण काय असेल याचीही उत्सुकता आहेच. नक्की काय प्रकार आहे तेही कळून येईल. माझा या थोतांडांवर विश्वास नाही. पण या गोष्टीच्या मुळापर्यंत जाण्याची खूप इच्छा आहे."

"बघ तू ठरव काय ते. पण जरा जपून. तसेच काही वाटलं तर मला लगेच सांग...मागे फिर. माझा तुझ्यावर विश्वास आहे. पण तरीही तू यात पडू नये असं वाटतं."

"मी काळजी घेईन. तुम्ही चिंता करू नका. योजनाची मदत घेईन. "

"ठीक आहे, बट आय एम सॉरी किरण. पुन्हा अशी चूक होणार नाही. आय प्रॉमीस यू"

_____XXX_____

______19______

बऱ्याच प्रयत्नांनी किरणला एक पाच रुपयाची नोट मिळाली. ज्या स्त्रीने तिला दिली होती तिने तिच्या नवऱ्याला न सांगता आणली होती. नवरा दारू पिउन आला की हाताला जी वस्तू लागेल त्याने मारायचा. रक्ताचे ओघळ पुसायचं देखील भान तिला नसायचं. किरणने तिला थोडसं लपवून नोटेबद्दल सांगितलं तेव्हा तिचे डोळे आनंदाने लकाकू लागले.

"खरंच ताई मिळतील का पैसे? लई उपकार होतील बघा. मला जास्त काय नको. एक छोटंसं झोपडं घेईन आणि पोरींना शाळंत टाकेल बघा. धुणीभांडी करतेच आहे. हातपाय धड आहे तोवर काम करेलच. पण पोरींना शाळा शिकवणारच. होईल का हो? "

तिला तरी कुठे माहित होतं. घोलप म्हणाली ते तिलाही पटत नव्हतं. पण प्रयत्न करून बघायला काय हरकत होती. त्या गरीब बाईने तिला देव्हाऱ्यातली नोट आणि बरीच जुनी नाणी आणून दिली. त्यात जुन्या एक रुपयाच्या नोटा आणि वेगवेगळ्या देशांची नाणी होती.

"माझ्या नवऱ्याला छंद आहे हा. त्याला कळलं तर लय मारंल मला. पण काम नाही झालं तर आणून द्या हो. आणि मिळाले तर तुम्ही तुमचे काढून घ्या. "

"मी सर्व आणून देईन तुम्हाला. आधी बघू काय होतंय ते. लगेच विश्वास टाकू नका अशा गोष्टींवर. नाही झालं तर दु:खी होताल उगाच. "

"व्हईल व्हईल...देव आहे तुमच्या बरोबर. "

किरणला वाटलं उगाच नसत्या फंदात पडतो आहोत आपण. नाही मिळालं काही तर यांची हिरमुसलेली तोंडं बघवणार नाहीत आपल्याला. नोट हातात घेऊन तिने निरखून बघितली. खूप जुनी होती. पण सुस्थितीत होती.तीन उभी हरणे आणि दोन बसलेली हरणे स्पष्ट दिसत होती. गव्हर्नरचे नाव स्पष्ट दिसत होते. सी डी देशमुख...घोलप हेच तर म्हणाली होती. घोलपला फोन करण्याआधी तिने योजनाला फोन केला.

"योजना घरी येतेस का? ती नोट मिळाली आहे मला. "

“काय बोलतेस?! अगं किरण,  मीही काही माहिती काढली विश्वासू लोकांजवळ. ते म्हणतात नोट खरी असेल तर यू कांट इमेजीन..इतका पैसा मिळेल कि आयुष्यभर बसून खाऊ. मी लगेच येते.”

“घोलपला बोलवू का? “

“बोलव..तिच्या जास्त ओळखी आहेत.  महाचालू बाई दिसते. अशाच लोकांना अशा गोष्टींची जास्त माहिती असते.  मी आलेच अर्ध्या तासात “

घोलपला फोन लावल्यावर पलीकडून आनंदाने किंचाळण्याचा आवाज येऊ लागला.  खुपजणी असल्यासारखे वाटले.

“तुमच्या बरोबर कोणी आहे का?”

“अगं सुनिता आणि माझी एक मैत्रीण प्रमिला आहे. आणि मी तुला म्हंटलं नव्हतं...जी लोकं नोटा विकत घेतात ती पण आली आहेत. तू येतेस का माझ्या घरी? “

“मी नाही येऊ शकत. माझे पती संध्याकाळी लवकर घरी  येतात.  तुम्हीच या.”

“अगं बाई ये ना तू.  जास्त वेळ नाही लागणार.”

“ठीक आहे, येते मी. पण जास्त वेळ थांबणार नाही.”

“ये...आणि हे बघ,  त्या त्या नोटेला असं उघडं नको आणूस. “

“मग काय तिला कपडे घालून आणू?”किरण खळखळून हसू लागली.

“काय ग मस्करी करतेस काय?  “घोलपही हसू लागली. एवढ्या दिवसांच्या ओळखीतून दोघींची घसट चांगलीच वाढली होती.

“अगं ती नोट अशीच उघडी ठेवली तर तिची पॉवर कमी होते.  चालू टीव्ही समोर धरली तर तो बंद पडतो. टॉर्चजवळ नेली तर तो विझतो.  इतकी पॉवर असते त्यात.  कार्बन पेपर मध्ये गुंडाळून पर्स मध्ये ठेव. “

“ठीक आहे बाई.  येतो आम्ही.”

“अजून कोण आहे तुझ्या सोबत?”

“योजना “

"त्या म्हातारीला कशाला आणतेस? "घोलपचा स्वर चिडका झाला होता.

"अगं ती आमची कलीग आहे. तुझ्या आधी ओळखते मी तिला. "

"बरं बरं, पण तोंड बंद ठेवायला सांग तिला. उगाच पाचकळ पणा करू नकोस म्हणावं. आणि जास्त कोंडाळा आणू नकोस बाई. तेवढे जास्त वाटे होतील पैशात."

"म्हणजे? "तिने न कळून विचारलं.

"अगं पैसे पडले म्हणजे त्याचे त्या ठिकाणी वाटे होतात. तू घरी ये. समजावून सांगते. फोनवर बोलणे ठीक नाही. यात अडकू शकतो. '

"येते येते "तिने फोन खाली ठेवला. तिची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. पैसे पडतात म्हणजे?! हा काय प्रकार आहे. गेल्याशिवाय कळायचं नाही.

गिरिधरला तिने फोन करून हे सर्व सांगितलं.

' ठीक आहे ' म्हणून त्याने फोन कट केला. तो नाराज वाटत होता. काय करायला जावं तर त्याचा रोष...न जावं तर एक इंट्रेस्टिंग विषय जाणून घेता येणार नाही. जावंच....गिरिधरचा राग शांत करता येईल. पण कायअसेल ते जाणून घ्यायचंच. जे होईल ते होईल.

_____XXX_____

_____20_____

पॉश एरियात, अगदी सुसज्ज तीन बेडरूमच्या ऐसपैस घरात घोलप रहात होती. जमिनीवर उंची कार्पेट, दोन्ही बाजूला सोफे, छताला महागडी झुंबरं आणि घोलप खाली कार्पेटवर गाऊन घालून बसलेली. तिच्यापेक्षा ते कार्पेट बरं वाटत होतं. सुनिता आणि प्रमिलाही तिच्या बाजूला खालीच बसलेल्या होत्या. नेहमी असणारा मेकअप आज त्यांच्या तोंडावर दिसत नव्हता. बहुधा झोपेतून उठून आल्या असाव्यात. बाजूला पाचसहा माणसे बसलेली होती. तिला बघताच घोलप तोंड भरून हसली.

"ये ग किरण, आत ये...ये बाई बस. अगं राणी चहा कर गं मावशीला. "राणी..घोलपची पोरगी उठून आत गेली.

"बस बस, नोट आणली.?"

किरणने योजनाकडे बघितलं. वातावरण बघून तिला धडकीच भरली होती. योजनाने खुणवून तिला नोट द्यायला सांगितली. कार्बन पेपर मध्ये गुंडाळलेली नोट तिने हळूच तिच्या हातात दिली. कार्बन बाजूला करताच तिघी किंचाळल्याच. आजूबाजूची माणसेही खुशीत आली.

"दिखाओ मॅडम दिखाओ "

"अरे जाव रहमतभाई. हात नही लगानेका. "घोलप चवताळून ओरडली. किरण आश्चर्याने बघतच राहिली. घोलपच हे रूप नवीन होतं. एखाद्या हिंस्त्र श्वापदासारखे भाव तिच्या चेहऱ्यावर दिसत होते.

"पहले बोल, पैसा कितना देगा? "

"अरे मॅडम..गुस्सा कायको होताय. आधी बघू तर दे...नोट खरी हाय का खोटी. "

"ही हरणं दिसत नाही काय तुला? गाढवं वाटली होय? "

“ते खरं हाय… लेकिन टेस्ट तो लेना पडेगा ना..”

“आता टेस्ट म्हणजे काय? नोट खाऊन बघणार की काय?” योजना किरणच्या कानात पुटपुटली.

“शू ssss “किरणने हसून तिला गप्पं केलं

“टीव्ही लगाव.”त्या गोऱ्या, उंच रहमत भाईने हुकुम सोडला. टीव्ही लागताच तो नोट घेऊन टीव्ही समोर गेला. तोच घराची लाईट गेली.

“या खुदा!!!”तो ओरडलाच.

“नोट खरी आहे. अरे आधी बघ, लाईट आपलीच गेली का..बाकीच्यांची पण गेली ते. “तितक्यात लाईट परत आली. त्याने परत नोट टीव्ही समोर धरली. परत तोच प्रकार. आता मात्र सर्वांचे चेहरे सपाट झाले.

“दे ती नोट इकडे. “घोलपने त्याच्या हातातून नोट खेचून घेतली., “ए सुनिता तुझ्या पर्स मधून टॉर्च काढ. “

“काढते थांब.”तिने टॉर्च दिला. घोलपने टॉर्च पेटवून नोटेसमोर धरला. तर बॅटरी कमी झाल्यासारखी दिसू लागली.

“बघ ग, मी चष्मा नाही घातला. त्यामुळे नीट दिसत नाही. कमी झाल्यासारखी दिसते नाही?”चष्मा तिच्या डोळ्यावरच होता. पण कोणीही काही बोलले नाही.

“हो ना ग. पण खूप दिवस झालेत बॅटरी बदलून. “

“तुझ्या आयला लावला पठाण. “घोलपने शिवी हासडली. किरणला शॉकवर शॉक बसत होते. वेगळ्याच विश्वात तिला आल्यासारखे वाटत होते. इथून पळ काढावा का? पण नको. आधी खरं काय ते जाणून घ्यायला हवं.जोपर्यंत काही कमीजास्त होण्याची भीती वाटत नाही, तोपर्यंत ह्या गोष्टीचा पीछा सोडायचा नाही. योजनाही नाही म्हटलं तरी मनातून थोडी घाबरली होतीच. पण एकमेकींच्या सोबतीने धीर आला होता.

“लाईट दोनदा गेली. क्या करनेका बोलो. “घोलप बोलली.

“आपको आना पडेगा उधर.”

"उधर किधर?"किरण म्हणाली.

"हमारे ऑफिस, "

"ते कुठे आहे?"

"वो घोलप बतायेगी"

"तू गप्प गं..मी आहे ना."

"अगं पण..असं कसं जायचं आपण अनोळखी ठिकाणी? वेड लागलंय का? "

"अगं माझ्या घराजवळच तर आहे त्याचे ऑफिस. मी नेहमी जाते. उगाच घाबरतेस तू. मी आहे ना आणि नोट तरी त्याच्या हातात अशी कशी द्यायची? आपण सोबत असलंच पाहिजे. हम आयेंगे. कब चलना है?"

"कल सुबह"

"अभी क्यू नही?"

"नही अभी बॉस बिझी है. कल सुबह तैयार रहना. हम फोन करेंगे तो आना. लेकिन नोट को संभालकर रखना. नही तो पॉवर कम होगा तो कुछ नही मिलेगा. "

"हां हां ठीक है. अजून काही आणलं आहेस का तू? "

"हो काही कॉइन्स आहेत."

"अगं मग केव्हा दाखवणार? दे की इकडे. "तिने कॉइन्सचा डबा खाली अंथरलेल्या कापडावर उपडा केला.

सर्व लोक त्याच्यावर तुटून पडले. रहमत भाईने त्यातील निवडक कॉइन्स बाजूला करून उरलेले परत किरणला दिले.

"इनका कुछ काम नही. जिनका है उनको वापस करो."

"इसका क्या करोगे आप? "

"ये जो लालवाले कॉपर के कॉइन्स है ना, उसका पूजा में वापर होगा. तुम बैठेगा पूजा में? "रहमतने किरणला विचारलं.

"नही नही वो नही बैठेगी. तुम तिला काय सांगताय? मैं बैठेगी. तुम कितना देगा बोलो."

"जितना गिरेगा. वोह खुश होगा तो तुम मांगो उतना. लेकिन बॉस को दिखाना पडेगा. वोह तुम्हारा सातबारा का भी फोटो निकाल के भेजो."

"वो मैं बाद में भेजुंगी. अभी से कायको चील्लाता है...सबके सामने? रात को बात करूंगी. ये किरण जा तू. मी तुला रात्री कॉल करेन उद्या ये मात्र नक्की."

"मी ही नोट घेऊन जाते. "तिने नोट परत कार्बन मध्ये लपेटून पर्स मध्ये ठेवली.

"अगं राहू दे माझ्याकडे. कोणी दुसरी पार्टी आली तर दाखवायला बरं. "

"नको दुसऱ्याची आहे. माझी असती तर केव्हाच दिली असती. उद्या येते."घोलप आणि सुनिताचं तोंड बघण्यासारखं झालं होतं. त्या लगेच तिथून बाहेर पडल्या. बिल्डींग मधून बाहेर आल्या तर मीटर बॉक्स जवळ इलेक्ट्रिशियन उभा होता. कुतूहलाने किरणने त्याला विचारलं,

"लाईटचा काही प्रॉब्लेम आहे का भाऊ?"

"पाचव्या माळ्यावरील घोलप बाईच्या मीटरचा काही प्रॉब्लेम आहे. धूर निघत होता. झालं ठीक आता. "

ते मीटरचं शटर बंद करून निघून गेले. दोघीही एकमेकींकडे बघू लागल्या.

_____XXX_____

______21______

"जीवनात अनुभव संपन्न असणं खूप गरजेचं असतं. आपण आपल्यातच एक परिपूर्ण शिक्षक होतो. फक्त आपले डोळे, आपला आत्मा सजग असला पाहिजे. आपल्या आसपास घडणाऱ्या घटनांकडे बारकाईने बघता आलं पाहिजे आणि माझ्या आसपास घडणाऱ्या घटनांचा क्रम माझ्या लहानपणापासूनच सुरु झालं होता योजना." योजनाच्या मांडीवर डोके टेकवून किरण बोलत होती. योजना तिच्या केसांतून हळुवारपणे हात फिरवत होती.

"त्या घटना साध्या नव्हत्या योजना. त्यामुळे विसरताही आल्या नाहीत. आज मला कित्येक मैत्रिणी आहेत. पण त्या सगळ्यांची दु:खे मला माझीच वाटतात...परिचयाची वाटतात. त्यांच्यात सारखेपणा वाटतो. एकीची गोष्ट खूपवेळा ऐकल्यासारखी वाटते....पाहील्यासारखी वाटते. तिची मुळे दूरपर्यंत पसरल्यासारखी वाटतात. त्यावेळी अज्ञानामुळे त्या दु:खाची धग जाणवली नसावी. पण आता त्या घटना आठवल्या ना तर अंगावरकाटा येतो गं"

"खूप सोसलं असेल ना तू किरण?"

"हं...खूप..खूप बघीतलंही. त्यामुळेच कोणावर विश्वास ठेवावासा वाटत नाहीं. मी लहान होते ना त्यावेळी माझी एक मैत्रीण होती. आम्ही शाळा सुटली की खेळायला जायचो. त्यावेळच्या आयांना सातच्या आत घरात हा प्रकार माहित नव्हता. शिवाय मला तर कसलं बंधनच नव्हतं. माझा रंग त्यावेळी खूप काळा होता. "

"तू आणि काळी?!! "योजना आश्चर्याने म्हणाली.

"विश्वास नाहीं ना बसत? पण खरं आहे हे. जाडीही खूप होते मी. त्यामुळे घरचे सगळे बेफिकीर रहायचे. मुलांबरोबर गोट्या खेळणे, खप्पर लंगडी खेळणे..तुला शीगरुपी चा खेळ माहित आहे का?"

"हा काय प्रकार असतो?"

“अगं पाऊस पडून खूप चिखल झाला ना की लोखंडाची हातभर सळई घ्यायची नी चिखलात रुपवायची...खासकन..जोरात. सळई नीट उभी राहिली की जिंकलो. काचा जमवणं मला खूप आवडायचं. त्याचे पोपट, मोर बनवायचे. त्यावेळी बायका खूप हिरव्या बांगड्या घालायच्या. आत्ता सारखं नाही. ब्रेसलेट, किंवा एक सोन्याची बांगडी. माझी आईपण खूप बांगड्या घालायची. तिने बांगड्या फोडून मला द्याव्यात असं वाटायचं. किती विचित्र वाटतं नाही ऐकायला? पण आबा तिचं मनगट धरून मारायचा ना त्यावेळी त्या खळकन फुटायच्या. कधी उचलाव्याशा वाटल्या नाहीत.”त्या उदास झाल्या,

“आम्ही स्मशानात जायचो योजना. तुला माहित आहे मी कवटी घेऊन घरी आले होते. भाऊ आजारी पडला तेव्हा आईला वाटलं भूत लागलं. त्याला फ्लू झाला होता. पण तिला कोण सांगणार? असतं भूत तर का ऽऽ य पाहिजे ते दोरखंडाने बांधून मागितलं असतं. “

“इतकी डांबिस होतीस तू?! वाटत नाही तुझ्याकडे बघून. गिरीला माहित आहे हे सारं?”

“च्च...कधी नीट बोललाच नाही तो. सतत कसल्या ना कसल्या तरी तणावाखाली असतो तो. काहीतरी राहून जातं असं वाटतं गं. त्याच्याबरोबर असलं की खूप बोलायचं असतं मला त्याच्याशी. पण....”ती चादरीचे धागेउपसू लागली.

“पण गिरी असा नाही. खूप रोमांटिक माणूस आहे तो. आम्ही ओळखतो ना त्याला.”

“असेल..पण माझ्याजवळ आला की असे का वागतो? “

“ए...तू त्याला अरे कारे म्हणतेस. त्याच्यासमोर अहो जाहो...अहो..ऐकलंत का...लब्बाड आहेस. “

“योजना, मी मनात त्याचं एक चित्र उभं केलंय. सतत त्याच्याशी बोलते...बोलतं करते. तिथे तो मला खूप वेळ देतो. माझं ऐकतो...जसा माझं बालमित्रच. पण प्रत्यक्षात तो मित्र म्हणून येतच नाही गं. येतो तो फक्त नवरा म्हणून....थोड्या वेळेपुरता. खूप काही बोलायच्या आशेने जवळ जाते तर तो वेगळ्याच विश्वात मश्गुल असतो. इतर माणसे आणि त्याच्यात काही फरक वाटत नाही बघ. आईचा त्र्यागा आत्ता लक्षात येतो.” ती खिन्न झाली. तसे योजनाने विषयांतर करावे म्हणून म्हटले,

“खूप मस्ती केली असशील ना तू लहानपणी? “

“खूप खूप....अगं आमचा एक ग्रुप होता. मुलं काय करायची माहित आहे?...कबुतरांची अंडी पळवायची. त्यातला एक मुलगा अंड तोंडातच फोडायचा. आम्ही याऽक..याऽक करायचो. काजवे

पकडून बॉटल मध्ये भरायचो. मज्जा यायची. गुरखा दांडुका घेऊन मारायला यायचा की मग आम्ही धूम पळायचो. एके दिवशी त्याचा खून झाला. त्याच्या भुताच्या भीतीने आम्ही तिकडे जाणे बंद केलं.

त्या ग्रुप मध्ये माझी एक मैत्रीण होती...सेलिना. मस्त गुटगुटीत, गोरीपान, सुंदर. मी संध्याकाळी त्यांच्याकडे पिक्चर बघायला जायचे. आमच्याकडे त्यावेळी टीव्ही नव्हता ना. मला खूप आवडायची ती हलती दृश्य बघायला. तिची आई, बाबा,काका, तिचाभाऊ, मी व माझी बहिण श्यामा खाली पथारी मांडून बसायचो. तिची आई आम्हाला खाऊ द्यायची. तुला शॉक बसेल योजना. आम्ही त्यादिवशीही पिक्चर बघत होतो.जंगली पिक्चर लागला होता. तिच्या आईने मटण बनवलं होतं. आम्हाला द्यावं लागू नये म्हणून तिने सेलिनाला आत किचन मध्ये बसवलं होतं. मला बाथरुमला लागली म्हणून मी उठले. घर छोटं ग. सगळं दिसायचं. आतमध्ये सेलीनाचा काका सेलीनाचे खरकटे तोंड वर उचलून तिची पप्पी घेत होता. "

"बाप ऽ रे!! "

"मी लगेच श्यामाला घेऊन निघाले. पूर्ण दिवस हात पाय थरथर कापत होते. सेक्सचं ते पाहिलं ओंगळवाण दर्शन. अजूनही विसरता येत नाही. त्या दिवसापासून मी पुरुष जातीचा धसकाच घेतला. स्त्री असल्याची इतकी बोचरी जाणीव इतक्या कमी वयात झाली कि हे मी माझं भाग्य समजू कि दुर्भाग्य? मनात भीती बसली. आबा कोणी भयंकर प्राणी आहे असे वाटू लागले. तारुण्यात आले तेव्हा आपला नवरा असा नसावा. आपल्याला हवा तसा..मनापासून प्रेम करणारा असावा असे वाटू लागले. पण आमच्या नवरा बायकोच्या नात्यात मला हवं असलेलं प्रेम कधीच दिसलं नाही. अगदी सुरुवातीला सगळं ठीक होतं. पण आजकाल तो बेडवरही अलिप्त राहतो. मलाच गरज आहे की काय इतकं वाटण्याइतपत. कुठेतरी मन गुंतवावसं वाटायचं. मुल असतं तर गुंतून राहिले असते. मग त्याच्या कामात रस दाखवायचे. नको ते विचार मनात येत नाहीत. पण त्या गोष्टीनेही चिडतो तो. त्याला हवं आहे काय? माझं असं स्वतंत्र अस्तित्व उभं राहणं नको आहे का त्याला. स्त्रीने स्त्री सारखंच चूल आणि मुल करावं असं वाटतं का त्याला? का नको मी भरारी घेऊ? जगाला जाणून घ्यायच्या इछेचामी का गळा दाबू? तो त्याच्या जुन्या नात्यातून बाहेरच यायला मागत नाही आहे. मग मी त्याच्याशी असलेल्या तुटलेल्या, भेगाळलेल्या नात्यात भराव टाकत बसू का आयुष्यभर? सांग ना योजना, काय करू मी? माझं विश्व त्याच्याच भोवती फिरतं आणि फिरता फिरता मी बाह्य जगाचाही शोध घेण्याचा प्रयत्न करते. माणसांना स्टडी करायला आवडते मला. त्याच्या सुरक्षित बाहूत राहून मला ते शक्य होईल असे वाटते...तर तो बोलतो की असं बोलू नकोस. कोणी माझ्यावर

डिपेंड राहिलेलं मला आवडत नाहीत!! माझं दुखणं जग नाही योजना, माझं दुखणं गिरिधर आहे. जखम उलट्या दिशेने वाढत चाललीय आणि मला तिथपर्यंत पोहोचत येत नाही योजना. "

ती हमसून हमसून रडू लागली. योजनाने तिला घट्ट कवटाळून घेतले. ती काही करू शकत नव्हती. पण तिने गिरिधरशी  याबाबत बोलण्याचा निर्णय तिने घेऊन टाकला होता. त्याला रुचेल अशा भाषेत त्याची खरडपट्टी काढणे अत्यंत गरजेचे होते.

बराच वेळ त्या दोघी शांत बसल्या होत्या. किरण हळूहळू सावरली होती.

"योजना,  एक विचारू?'

"विचार ना.."

"योजना तू पुन्हा का गं लग्न नाही केलंस? सुखी झाली असतीस"

"आता काय दु:खी वाटले की काय तुला मी?!"ती आश्चर्याने म्हणाली.

"नाही तसं नाही...पण जोडीदार हवाच गं....उतार वयात एकटेपणाचं फिलिंग नाही येत?"

"इथे एकट वाटतंय कोणाला. मी मस्त एन्जॉय करतेय माझं लाइफ. कोणाची कटकट नाही की हुकूमशाही नाही.  आपल्या मर्जीची मलिक."

"पण किती दिवस? जेव्हा थकशील तेव्हा सोबत लागतेच. "

"मग बाहेर काय माणसांचा अकाल पडलाय?"

"पण आपलं ते आपलंच ना गं...?"

"किरण...किरण..हे सगळे आपले मानसिक लोचे असतात. मानलं तर कुत्री मांजरीही लळा लावून जातात. नाहीच मानायचं ठरवलं तर जन्मोजन्मीचे वायदे घेणारे नवरा बायकोही एकाच छताखाली कट्टर दुष्मनाप्रमाणे सुखैव नांदतात. जगालाच आपलं मानून बघ. मग कुठेही तू एकटी पडणार नाहीस.  कोणी असो वा नसो...कोणी मानो वा ना मानो.  नाती चुटकीसरशी निर्माण होतात आणि खेळत खेळत तुटतातही. गुंतून राहिलं की संपलोच आपण. "

"रागावणार नसशील तर एक विचारू?"

"परमिशन काय मागतेस सारखी सारखी? नि:संकोच विचार."

“तू नवऱ्याला सोडलंस  का त्याने? “किरणने चाचरतच विचारलं. तशी ती जोरजोरात हसू लागली.

“ओह किरण, सो स्वीट ऑफ यू...उगाच नाही गिरी मरत तुझ्यावर. तुझाही काय दोष म्हणा असं विचारण्यात. मला बघून कोणालाही वाटेल की ही नवऱ्याला बोटावर नाचवणारी बया दिसतेय. पण चार भिंतींच्या आत...एका कोपऱ्यातल्या बेडरुममध्ये असलेल्या नाना कळा बाहेरच्यांना समजत नाहीत. त्या चौकोनी कुपामध्ये हिंस्त्र श्वापदांचा जो खेळ चाललेला असतो ना तो रस्त्यावर नैसर्गिकपणे चाललेल्या प्राण्यांच्या प्रणयापेक्षा खूप भयानक असतो. बेडरूमच्या आत असलेली डियर बाहेर येताच ऑर्डर पुरवणारी दासी होते. काम खल्लास की फुटास की गोळी. किरण तुला बच्चू झालं ना...मग तो मुलगा असो वा मुलगी..त्यांचं लग्न लवकर करून तक. त्यांचं ठरलं तर त्यांच्या मर्जीने किंवा तुम्हीच ठरवून टाका. उगाच लग्नाचं वय उलटून जाईपर्यंत थांबून राहायची गरज नाही. लग्नानंतर पाचच वर्षात केस पिकायला लागेपर्यंत थांबायचे म्हणजे!! उशिरा लग्न झाले म्हणजे प्रणय क्रीडेतला  प्रणय न रहाता स्त्री होते फक्त मुल जन्माला घालायचं मशीन व पुरुष कशी मुलं जन्माला घालता येतील या विचारात मग्न. आपण काय करतोय हे तरी संभोग करताना त्या बिचाऱ्यांच्या लक्षात येत असेल का नाही कोण जाणे? लोकांचे जाऊ दे..पण माझ्या बाबतीत म्हणायचं तर नवरा चढला की हा अंडं रुजेल का नाही या हिशोबानेच कार्यक्रम करत असावा हा विचार मनात घोळत असायचा.  “

“काहीतरीच तुझं...खूप टोकाचा विचार करतेस तू “

“टोकाचा!!  अगं बोलायचाच तो..उठू नको..पडून राहा..मुलं नकोत का तुला?...वय झालंय आपलं...आधार हवा...त्याचं गणित परफेक्ट असायचं. पन्नाशीला पोहोचेपर्यंत मुल हाताशी आलं पाहिजे. म्हणजे त्याच्यावर सोपवून आपण आराम करायला मोकळे. प्रणय काय असतो त्याच्याशी काहीही सोयरसुतक नाही.  निव्वळ मशीनगीरी. भावनाच नाही तर बी रुजून वृक्ष फोफावणार कसा? झक मारली आणि कुठून लग्न केलं असं झालं.  त्याच्या प्रयोगांनी आणि आसनांनी भंडावून गेले मी. शेवटी मीच त्याच्या पाठीवर हात थापटून म्हंटल...चुकीच्या ठिकाणी एनर्जी वाया घालवतोयस...दुसरी शोध..तुला यश येईल. त्यानेही आरामात ऐकलं आणि आम्ही विभक्त झालो. मजेत आहे मी.”

“आणि तो?”

“तो अजूनही प्रयत्न करत आहे...नेटाने”ती हसत म्हणाली. “एनी वे, तू माझं बोलणं जास्त मनावर घेऊ नकोस. गीरी तसा नाही. निदान तुम्हा दोघांकडे पाहून अंदाज येतोय. बाकी प्रत्येकाचं पर्सनल लाइफ वेगवेगळ असतं. उगाच स्वत:वरून अंदाज बांधण्यात काय अर्थ आहे.?”

किरण उदास झाली. उगाचच तिला योजनाच्या हसऱ्या चेहऱ्यामागे हताश स्त्री दिसू लागली...की ती तसा प्रयत्न करत होती. तिच्या दृष्टीने एकटं राहणारी स्त्री आनंदी राहूच शकत नव्हती. क्षणभर तिने मनाचा धीर करून कल्पना केली की गीरी आपल्याला खूप त्रास देतोय आणि आपण विभक्त होण्याचा निर्णय घेतलाय. दाराबाहेर पाऊल पडतंय...तिचे डोळे नुसत्या कल्पनेनेच भरून आले. योजनाने हसतच तिला जवळ घेतलं.

“माझं लाडकं कोकरू....तुला नाही जमणार ते...विचारही करू नकोस...त्यानेही तुला त्रास होईल. एका भऱ्यापुऱ्या परिवारातून आलेली मुलगी आहेस तू. घराचे रणांगण का झालेलं असेना...पण सुरक्षित चौकटीत होतीस तू. लग्न झालं तेही गीरी सारख्या हळव्या माणसाशी. वरून कठीण वाटणारं व्यक्तिमत्व आतून रडूबाई आहे. खूप हळवा आहे तो. तुही तशीच. म्हणून तर खरी अडचण होत आहे. दोघेही खरे व्यक्त होत नाही एकमेकांसमोर. तुला तो मित्र म्हणून हवाय...पण प्रेझेंट होतेस बायको म्हणून...आणि त्याला तू हवी आहे मैत्रीण म्हणून..पण तुला कसं सांगावं या लाजेखातर नवरेशाही गाजवण्याचा अभिनय करतोय. भातुकली भातुकली खेळताय काय गं तुम्ही?”किरणने मान खाली घातली “अवघड आहे बाई!!”

“पण योजना तू मोठ्या परिवारातली आहेस ना...चांगलं दहा जणांचं कुटुंब होतं तुझं... “

“दहा नाही..अकरा..हम दो, हमारे छे आणि आजी आजोबा व आईचा भाऊ...दहावीत शिक्षण सोडलं...सोडावंच लागलं. वडिलांना अर्धांगवायूचा झटका आलेला....होतं नव्हतं ते सगळं संपलं. पडेल ते काम केलं. प्रत्येक स्त्रीला येतात ते सगळे अनुभव मला पण आले. एक बॉस तर पिक्चरला चल म्हणाला. म्हंटलं असा तर स्वत:चे पैसे खर्च करून बघता येत नाही...मजा करूया म्हणून जायचे. एक दिवस पैसे देतो म्हणाला. कपडेही घेतो, राशन भरून देतो...जीवाची तगमग होतेय म्हणाला...ती शांत कर. गरम चहा त्याच्या विजारीत ओतला. आ वासलेल्या वेटरच्या हातात पैसे कोंबले आणि बाहेर पडले... ते थेट बापासमोर जाऊन उभी राहिले. माझं लग्न करून द्या म्हणाले. तुमचा सांभाळ करणं स्त्रीचं शरीर घेऊन जड जातंय. लग्नानंतर तुमची सोय बघेन म्हणाले. त्यांनी कुठून तरी शोधून आणला. मी पण जास्त चौकशी न करता त्याच्याशी लग्नं केलं. त्यावेळी विचार जहाल होते ना माझे...कोणीही नवरा का असेना, करणार तर एकच गोष्ट ना माझ्याबरोबर. पण इथेच मार खाल्ला मी. पहिल्याच रात्री त्याने डायरेक्ट निरीलाच हात घातला. आता हा रेप करतोय की काय

वाटलं. जास्त नाही पण एक वर्षाच्या आतच विभक्त झाले मी. सुटले...बघतेस काय अशी माझ्याकडे आश्चर्याने...योग्यच केलं मी. अजून दोन वर्षे जरी त्याच्याबरोबर काढली असती तरी चिपाड हाती राहिली असती. आपण बायका जबरदस्तीने लादून घेतो स्वत:वर हे नातं. कोणी अवार्ड देणार आहे का सतीसावित्री ठरलो म्हणून? "

"पण समाज..."

"समाज गेला......कोणाला काहीही पडलं नसतं. इतका वेळ कोणाकडेही नसतो किरण. प्रत्येकाला स्वत:च्या पंचायती काय कमी असतात? म्हणूनच ते एंटरटेनमेंट शोधत असतात. सिनेमा खल्लास की परतले आपापल्या घरी त्यांचा सिनेमा सुरु करायला. "किरण अवाक होऊन तिच्याकडे बघत होती.

"डोस जरा जास्त होतो नाही?..."ती हसत म्हणाली. "पण माझं बोलणं तू जास्त सिरिअसली घेऊ नकोस. थोडीशी मलमपट्टी केल्याने जखम भरून निघत असेल तर करावी...उगाच मोठ्या ऑपरेशनची तयारी कशाला? काय?"

किरणने हात जोडून मान हलवली. दोघीही खळखळून हसू लागल्या.

_____XXX_____

## _____22_____

आठ जणांचं कोंडाळ टेबलाभोवती जमा झालं होतं. बॉस नावाची व्यक्ती समोरच्या खुर्चीत आरामात झुलत होती. त्याची पी ए त्याला खेटून लाडेलाडे काहीतरी बोलत होती. दुसरी बाजूलाच खुर्चीवर बसून डायरीत काहीतरी लिहित होती. किरणचे लक्ष सहज खाली गेलं तर ती चपापलीच. बॉसचा पाय त्या डायरीत लिहिणाऱ्या पोरीच्या पोटऱ्यावरून फिरत होता आणि ती निर्विकारपणे लिहित होती. आजूबाजूला कोणी बसलंय याची पर्वा न करता तिघांची कामे चालली होती.

"या थेरड्याने हे बघायला आम्हाला बोलावले का?"प्रमिला रागाने ओरडत म्हणाली. तसा तो बेशरमपणे हसला.

"खूप संतापी दिसते. घोलपबाई तू हिला कशाला आणलेस? तुला माझा स्वभाव तर चांगलाच माहित आहे. ही बघ कशी शांत आहे. काय नाव तुझं पोरी?"

"किरण,"

"छान आहे. कधी बघितलं नाही."

"प्रथमच आली आहे ती. साहेब फालतू गप्पा नंतर मारा. कामाचं बोलूया. नोट कधी आणतो तो? कधीचा घेऊन गेला आहे."

"येईल येईल..चेक नको का करायला?"

"मग इथे काय झालं? आमच्या समोर? "

"इथे हडळ उभी राहिली की ह्या भीतीने बेशुद्ध पडतील ना.."

"हडळ?!! "त्या किंचाळल्याच.

"बघितलं..मी काय म्हणालो होतो..."त्या दोघी सेक्रेटरी शांतपणे नेलपोलीश लावत बसल्या. त्यातल्या एकीने एक पेपर त्याच्याकडे सरकवला.

"हे काय? "

"गाऊनची बिलं"

"मी सांगितला तसाच घेतला ना? नाहीतर मागच्या वेळेसारखी साडी घालून यायचीस. "

योजना, किरण अवाक!! सुनीताला मजा वाटत होती. ती खुदुखुदु हसत होती.

"ही तुमची बायको आहे का?"किरण

घोलपने कपाळाला हात मारून घेतला.

"बायकोला कशाला? तिला गाऊन काय असतो ते माहीतच नाय. साली गाऊन मधी शिरली तर पाहिजे.

ही..ही..ही..ह्या माझ्या सेक्रेटरी कम सबकुछ आहेत. जा रे तुम्ही. वैतागणार तुम्ही...जा. पण संध्याकाळी या..नेहमीच्या रूमवर. हे घ्या पैसे "त्याने पाचशेच्या नोटांची बंडले दोघींकडे फेकली. तशा त्या चालत्या झाल्या.

"म्हातारा झाला..पण रग नाही गेली. "प्रमिला अजूनही तणतणतच होती. तिला बहुधा हे सर्व आवडत नसावं.

"ते हडळीच काय म्हणालात?"किरणने परत छेडलं.

"हडळ होय..ही बाजूची केबिन बघितली? तिथे आम्ही पूजा करतो. सर्व बंद असतं. तुम्ही बायका त्यावेळी थांबू शकत नाही. दारात उभी राहते ती. मला बोलावते. रात्रीच्या वेळी कोणी नसतं. पिस्तुलही काम करू शकत नाही तिच्यावर. जोरात रागावून ओरडावं लागतं...दमदार आवाजात. मग पळते. पण जास्त दूर जात नाही..पुन्हा येते. दरवाजात उभी राहून बघते मला. "

सुनीताला आता घाम फुटला होता. किरण दरवाजा जवळून बाजूला झाली. पाठीमागून आवाज आला तेव्हा दचकून बाजूला धडपडली. चायवाला पोऱ्या आला होता.

"चेष्टा चालवली आहे का आमची?"

"तू चेष्टा समजतेस?! अरे रोज दिसते ती मला. काळीजच मेलेलं आहे. आता काही वाटत नाही. "

तेवढ्यात नोट घेऊन माणूस आला.

' साहेब नोट असली आहे. बॅटरी विझते. "

"साला काय बोलतो. आण ती नोट इकडे. "त्याने नोट निट निरखून बघितली.

"घोलपबाय किती घेणार या नोटेचे बोल?"

' तू बोल किती देणार?"घोलप सरळ एकेरीवर आली होती.

"हे ऽ हे ऽ तू महा बदमाश आहेस. पन्नास हजार देईन."

"गांडीत घाल तुझ्या "तिने नोट हिसकावून घेतली,"चला ग, त्या भवान्यांच्या मांडीवर खेळत बस तू. म्हणे पन्नास हज्जार..येडझव्या साला. "फुटाण्यासारख्या शिव्या देत ती बाहेर पडली. पाठीमागून बाकीच्याही.

"शिव्या किती देते तू घोलप..या आधी असं कधी बघितलं नाही तुला. "

"मग काय आरती काढू त्याची? झवाडे साले. बाई बघितली की लाळ सुटते त्यांना. त्या भवान्यांवर लाखो उधळतील. पण अशा कामात बाई पुढे नको त्यांना. म्हणे पन्नास हजार..त्याच्या ऽऽऽ हे बघ किरण, तू घरी बस. माझ्या बरोबर राहिलीस की याहीपेक्षा घाणेरड्या शिव्या देताना तुला ऐकायला मिळेल. तुला झेपायच्या नाहीत. या गुंड लोकांच्यात वावरायचं म्हणजे चेष्टा नाही. जिभेवर गु घेऊन फिरावं लागतं. तेव्हा कुठे पैसा सुटतो भडव्यांच्या हातनं. नाहीतर कधीच सुरी फिरवतील ते "तिने मानेवरून बोट फिरवलं. किरणच्या अंगावर सरसरून काटा आला. मनात आलं की जाऊ दे ते नोट पुराण. आपण भलं, आपलं घर भलं....पण अजून खरं कारण कळलेलंच नव्हतं. अजूनही ती चाचपडतच होती.

"बरं बाई, तू बोल काय बोलायचं ते. पण आता तो थेरडा तर गेला हातनं. आता नोटेच काय?"

' चल घरी..एक माणूस आहे. त्याची रखेल माझी मैत्रीण आहे. ती करेल आपलं काम."

_____XXX_____

## ______23______

"ही सोनी "

सोफ्यावर जाडी, काळी, गुटगुटीत बाई बसली होती. तिचे हसू खूप गोड होते. किरणला ती खूप आवडली. किरणकडे बघून ती गोड हसली.

"नमस्कार"तिने हात जोडले.

"बघू तुमची नोट. "तिच्या समोरचा माणूस बोलला. गोरापान, उंच, पठाणी वाटेल असा पेहराव, अंगावर कापल्याच्या खुणा, नजर तीक्ष्ण. किरणने आवंढा गिळला, घोलपने नोट त्याच्याजवळ दिली.

"टेस्ट घेतली का?"

"हो..टीव्ही बंद झाला..बॅटरी विझली. पुन्हा बघ करून.."

"नको तुझ्यावर विश्वास आहे. "थेरडा काय म्हणाला? "

"पन्नास हजार देतो म्हणाला." घोलप

"मादरचोद...त्याला एक दोन पोरी दे...पैशाचा पाऊस पाडेल."

"दिल्या की दोन " घोलप

"त्या दोन मुली..सेक्रेटरी?! "सुनिता आश्चर्याने म्हणाली. घोलप कसनुसं हसली.

"नाही...म्हणजे....."

"म्हणजे तुम्ही ही कामे करता?! पोरींची दलाली!!!" किरण आश्चर्याने म्हणाली. तिला हा जबरदस्त धक्का होता.

"ओ बाई, "तो माणूस मधेच बोलला,"तो त्यांचा खाजगी मामला आहे...काय. पोट चालतं त्यांचं त्याच्यावर. त्यात तुम्ही तोंड खुपसू नका. तुम्ही पत्रकार आहात काय?"

"न...नाही.."किरण चाचरत बोलली.

“मग ठीक आहे. आणि असता तरी आम्ही घाबरत नाही. मोठमोठ्या ओळखी आहेत आमच्या. आमचं कुणीही काहीही वाकडं करू शकणार नाही. घोलप बाईचा नवरा कुचकामी आहे.  ती काय करणार? खायला पैका तर  लागतो ना? तिचं शिक्षण नाही. मग? हे करणार नाही तर काय? आणि त्यात वाईट काय करते ती? पळवून तर नेत नाही ना? मर्जीनेच येतात त्या.”

हा का तरफदारी करतोय?  किरणला काहीच कळेना. आपण नको त्या ठिकाणी तर नाही ना आलो?

' हे बघ घोलप बाई,  पन्नास हजार काय...पन्नास करोड मिळतील. पण त्यासाठी पूजेला बसलं पाहिजे. कोण बसेल?”

“अरे मी आहे की तयार.”

“तू नको.. तुला सातबारासाठी बसायचं आहे. “

सातबारा पुन्हा ऐकायला मिळालं तशी किरण सावध झाली.  त्यादिवशीही तो माणूस असंच काहीसं म्हणाला होता.

“हे सातबारा काय असतं?”

तसे ते तिघेही हसायला लागले.

“माझ्या त्या जागी ऑपरेशन झाले आहे.  टाके पडलेत. अशी स्त्री पूजेला बसवली जाते. मग देव खुश होऊन तिच्यावर पैशांचा पाऊस पडतो.”

“देवाला अशीच स्त्री का लागते? इतर का नाही?”

“अगं त्याची मर्जी..खास स्त्रियाच त्याला लागतात.  तरच  तो येतो. “

“देवाला स्त्री?!! असा कोणता देव आहे हा?”

“तो तुझं देव नाही बाई.. वेताळ.. भूतांचा राजा. “

“बापरे!!  हे काय बोलतेस तू!! ' किरण जवळजवळ किंचाळलीच.

“ही बघ घाबरली..”सर्व हसू लागले.

“अगं पण तुला कुठे पाठवतेय मी? तुला टाके आहेत का?”

"शी...किती घाण बोलतेस तू.."पुन्हा ते हसायला लागले.

"खरी पूजा कशी असते हे जर हिला कळलं तर भीतीने मरेलच ही."सोनी म्हणाली.

"हे बघ बंटी, काय करायचं ते तूच सांग."

"मी काय सांगू? पैसे पाहिजेत का पूजा करायची हे तुझं तूच ठरव. ठरल्यावर मला कॉल कर. मी लगेच व्यवस्था करतो. पाच दिवसात मामला सेट होऊन जाईल."

' किती मिळतील पण?"

"जेवढे पडतील ते पूजेला कोण बसणार त्यावर डिपेंड असेल. जी तयार असेल तिला चेक करण्यासाठी आमच्या बरोबर यावे लागेल. दोन म्हातारा म्हातारी आहेत, ते चेक करतील. "

"काय चेक करणार?"

"तिच्या शरीरावर कुठे डाग आहेत का? कुठे खुणा तर नाहीत ना? "

"कपडे काढून?"

"हो"

"सर्व?!!"योजना आश्चर्याने म्हणाली. दोघींचे डोळे विस्फारले गेले.

"हो..मी बाहेरच थांबेल. आत त्या दोघांशिवाय कोणी नसेल. पूजेसाठी बसणाऱ्या स्त्रीला पूर्ण पारखून घ्यावं लागतं. "

"बापरे!! भयानकच आहे सगळं. म्हणजे ती स्त्री त्या लोकांसमोर नग्नच होणार म्हणा की!"

"तसं नाही हो मॅडम, "सोनी मधेच म्हणाली,"त्या म्हातारा म्हातारीला काही दिसत नाही. आंधळेच आहेत ते जवळपास. पण त्यांच्याकडे अशी काही शक्ती आहे की त्यांना न बघताच सगळं कळतं."

"तरी पण.....कोण तयार होईल अशा कामाला? "

"होतात...खूप होतात. पैसा कोणाला नको असतो? गेल्याच महिन्यात एका एकोणीस वर्षाच्या पोरीला नेले होते. तिच्या घरी खायला अन्न नव्हते, बाप मेलेला...तिला सांगितले तेव्हा ती स्वतःहून तयार झाली. पण तिला बजावले होते की काही झाले तरी डोळे उघडायचे नाहीत म्हणून. पण पूजा

मध्यावर आली तेव्हा तिने डोळे उघडले. घाबरून ती बेशुद्ध पडली. देव संतुष्ट झाला नाही. फक्त एक लाख पडले. सर्व खर्च वाया गेला. पण ते एक लाख तिला देऊन टाकले. "

"ही कामे तुम्ही कुठे करता हो?"

"जंगलातली जागा निवडावी लागते. भाडे देतो आम्ही संबंधित लोकांना. सशस्त्र पहारा ठेवावा लागतो. कोणी पूजेत विघ्न आणू नये म्हणून."

"भर दिवसा?!"

"वेड लागलं आहे काय भर दिवसा करायला? मध्यरात्री करतो आम्ही हे सगळं. "

"मग इतक्या रात्री ती स्त्री येते तरी कशी? "

"आमची गाडी येते तिला न्यायला "

' आणि तिच्या घरची लोकं?"

"कधी ती सांगून येते.....नाहीतर काही बहाणा करतात. रात्री पूजा आटोपली की परत सोडतो आम्ही. जाताना पैसा भरभरून घेऊन जातात. अजून काय पाहिजे? "

सुनीताच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

' मग मी बसेल पूजेला. "

"तू?!!"बंटी खुशीत आला.

"हो, मला पैशांची खूप गरज आहे."

"अगं पण तुझा नवरा खूप कमवतो ना? तुला तर पैशांची काहीही कमी नाही. तुझा बिझनेसही चांगला चालला आहे."

"मला खूप पैसे हवेत. खूप श्रीमंत व्हायचे आहे मला."

"हे बघ नीट विचार कर. पुन्हा पूजेला बसल्यावर मागे फिरता येणार नाही."

"नाही फिरणार..मी तयार आहे."

“ठीक आहे..मग पुढच्या रविवारी तयार रहा. मी तुला त्या म्हातारयांकडे घेऊन जाईन. त्यांनी हो म्हंटले की पुढची तयारी सुरु करू. त्या आधी ही सोनी पूजेचा विधी आणि बाकी सर्व पूजेबद्दल माहिती नीट समजावूनसांगेल. मागाहून बोलायला नको की बंटीने काही सांगितलं नाही म्हणून. मी निघतो आता.. परवा एक पूजा आहे, त्याची तयारी करायची आहे. त्या बाईसोबत मी बसणार आहे पूजेला. एक पुरुष लागतो ना त्यासाठी. तुमचे फायनल ठरले की सांगा., बाय”

तो सोनीला तिथेच सोडून निघून गेला.

बराच वेळ झाला तरी कोणीही काहीच बोलेनात. सर्वांची जणू वाचाच गेली होती. घोलप सर्वात आधी सावरली.

“मी चहा ठेवते. कांदे पोहे करू का? भूक तर खूप लागली आहे. “सगळ्याजणींनी माना डोलावल्या.

_____XXX_____

_____24_____

"काय झालं तुझ्या नोट प्रकरणाचं? ' पेपर वाचता वाचता गिरीने हळूच विचारलं.

खरं काय ते सांगावं काय ह्याला? पण आत्ताच सांगितलं तर हा आपल्याला बाहेर जायला अटकाव करेल. सांगू...पण आत्ता नाही. नंतर...जेव्हा या सगळ्या गोष्टींचा छडा लावू...पण आत्ता नाही

"अजून काही नक्की नाही झालं. पण त्या लोकांनी ती नोट घेऊन पुढच्या आठवड्यात बोलावलं आहे. ती सुनिता आहे ना...जिच्याबद्दल मी तुम्हाला सांगितलं होतं……"

"हां..तिचं काय झालं? "

"ती तयार झालीय पूजेला."

"कसली पूजा? "

"त्या नोटेची पूजा करावी लागते. ती स्त्रीने करावी लागते. मग पैसे देतात म्हणे ती माणसं."

"कोण माणसं किरण? काय बोलते तू हे? तुला तरी कळतं का?"

"घोलप म्हणाली..."

"त्या घोलपच्या....हे बघ किरण, मला एवढंच कळतं की तू ह्या फंदात पडू नयेस. तुला काही झालं तर? मी कमवतोय ना? मग बसून खा की, नसते धंदे करायची काय गरज आहे? कोणासाठी करतेस तू हे? तुझ्या माहेरच्यासाठीच ना? "

"हे तुम्ही काय बोलताय?! मी असं कधी म्हटलंय की मी त्यांच्यासाठी करतेय?"

"मग कोणासाठी? माझ्यासाठी? मला कळत नाही का... साधं मंगळसूत्र पण घालू शकले नाहीत लग्नात. जेवणावळीच दूरच. तुला काय वाटलं.. मला कळणार नाही त्यांची अवस्था? पाच पाच पोरं बरी काढून ठेवलीत....त्यांच्या सुखासाठी मरतेस तू. दोन्ही बहिणींच्या लग्नाची जबाबदारी स्वत:च्या खांद्यावर उचलायची आहेत ना तुला...सक्षम खांद्यावर...."

तो तावातावाने बोलत होता. तसतशी किरण थरथर कापत होती. गिरीचे हे नवीनच रूप तिला बघायला मिळत होते. तो असा काही विचार करत असेल याची तिने स्वप्नातही कल्पना केली नव्हती.

इतकी घृणा बाळगूनहोता तो मनात?!! केव्हापासून? फक्त सहाच तर महिने झाले होते लग्नाला. तेही तो पाठीच पडला होता म्हणून. नाहीतर आपण नाहीच म्हणत होतो ना. लग्नावर आपला विश्वासच नव्हता. अरे देवा!! म्हणून हा असं वागतोय माझ्याशी?

"लग्न झाल्या दिवसापासून बघतोय. मी दारू प्यायला बसलो की तू काहीच बोलत नाहीस. पितोय तर पिऊ दे.. मरतोय तर मरू दे. तुझ्या चेहऱ्यावरचे भाव वाचता न येण्याइतका मुर्ख नाही मी."

"अहो पण तुम्हीच ऐकत नाहीत ना. तुम्ही पिणं बंद करावं म्हणून मी पण प्यावं का आता? तसा प्रयत्नही केला होता एकदा.. कोणती घरंदाज बाई करेल हे सर्व? "

"घरंदाज?! मी सर्व आयुष्य सांगितलं असताना का तयार झालीस माझ्याशी लग्न करायला? रोज रात्री बिछान्यावर मला बाई लागायची, हे माहित असूनसुद्धा? "

"का केलंत मग माझ्याशी लग्न? मी नाही म्हणाले होते ना. मग का लेटर पाठवलंत मला.?"

"रूपावर भाळलो होतो ना मी... कोणीतरी हवं होतं. पहिलं प्रेम भंगलं तेव्हा वाटलं होतं तू तिची जागा भरून काढशील. पण नाही..उलट तुला बघून मला तिची जास्तच आठवण येते. तुझ्याजवळ जरी आलो तरी तुझ्यात दिसते ती मला."

"मग यात माझा काय दोष? मला का बोल लावता?"

"तुला नाही दोष देत बाई...माझं नशीबच फुटकं. कुठून झक मारली आणि लग्न केलं असं झालंय."तो दरवाजा जोरात आपटून निघून गेला.

बराच वेळ ती खिडकीत उभी राहून रडत होती. खिडकीतून रेल्वे स्टेशन दिसायचं. रोज रात्री खिडकीची एक झडप मिटून ती येणाऱ्या जाणाऱ्या ट्रेनला बघायची. ट्रेन निघून गेली की रूळ क्रॉस करून येणारा गिरिधर दिसायचा आणि तिला खूप बर वाटायचं. हात उंचावून ती हलवायची. तोही हात हलवून प्रतिसाद द्यायचा. पण आजकाल तो प्रतिसाद देत नव्हता. ती रोज उभी राहायची तरी. आताही ती त्याला तरातरा रूळ क्रॉस करताना बघतहोती. पण त्याने मागे वळून बघितलं नाही. ट्रेन आली तशी निघूनही गेली. प्लटफॉर्म निर्मनुष्य झाला होता.

_____XXX_____

______25______

सुनिता...एकदम प्रॅक्टिकल... कुठेही इमोशनलपणाचा टच नाही. जे आहे, जसं आहे, तसं आहे. आत एक, बाहेर एक असा प्रकार नाही. कुठलीही लपवा छपवी नाही. मला व्यापार करायचाय. घास सरळ तोंडात जात नसेल तर वाकडा हात करून खायची तयारी आहे. तुम्ही उद्योग देत असाल तर त्यासाठीचे रग्गड कमिशन द्यायची तयारी आहे. ज्याला किंवा जिला बरोबर यायचं आहे, त्याने यावं. काम करावं, मोबदला घ्यावा...नाहीतर तुझा माझा मार्ग मोकळा. उगाच डोक्याला ताप नको. मोठी बिझनेस वुमन होण्याची सर्व लक्षणे तिच्यात होती. कोणी बरोबर असो वा नसो...तिची प्रगती कोणीच रोखू शकणार नव्हतं.

ती सुखवस्तू कुटुंबातली. स्वत: महिन्याला वीस तीस हजार कमावती... स्वकष्टाने.. स्वाभिमानाने. त्यासाठी अपार कष्ट घेत असलेली. अजूनही घ्यायची तयारी असलेली. पण एकच गोष्ट तिच्या आड येत होती... तिचं स्त्रीत्व. ती गरीब गाय असती तर प्रश्नच येत नव्हता. नवऱ्याच्या छत्राखाली सुरक्षित राहिली असती. पण उद्योगासाठी बाहेर पडल्यावर तिला कणखरपणाचं अवसान आणणं भाग होतं आणि नेमकं हेच आव्हानात्मक रूप समाजकंटकांना भुरळ घालत होतं. त्यांच्यातील पुरुषत्वाला आव्हान देत होतं. त्यांच्यातलं पौरुष उसळ्या मारत होतं. तिच्या वाटा या कचऱ्याने अडवल्या जात होत्या. त्या साफ करायला तिला कुणीतरी कणखर असं हवं होतं... मार्गदर्शन करणारं. उद्योग करण्याआधी तिने खूप कंपन्यांच्या खेटा घातल्या होत्या. इंटरव्ह्यू दिले होते. बरेच इंटरव्ह्यू दिल्यावर तिला एक भरघोस पगाराची नोकरी चालून आली. तिला इंटरव्ह्यूला बोलावलं होतं. गरज होती....पुरेसं शिक्षण होतं..हुशारी होती... आत्मविश्वास ओसंडून जात होता. सिलेक्शन व्हायला जे हवं होतं ते सर्व तिच्याकडे होतं. जॉब मिळायला काहीच हरकत नव्हती. ती फुल्ल कॉन्फिडन्स मध्ये गेली.

ऐसपैस केबिन, गुबगुबीत सोफे, मखमली कार्पेट, बंद काळ्या काचांचा दरवाजा, एसी केबिन... गटकन आवंढा गिळला गेला. हातापायांना कापरं भरलं. बॉस ऐसपैस बसला होता. चेहऱ्यावर तेच क्रूर हास्य...स्त्रीच्या शरीराचे लचके तोडणारं.

“तुमची अपेक्षा काय?”

"सर तम्ही सांगा..तुमचेही ठरलेलं असेलच. "

"इथे तीन हजार पासून तीस हजार पर्यंत आहेत. तुम्ही बोलाल ते मान्य आहे." नजर अंगाखांद्यावरून पाझरती. तेवढ्यात फोन वाजला.

"एक्स्क्युज मी.. वन मिनिट...हेलो... हां बोल....खूप दिवसांनी आठवण काढली... कामात होतो... काय चाललंय... इथून काम सोडलं तर विसरलीस कि आम्हाला... हेहेहेहे... नेहमीप्रमाणेच एन्जॉय... तिला काय कळतंय? पोरांच्या रगाड्यातून बाहेर यायला वेळ कुठे आहे तिला. दिवसभर गाऊन खोचलेला असतो तिचा. साला काय पण फिलिंग येत नाही... कधी येऊ?...पण चोवीस, पंचवीस, सव्वीस तुझे 'सेंटर' बंद असते ना?... सव्विसला उघडले कि येतो. हा हा हा... "तो जोरजोरात हसू लागला,"हां बोल" फोन ठेवत तो म्हणाला.

"काय ठरलं मग? "तो परत परत तिला नजरेने चाचपडत होता. आता ती खरोखरच गळाली. कितीही धीट असली तरी ती यावेळी एकटी होती. मेंदू झरझर काम करू लागला. मनाला येईल तो आकडा तिने अर्जावर टाकला. "कळवा"म्हणून ती उठून लगेच बाहेर पडली. मनात हजार शिव्या फुटाण्यासारख्या उडत होत्या. तिचा नाईलाज होता. तिच्यासारख्या अनेकजणींचा. ही बॉसची जमात तिच्यासारख्या अनेक जणींच्या मनात धडकी भरवते. मग मुस्लिम स्त्रीचा बुरखा सगळ्या अंगाला जास्त सुरक्षित वाटतो. एकीकडे स्त्री शिक्षणाचे बाळकडू अजीर्ण होईपर्यंत चाटवायचे. दुसरीकडे असले मस्तवाल पोसायचे.

"हे दुटप्पी धोरण थांबवलं पाहिजे....थांबवा रे...नाहीतर आम्ही पुरुषांना जन्माला घालणेच बंद करतो...साले..."सुनिता उद्वेगाने बोलत होती. इतका वेळ किरण आणि योजना तिची जीवन कथा ऐकत ऐकत स्तब्धपणे बसून होत्या. कधी ना कधी तरी त्याही या प्रसंगातून गेल्या होत्या. अर्धा स्कर्ट घालून शाळेला जात असताना पोटरीला बसलेले चिमटे...गर्दीत पार्श्वभागावर, छातीवर बसलेले दाब...कोणाला सांगणार? काय सांगणार? तोंड दाबून बुक्क्यांचा मार.

"पण सुनिता म्हणून तू पूजेला बसतेस? तो बंटी काय म्हणाला माहित आहे ना? त्याने तर अर्धेच सत्य सांगितलं आहे. पुढचं सत्य ती सोनी सांगेल तेव्हा कळेलच पण... ते काय असेल याची कल्पना येत आहेच. तू विचार बदल. तू एक स्त्री आहेस. तुझं आयुष्य वाया जाऊ नये असं वाटतं. "

"मग काय करू..बिझनेसमधला सर्व नफा नवरा काढून घेतो. हातावर घरखर्चापुरते पैसे ठेवतो. काय घ्यायचे झाले तर सतरा वेळा त्याच्यासमोर हात पसरावे लागतात. मग कधीतरी त्याला दया येते. म्हणजे मी मरमर मरायचं आणि साधा पिझ्झा खायचा झाला तरी शंभर-दोनशे रुपयांसाठी त्याची

विनवणी करायची? ह्याला आयुष्य म्हणायचं काय? त्याला विचारते का मी तुझा पैसा काय करतो ते? त्याच्या १/४ ही कमवत नाहीय मी... तरी काढून घेतो. माझ्या उद्योगावर बारकाईने लक्ष ठेऊन असतो. मलाही वाटतं छान छान रहावं, चांगले कपडे घालावेत...मनासारखं खावं प्यावं, एखाद्या दिवशी आवडीच्या हॉटेलमध्ये खाल्लं तर काय बिघडलं गं? "याचं उत्तर त्या दोघींकडेही नव्हतं. त्यामुळे त्या गप्पच राहिल्या.

' मी ठरवलंय, काय होईल ते होवो..मी पूजेला बसणार. मग देव येवो का भूत. त्याच्यापेक्षा भूत परवडलं. कमीतकमी ते बदल्यात पैसे तर देऊन जाईल. आयुष्य सुरळीत होऊन जाईल माझं. आणि तुम्ही मला अडवायचं नाही… सांगून ठेवते."

थोड्याच वेळात सोनी आली. नेहमीप्रमाणेच चेहऱ्यावर अघळपघळ हसू.

"काय चाललंय मैत्रीणीचं? "

"काही नाही गं..ये ना. काय घेशील? चहा की कोफी?"

"वाह! म्हणजे तू खास पुणेकरीण झाली की काय? चहा कॉफीवरच कटवतेस? भजीबीजी नाही का करणार? तुमच्या समोरच्या घरातून काय खमंग वास येतोय भजीचा "ती लगेच एकेरीवर आली.

"करते थांब "किरण हसतच किचनमध्ये शिरली. तशा तिघीही आत शिरल्या. सगळ्यांनी मदत केल्यामुळे लवकरच भजीचा आस्वाद घेत आला.

"मला जेवणच नीट बनवता येत नाही. नवरा उद्धार करतो खानदानीचा...भडवीला आईने जेवायला बनवायला शिकवलं नाही म्हणतो. "हे सगळं ती हसत हसत सांगत होती.

' सोनी तू एक स्त्री आहेस. आमच्यापासून काही लपवू नकोस. ही सुनिता तिच्या गरजांमुळे पूजेला बसायला तयार झालीय. कमीतकमी तिला तरी पूजेला काय होणार याची कल्पना असलीच पाहिजे. "

"हे बघ किरण, मी काहीही लपवणार नाही. पण सुनिता तुझ्यात हिम्मत असेल तरच तू पूजेला बस. आणि हिम्मतही वरवरची नकोय. "

"म्हणजे? असं काय आहे पूजेत?"

“सांगते, ही पूजा साधीसुधी नाही. जी स्त्री पूजेसाठी तयार होते तिची तपासणी केली जाते...त्या म्हाताऱ्या जोडप्याकडून. त्यांनी हिरवा कंदील दाखवला की तिला एक दोन लाख रुपये दिले जातात. त्याची तिने स्वत:साठी खरेदी करायची असते. तीन दिवस पूजा चालते. तीन रंगांच्या साड्या घ्यायच्या. प्रत्येक दिवशी वेगळ्या कलरची साडी नेसायची. त्याच्यावर घालायला सोन्याचे दागिने घ्यायचे. नखशिखान्त तिला मढवायची..नवीन नवरी सारखी. पहिल्या दोन पूजा झाल्या की तिसऱ्या दिवशी खरी महत्वाची पूजा.”

सर्वजणी कान टवकारून ऐकत होत्या. सोनीने एक नजर सर्वांवरून फिरवली. पाण्याचा एक घोट घेतला.

“या पूजेत एक पुरुष लागतो. पूजेला बसणाऱ्या स्त्रीला पुरुषाच्या मांडीवर बसवलं जातं....विवस्त्र.”

“का sss य “सर्वजणी किंचाळल्याच.

“शु ssss हळू, जोरात ओरडू नका.. लोकं ऐकतील ना. त्यापेक्षा मी नाही सांगत जा. “

“प्लीज सांग ना. खरं काय ते आम्हाला कळलं पाहिजे. “

“ठीक आहे आता मध्ये काही बोलू नका... नीट ऐका. तर त्या स्त्रीला त्या पुरुषाच्या मांडीवर बसवले जाते. दोघांना दोरीने बांधून मंत्र म्हंटले जातात. सर्व पंडित हवन करत मंत्रोच्चार करतात. पूजा सुरु असतानाच शेजारच्या खोलीत त्या दोघांना पाठवलं जातं. आणि कडी लावली जाते. सकाळी ती कडी खोलतात...तेव्हाच ती दोघे बाहेर येतात. येताना त्यांच्या थैल्या पैशांनी भरलेल्या असतात.”

“पण आतमध्ये घडतं काय रात्रभर?”किरणने घाबरून विचारलं. सोनी गूढ हसली.

“दोघांना आत बंद केलं तरी पूजा थांबत नाही. सुरूच राहते. आतमध्ये दोघे डोळे मिटून बसतात. त्यांनी डोळे उघडायचे नसतात. त्या खोलीत हळूहळू काळा धूर जमा होऊ लागतो. संपूर्ण खोली काळ्या ढगांनी भरून जाते. मग तो ढग त्या स्त्रीवर स्थिर होतो. त्या ढगाचे रुपांतर एका भूतात होते. जर त्या भुताला ती स्त्री आवडली तर त्या पुरुषाच्या अंगात ते भूत प्रवेश करते आणि त्या पुरुषाच्या माध्यमातून त्या स्त्रीचा उपभोग घेते. जर त्या स्त्रीने प्रतिकार केला नाही तर तो आत्मा खुश होतो. जोपर्यंत तो त्या स्त्री बरोबर रत होत असतो, तिच्या अंगावर पैशांचा पाऊस पडत राहतो. कधी शंभरांच्या नोटांचा खच, कधी हजारांच्या, कधी सोन्याची नाणी, कधी दागिन्यांची रास..बस त्या स्त्रीने शांत राहून सर्व सहन करायचे. जर तिने घाबरून डोळे उघडले तर सर्व पैसे कोळसा

बनतात आणि त्याची मर्जी फिरली तर तो त्या स्त्रीला कायमचे आपल्या बरोबर घेऊन जातो. कधी ते भूत एकटे असते, तर कधी संख्येने जास्त असतात. सकाळी उठल्यावर अंघोळ करून दोघांना पुन्हा प्रार्थना करावी लागते. त्या स्त्रीला ती मागेल तेवढे पैसे घेऊन जाऊ देतात. उरलेल्या पैशांचे वाटे केले जातात. जेवढे लोकं त्यावेळी पूजेला हजर असतील त्यांना वाटले जातात. पण नंतर तीन महिने त्या स्त्रीला तिचे घर सोडून बाहेरगावी जावे लागते...कारण त्याला ती इतकी आवडलेली असते की ते तिचा पिच्छा करत तिच्या घरापर्यंत जाते. फक्त तीन महिने ते तिथे फिरत राहते, तिचा शोध घेत. तोपर्यंत तांत्रिक लोक त्याला बॉटल मध्ये बंद करून कायमचे जमिनीमध्ये गाडून टाकतात. “

खोलीत स्मशान शांतता पसरली होती. प्रत्येक जण थरथर कापत होती. जणू कुणी अंगातले रक्तच शोषून घेतले होते. जीभ टाळ्याला चिकटली होती. सुनीताचे अवसानच गळाले होते.

“पैसे किती मिळतात. “ती चाचरतच म्हणाली.

“अनगिनत...करोडो..ते खुश झाले तर संपूर्ण खोली पैशाने भरते. “

“आणि नाही खुश झाले तर...”

“तर ते येतंच नाही.”

“भूत स्पर्श करते तेव्हा कळते का? '

“नाही...पण ज्या पुरुषाच्या अंगात शिरते त्याचा स्पर्श होतो. म्हणून काही स्त्रिया त्यांच्या मित्राला पूजेला बसवतात. जर भूत आलेच तर त्याच्यात शिरेल. मित्राचा स्पर्श नको वाटणार का तिला.? तिला कळतच नाही भूत आले ते. “

“ही पूजा कुठे होते? “योजना धक्क्यातून सावरली होती.

' कधी जंगलात..तर कधी रिकाम्या बिल्डींगच्या छतावर.. कधी पडकी मंदीरं, रात्रीची दोन नंतर पूजा होते...सकाळपर्यंत संपते. “

“आणि ती स्त्री मेली तर? “

“नाही मरत..तिला कळतच नाही. म्हणून तर एक पुरुष तिच्या सोबतीला असतो. मग तो तिचा मित्र असला तरी चालेल. आमचा बंटी बसतो ना सोबत. सुनिता बसणार असेल तर तो बसेल तिच्या सोबत. “

“जर पूजेला बसलं नाही तर नोटेचे किती मिळतील?”

"जास्तीत जास्त पन्नास हजार. पण तुला जर पूजेला बसायचं नसेल तर आम्ही दुसऱ्या बाईची व्यवस्था करू. तुला पूजा झाल्यावर पन्नास हजार देऊ. किरण कडची नोट तुझी आहे का?"

"किरणची.."

"अं...न...नाही. माझी पण नाही, एका गरीब बाईची आहे."

"मग तिला मिळतील. तुम्हा सगळ्यांना त्या पैशातला एकेक वाटा मिळेल.. पण जी पूजेला बसेल तिला अर्धा हिस्सा....बोल काय करायचे? "

"काय करायचे म्हणजे? काही नाही करायचे. वेड लागलं आहे काय? विषाची परीक्षा बघण्यासारखं झालं हे "किरण रागावली.

"भूत वगैरे काही नसतं. सगळा उल्लू बनवण्याचा प्रकार आहे हा. असं असतं तर सर्वच श्रीमंत झाले असते. बायकांनी वेश्याव्यवसाय केले नसते. भूताशीच संभोग करत बसल्या असत्या. "योजना म्हणाली.

' नाही तर काय..आम्ही कसे मानणार की असेच होते ते? "

"तुम्हाला पुरावा हवा काय? आता तुम्ही इतक्या चांगल्या मैत्रिणी झाल्या आहात की बोलायला काही हरकत नाही. शिवाय तुम्ही लग्न झालेल्या आहात. गेल्याच महिन्यात एक पूजा झाली. एका मुलीने तिच्या मैत्रिणीलाच तिच्या सोबत आणलं होतं. तिचा बंटीवर विश्वास नव्हता. दोघींना एकाच खोलीत ठेवलं. तेव्हा त्या मैत्रिणीवर भूत आलं. दोघींनी मस्त एन्जोय केलं. खूप पैसे पडले......पण एवढे नाही. शेवटी पुरुष तो पुरुषच. त्याचे शुटींग मी गुपचूप घेतले. तसे आम्ही घेत नाही..पण तो प्रकार खूप वेगळा वाटला म्हणून घेतलं. हा बघ....."तिने मोबाईल मधील एम एम एस दाखवला. दोन तरुणी लेस्बियन सारख्या चाळे करत होत्या."

"शी sss बंद कर तो विडीओ. नको ती पूजा बिजा...मी ती नोट परत देऊन टाकते. "

"वेडी आहेस काय?! तुला नको असली तर मला दे. मी तुला आत्ताच पन्नास हजार देते. माझा निर्णय पक्का आहे. मी बसणार पूजेला. पण मला थोडा वेळ हवा. भूताबरोबर शय्यासोबत करायची म्हणजे धीर गोळा करायला पाहिजे...इतकं सोपं नाही ते. माझ्या मनाची तयारी करायला मला थोडा वेळ द्या."

“इतका वेळ नाही आमच्याजवळ.  सहा दिवसांनी अमावस्या आहे.  हा काळ पूजेसाठी उत्तम मनाला जातो.  तोपर्यंत..म्हणजे तीन दिवसात सांग तुझ्या मनाची तयारी झाली तर..नाहीतर एक पोरगी आहे. ती बसेल  पूजेला.  तुम्हालाही बरेच पैसे मिळतील. तेही भरपूर असतात. पूजेच्या ठिकाणी जे जे असतात त्या सगळ्यांना मिळतात.आमची जबरदस्ती नाही. “

“तू का नाही बसत पूजेला? “किरण म्हणाली.

“मी बसले होते, पण माझ्यावर जास्त पैसे नाही पडले. फक्त दहा लाख पडले.  माझं काळं शरीर आवडलं नाही वाटतं त्याला.  ही ss  ही ss “ती खुदुखुदु लागली.  यावेळी मात्र किरणला ती खूप ओंगळवाणी वाटली.

“तुला भीती सोड,  पण थोडीशी देखील लाज वाटली नाही?”

“का वाटावी? चौदाव्या वर्षी माझ्या आईला माझं लग्न करून देताना लाज नाही वाटली? माझ्या पंधराव्या वर्षी एका पोरीचा बाप बनायला माझ्या तीस वर्षांच्या नवऱ्याला लाज नाही वाटली? नवऱ्याला बाहेर पाठवून  त्याच्या मित्राला माझ्यावर बलात्कार करण्याची लाज नाही वाटली? मग मलाच का वाटावी?..ही तुझी लाज.  माझ्याकडे पैसा असता तर ह्या सर्वांनी माझे हे हाल केले असते का? लाज वगैरे तुमच्यासारख्या  पैसेवाल्यांच्या तोंडी लावण्याच्या गोष्टी आहेत. आमच्या सारख्यांना फक्त पैसा तारतो...म्हणे लाज!! “रागाने ती निळी जांभळी झाली होती.,  “तुम्हाला बसायचे असेल तर बसा पूजेला..माझा वेळ वाया घालवू नका. दोन दिवसात फोन करा. नाहीतर दुसरी बघता येईल. येते मी”पर्स लटकवून ती निघालीही.

“थांब सोनी, अशी रागावू नकोस.. प्लीज. मी दोन दिवसांनी फोन करून कळवते.  दोन दिवस वेळ दे.  तोपर्यंत माझ्या मनाची तयारी होईल.  इतकं इझी नाही गं हे सगळं. “ सुनिता उदास होऊन म्हणाली.

“ओके..मी वाट पाहीन. हा माझा नं...कधीही कॉल कर. बाय फ्रेंड्स “ती निघून गेली त्या दिशेला त्या बघत राहिल्या.

“येते मी पण..नवरा आला असेल माझा.  फोन करेन मी तुम्हाला.  बाय..”

“बाय टेक केअर,  पूर्ण विचार कर”

“हो” सुनिताही निघून गेली.

“हे काय भयानक ऐकायला मिळतंय योजना. मला नाही वाटत हे सत्य असेल.”

“मलाही नाही वाटत. पण सोनी बाईमाणूस. ती कशाला खोटं बोलेल? “

' देव जाणे. “तेवढ्यात मोबाईल वाजला.

“हैलो, बोला घोलप बाई.. हे कोणत्या विश्वात आणून सोडलत हो तुम्ही मला?”

“अगं बाई जे आहे ते आहे. मी का बोलवते भूतांना? “

“अगं पण हे असं कधी पासून सुरु आहे?”

“खूप वर्षांपासून....तुला आत्ताच कळलंय इतकंच. मला तरी कुठे माहित होतं. सहा महिन्यांपूर्वीच माहित झालं. मी पण बसणार आहे पूजेला. फोटो पाठवून दिला मी. पन्नास हजार घेऊन येईलच बंटी

आता. हे बघ कोणाचाही फोन आला तर नोटे बद्दल सांगू नकोस. “

“पण मला कोणाचा फोन येईल? मी तर कोणालाच माझा नंबर दिलेला नाही. “

“या लोकांना नोटेचा वास बरोबर लागतो. तुझा नंबर मिळवणं जड नाही त्यांना. यांची खूप मोठी साखळी असते. ग्रुप असतात. ते करतील कॉल तुला पण नोट हातात द्यायची नाही हां..सांगून ठेवते. आधी मी सांगितलय तुला. मैत्री तुटेल बघ.”

“नाही गं, मला काय करायचंय. नोट कुणाची आणि भांडतंय कोण?”

“ठीक आहे, उद्या सकाळी भेटू मग आपण..बाय”

' कोण होती. घोलप? “

' हो”

“काय म्हणत होती? “

“अजून काय? नोट देऊ नको म्हणाली कोणाला”

“किरण काय भानगड आहे बघुयाच. या गोष्टीचा छडा लावलाच पाहिजे”

“म्हणजे काय पूजेला बसायचं?! वेड लागलंय काय तुला?”

“मी तसं कुठे म्हणतेय...फक्त हो म्हणायचं. अशी भुतं असती तर एव्हाना आपला भारत देश पैशात लोळला असता. रस्त्याच्या कडेला झोपड्यांची रांग नसती लागली. आपल्या आदिवासी बायका बायका फाटक्या लुगड्यात फिरत नसत्या बसल्या. पैसा भुकेपेक्षा मोठा नसून भूक पैशापेक्षा मोठी असते आणि गरीब माणूस पोटाची खळगी भरण्यासाठी काहीही करायला तयार होतो. “पुन्हा रिंग वाजली.

“कोण असेल? तू स्पीकरवर ठेव. घे फोन “

“हैलो..मिसेस माने बोलताय का? “पलीकडून पुरुषाचा स्वर.

“हो, मी मिसेस मानेच बोलतेय. आपण कोण?”

“मी राज”

“कोण राज? “

“राज...तुम्ही मला ओळखत नाही. पण मी तुम्हाला ओळखतो. “

“माझा नंबर कोणी दिला तुम्हाला?”

“ते महत्वाचं नाही. तुमच्याकडे पाच रुपयाची रेअर नोट आणि जुने कॉईन्स असल्याचे कळलं”

“हो..पण आम्हाला ते कोणाला द्यायचे नाहीत”

“म्हणजे तुम्ही पूजेला बसणार आहात तर? “

“नाही..असं काहीही करणार नाही. आम्हाला वेड नाही लागलं...भूतांबरोबर असलं काही करायला. ते धाडस आमच्यात नाही.”

“हा ऽ हा ऽ हा ऽ “पलीकडून राज का कोण जोरजोरात हसू लागला, “मग तुमच्या मैत्रिणीला तरी पूजेला कशाला बसवताय? तुमच्या सारख्या बायकांचं कामंच नाही ते. डबल इंजिन वापरायचं त्यासाठी.”

“डबल इंजिन?!!”दोघीही एकदम बोलल्या.

“योजना आहे ना जवळ तुमच्या.” आता मात्र दोघींनाही शॉक बसला. याला कसं कळलं?

“तुम्हाला कसं कळलं? “

' त्यात काय विशेष. मी सांगितलं ना मला सगळं कळतं ते. तिने कोणता ड्रेस घातलाय तेही सांगू शकेल. ग्रीन कलरचा ड्रेस घातलाय तिने. सुनिता आत्ताच गेली ना? "

"बापरे!!! आमच्यावर पाळत ठेवता का तुम्ही? विचार काय आहे तुमचा?"

"अरे अरे तुम्ही तर चिडलात. माफ करा...पण माझा तो उद्देश नव्हता. जर तुम्ही पूजेला बसणार नसाल तर माझ्याकडे एक मोठी पार्टी आहे. डबल इंजिन आपल्याला पूजेसाठी वापरता येईल. तुम्ही स्वत: बसण्याचीगरज नाही."

"डबल इंजिन काय असते?"

"मांडूळ...आमचा कोडवर्ड आहे तो. या लायनीत हेच शब्द वापरावे लागतात. "

"मांडूळ म्हणजे? "

"दुतोंड्या नाग...दोन किलोचा हवा असतो पूजेला. "

"त्याचा त्या भुताला काय उपयोग?"

तो हसू लागला.

"तुम्ही खूपच इनोसंट आहात. डबल इंजिन पूजेला ठेवण्याआधी त्याला उपाशी ठेवले जाते. पूजा सुरु झाली की पैसा त्याच्या पोटात जमा होतो. जेवढे त्याचे शरीर फुगेल तेवढा पैसा तुमचा. पण जर तो फुगून फुगून फुटलातर मात्र काहीच मिळत नाही. मात्र बाई पूजेला बसली तर याच्या कित्येक पट रक्कम मिळते. बाईचेच शरीर ते. भूतालाही वेड लावणारच. "

"मग तुम्ही पण ती पूजा करता?"

"हो पण आम्ही कोणा पुरुषाला बरोबर ठेवत नाही. "

"मग?"

"ती बाई एकटीच बसते पूजेला. तिने घाबरून जाऊ नये म्हणून तिला औषध देऊन बेशुद्ध केले जाते. मग तिच्या अंगावर एक सफेद चादर टाकली जाते. काळा ढग हळूहळू तिच्यावर येतो आणि पैसे पडायला लागतात. चादरीच्या आत कोणीतरी तिच्यावर असल्याचं स्पष्ट जाणवतं. त्याची आकृती तयार होते....चादरीच्या आत. भयानक आवाज यायला लागतात. आमच्यासारखेही घाबरून

जातात. त्यामुळे आम्ही बायकांना नेत नाही.रात्रीची वेळ ....जंगल...भयंकर वाटतं....भल्याभल्यांची फाटते. "

दोघींना दरदरून घाम फुटला होता.

"काय झालं..गप्प का झालात. घाम फुटला का काय? " तो हसू लागला.

"आणि आमच्याकडे जुने कॉइन्स आहेत त्याचे काय करायचे? "

"कोणते आहेत? "

"जे तुम्हाला हवेत ते आहेत. एलिझाबेथच्या बुचडा असलेल्या राणीचेही आहेत. कॉपरचेही आहेत. "

"त्यांची टेस्ट घेतली का? "

"कशी घ्यायची?'

"काचेच्या ग्लासात पाणी घ्यायचे. त्यात शाई टाकायची, पाणी पुन्हा सफेद झाले की समजायचे कॉईन रिअल आहेत. ती सर्व शाई ते शोषून घेतात. मग पाहिजे तेवढे पैसे देईन."

"ठीक आहे..आम्ही टेस्ट करून सांगतो तुम्हाला."त्या आता बऱ्यापैकी सावरल्या होत्या.

"ठीक आहे मी तुम्हाला फोन करेन.'

"तुम्ही नका करू...आम्हीच करू"

"ओके "त्याने फोन कट केला.

"योजना काय करायचं? मला तर काहीच सुचत नाहीय. "

"मला वाटते किरण, आपण खूपच डिस्टर्ब झालोय. आपण आजचा दिवस थांबूया. उद्या ठरवू काय ते. तुला काय वाटतं?"

"ठीक आहे मलाही तसंच वाटतं. मेंदू बधीर झालाय माझा. '

"एका गटाला भेट द्यायची आहे. मला बोलावलं आहे. येतेस का तू? थोडं विसरायलाही होईल तुलाही."

' नको गिरिधर रागावतील. "

"रागावतील!! पुन्हा अहो जाहो...!"

"चेष्टा नको करूस योजना...पण खरंच नको."

"गिरी नाही म्हणाला का? "

तिचे डोळे डबडबले.

' किरण काय झालं गं? "योजने तिच्या खांद्यावर हात ठेवला.

किरणने जे झालं ते सर्व तिला सांगितलं. ती अवाक झाली.

' गिरी असं कसं म्हणाला?! विश्वास नाही बसत. काय झालंय त्याला? मी बोलेन त्याच्याशी. आम्ही सर्व संघटनेचे सदस्य संध्याकाळी बैठकीला जाणार आहोत. मिटिंग संपली की मी काढेन विषय. डोंट वरी...तू हो तयार. बाहेर पडशील तर ठीक वाटेल तुला. इतर गोष्टीही विसरायला होतील."

"ओके..चल..मी तयारच आहे..अजून काय तयार व्हायचंय? मला थोडीच मेकअप वगैरे तयार करायचाय?"

"चल"

_____XXX_____

## 26

“किरण, आता आपण ज्या गटाला भेट द्यायला जाणार आहोत ना तो गट इतर गटांसारखा नाही.”

“मग?”

“रिक्षा '“त्या दोघी रिक्षात बसल्या.

“पोटासाठी शरीर विक्रय करणाऱ्या स्त्रियांचा त्यात अधिक भरणा आहे. सुरुवातीला कळलं नाही आम्हाला. पण जसजसा वेळ जाऊ लागला, तसं कळायला लागलं. माय गॉड!! काय त्या एकेक शिव्या..आम्ही तर गप्पगारच व्हायचो आणि त्या खदखदून हसायच्या. चेकाळून अधिकच बिभत्स घाण घाण बोलायच्या. पण किरण त्यावेळी त्यांच्या डोळ्यात वासना नसायची. परपुरुषाच्या स्वाधीन होतानाची अगतिकता नसायची. खळाळता प्रवाही झरा दिसायचा...वाट नितळ करत जाणारा. तुला सांगू, त्याच्या समोर उभं राहताना, बोलताना, वावरताना, मिटींग्स घेताना, इतर गटांमध्ये जाणवणारा हलकासा बांधीलपणा कधीच जाणवला नाही. खूप फ्री वाटतं त्यांच्यात असताना. ठरलेली वेळ कधी संपून जायची, कळायचंही नाही. मी नुसतं म्हटलं की भूक लागलीय..तर नाक्यावरचा वडापाव दोनच मिनिटात हजर होतो. आता तुला कळेलच. आपण ' अहो' चे ' अगं'कधी होतो कळतंच नाही. ना त्यांना..ना आपल्यालाही. स्त्रीचं एक वेगळं रूप आपल्यासमोर उलगडतं. त्यांच्या बद्दल मला घृणा कधीच वाटली नाही. यार, आपल्या बॉयफ्रेंड्सची चर्चा करायला त्यांना मीच योग्य वाटते.बरं, त्यांच्या बॉयफ्रेंड्सची स्तुतीही करता येत नाही आणि त्यांचा विरसही करता येत नाही. त्यांचं त्यांच्यावर खरंखुरं प्रेम असतं. फक्त त्याला मर्यादा नाहीत...सांख्यिकी. अगदी प्रत्येकावर त्यांचं प्रेम असतं. ”

“पण असे का?”

“आज चाललोच आहोत..तूच विचारून बघ. मला तर कधी त्यांनी सांगितलं नाही आणि मीही कधी विचारलं नाही.”

रिक्षा थांबली तेव्हा सर्व बायकांचा कोंडाळा त्याच्या भोवती जमा झाला.

“मॅडम आल्या..मॅडम आल्या. मॅडम, रिक्षाचे पैसे आम्ही देतो.”

"अगं नको..आहेत माझ्याजवळ."

"काय मॅडम! एवढी तरी करू द्या सेवा.."

"सेवाच करायचीय तर भैयाकडून वडापाव आण...गरमागरम. तुमच्याकडे आलं की मला खूप भूक लागते. जाडजूड फुगा करून ठेवणार तुम्ही मला."

सगळ्याजणी हसायला लागल्या.

"ह्या ताई कोण?"

"ह्या किरण मॅडम आहेत. आपल्या माने साहेबांच्या मिसेस. "सर्वांनी आश्चर्याने डोळे विस्फारले.

"अय्या..साहेबांच्या मिसेस?! किती सुंदर आहेत नाही!! अगं ये निशा, ताईसाठी एक थंडा मागव."

"प्लीज मला थंडा नको. मलाही खूप भूक लागलीय. मी पण वडापाव खाईन."

तशा त्या खूप खुश झाल्या.

"किरण ताई ...योजना ताई सारख्याच दिसतात. आत्ता आणते. अगं ये भवान्यांनो, ताईना आत न्या.. पंखा लावा. "

छोटासा टेबल फ़ॅन एका स्टुलावर ठेवून सुरु केला तर खडखड आवाज करत तो फिरू लागला. त्याच्या आवाजाने गोंधळात अधिकच भर पडली.

"तो पंखा बंद केला तर बरे होईल. तुमचा आवाज ऐकू येत नाही."

"बरं बरं "लगेच एका पोऱ्याने बटन बंद केलं. त्या जवळजवळ रस्त्यावरच बसल्या होत्या. झोपडीवजा घरात जर त्या बसल्या असत्या तर इतरांना बाहेरच उभे राहावं लागलं असतं. म्हणून दोन्ही खुर्च्या बाहेरच मांडल्या गेल्या. सगळ्याजणी त्यांना कोंडाळं करून बसल्या. इतक्यात निशा वडापाव घेऊन आली. ती झोपडी तिचीच होती. आठ बाय आठ फुटाची झोपडी. तीन माणसे एकाला एक लागून झोपली तर चौथा बसूही शकणार नाही. जेवण झोपडीच्या बाहेरच स्टोव्ह पेटवून बनवायचं. खाऊन झाल्यावर भांडी धुवून पिशवीत कोंबून ठेवायची. तिला भेटायला कोणी आलंच तर मुलं बाहेर निघून जायची.

“निशा कमावते किती तू दिवसाला?”

“दो टाइम का खाना निकल जाता है मॅडम. “

“आज का निकल जायेगा..फिर कल?”

“कल कोई दुसरा आयेगा. “

“अगर नही आया तो?”

“कैसे नही आयेगा? आताहीच ही. मेरे बगैर वो रह नही सकते.”

“कौन? “

“वो सभीच “

“सभीच?”

“हां सभीच..प्यार जो करती हुं”

“सबसे?!”

“हां “

“सबसे? एक के बारे में समझ में आता है..लेकिन सबके साथ? “

“सब पैसा देते है न मॅडम..एक को हां..एक को ना..नाइन्साफी है ना मॅडम..कोई खाना नही खिलाता. वो पैसा देते है तो खाते है...जिते है...अपना भी तो फर्ज बनता है...नाटक करूंगी तो मर जाऊंगी..वो पल वोहीच मेरा सब कुछ होता है...ऐसा समझाती हुं तो लगता है पाप नही कर रही हुं.. मेरा घरवाला मेरे साथ होता है ऐसा समझती हुं तो वो सब बुरा नहीं लगता.... भगवान के सामने हात जोडते हुए शर्म नही आती. “

स्त्रीचं अगतिकपण असहायपणे ऐकून घेणं एवढंच हाती होतं. पण त्यांना योग्य मार्ग दाखवता येऊ शकत होता. त्यांना जाणीव करून देता येऊ शकत होती की त्या ह्या परिस्थितीतून बाहेर येऊ शकतात. त्यांना मिळणाऱ्या कमाईतून त्या थोडे थोडे पैसे बाजूला टाकून स्वत:च्या पायावर उभ्या राहू शकतात. स्वत:चा उद्योग सुरु करून.

योजनाने तिच्या नजरेतले भाव वाचले असावेत.

"काही उपयोग नाही किरण..तू जो विचार करतेस तो प्रयत्न आम्हीही केव्हाच केलाय. त्यांनी पैसे जमवले होते. येथील स्थानिक राजकीय पुढाऱ्यांना भेटही दिली होती. मदत मागितली.. राजकारण्यांना संख्या दिसत होती. पैसा अमाप होता.. त्यांचं काही बिघडणार नव्हतं. पैसा मिळाला. जास्त थांबायची या गटाचीही तयारी नव्हती. त्यांनी शॉर्टकट शोधला. त्या लोकांच्या मदतीने जेवण बनवण्याचा उद्योग सुरु केला. भाड्याने गाळा घेतला. धामधुमीत उद्घाटन केलं आणि सात महिन्यात केवळ शंभर वडापावची ऑर्डर मिळाली. प्रत्येक ऑर्डर देऊ असे आश्वासन देणारे नेते निवडणुका संपताच विसरले...पद्धतशीरपणे.. नेहमीच्याच सवयीने. सभ्य त्यांना ऑर्डर देतील असे ह्यांना वाटले नाही. ज्या उत्साहाने त्यांनी काम सुरु केलं तो उत्साह लगेच थंडावला. त्यांना उद्योग करण्याची भीती वाटू लागली. त्यांचं कौन्सेलिंग करणं आम्हालाही खूप जड गेलं. त्यांना भीती वाटायला लागली होती. आपल्या हातून चूक झाली तर? अगं खिचडीचे मिळवलेले कंत्राट निविदा भरूनही केलं नाही त्यांनी. त्यांच्या ह्या भीतीमुळेच गिरीने ह्यांच्यासाठी खूप मेहनत घेतली आहे. त्याने खूप समजावलं... पण त्या उद्योग करायला तयार झाल्या नाहीत. त्यांनी पुन्हा त्याच जुन्या व्यवसायाला आपलंसं केलं होतं. आम्ही इथे येतो ते त्या बोलावतात म्हणून.. आपुलकीने.. प्रेमाने.. आणि या प्रेमापोटी कधीतरी त्या आमचं ऐकतील ही वेडी आशा आहेच. पण तोपर्यंत त्यांना हा धंदा करताना बघावं लागतंय. "योजना उदासपणे म्हणाली.

किरण त्या आतून मन पोखरलेल्या स्त्रियांचे हसरे चेहरे बघून विचार करू लागली...

' हे गल्लीच्छ काम करायला कोणती स्त्री मनापासून तयार होईल? कोणीही नाही...मग ती गरीबातली गरीब का असेना. परिस्थिती तिला ते करायला भाग पाडते...आणि हे सर्व करायला तिला तिच्या मनाची किती टोकाची तयारी करायला लागते. तिचा हा निर्णय तिच्यापुरता धाडशी असतो. आपल्यावर हा प्रसंग ओढवला तर....बाप ऽ रे..."ती नखशिखांत हादरली... कल्पनेनेच कापरं भरलं आपल्याला. मग यांना किती निर्ढावलेपण आणावं लागत असेल? यांना यातून बाहेर काढलंच पाहिजे. आता ती आपली गरज झाली आहे. आपण खूपच संवेदनशील आहोत. अलिप्त रहाता येत नाही आपल्याला. त्यामुळे ह्यांच्यासाठी काहीतरी केलंच पाहिजे. आपल्या मानसिक शांतीसाठी..थोडा स्वार्थ असाही.

_____XXX_____

_____27_____

कुलूप काढता काढता गिरीचा फोन आला,

“मला यायला उशीर होणार आहे. तू जेवून झोपून जा. माझ्याकडे दुसरी चावी आहे. वाट पाहू नकोस.”

आत शिरावं की नाही शिरावं..भीती वाटायला लागली. पूजेचं वर्णन नजरेसमोरून गेलं. अनामिक भीतीने आत जावसं वाटेना. योजनाला बोलवावं तर ती गिरिसोबतच होती. धीर करून दरवाजाच्या उंबरठ्यातून वाकून तिने लाईट लावला. तसा रूम मध्ये प्रकाश पसरला. आत शिरली तर बेडरूमचा लाईट बंद असल्याने तेथील बेड भयानक वाटायला लागला. आवंढा गिळत तिने आतील रूमची पण लाईट लावली. पटापट सगळे दिवेलावले. किचन, बाथरूम, टोयलेट..सर्वच. तेव्हा कुठे जीवात जीव आला. भूक खूप लागली होती. पण तिला एकटं जेवायची सवय नव्हती. स्वत:साठी काही बनवून खाण्याची इच्छाच होईना. दुध गरम करून त्यात हळद आणि साखर टाकली. सकाळपासूनच मळमळत होतं. त्या बायकांना खुश करावं म्हणून वडापाव खाल्ला तो अजून पोटात फिरत होता. दुध पिल्यावर जरा बरं वाटलं. टीव्ही लावला. तेच ते रटाळ कार्यक्रम..त्याच त्या सासूसुनांच्या सिरिअल्स. कधी बाहेर येणार बायका या चक्रातून देव जाणे. देव कशाला जाणतो? तो बसला असेल मजेत वर खुर्ची टाकून मजा बघत आमची. एकदा भेटला तर अशी खरडपट्टी काढेल त्याची... पण असेल तर भेटेल ना..

छे!! काय वैताग आहे. आपल्याला एकटं राहणंही किती जड जातंय. गिरीची किती सवय झालीय आपल्याला... एक क्षण जरी जवळ नसेल तर जीव कासावीस होतोय. पण मग आपली तगमग त्याला जाणवत का नाही? मुद्दामहून छळतोय का आपल्याला? आताशी फारसा जवळही येत नाही. आजकाल स्वप्नातच खेळ उरकून मोकळ्या होतो आपण. मग लग्न करायची गरजच काय होती. स्वप्नातच कोणाशीही लग्न लावून मोकळ्या झाल्या असतो. आबांनी गोंधळ घातला नसता... श्यामाने तिचं तुणतुण वाजवलं नसतं तर... तर काय? तरीही काहीही झालं नसतं. कोण तयार होणार होतं तुझ्याशी लग्न करायला किरण? आई प्रत्येकाला एकच सांगायची..फक्त पोरगी देईन. आम्हाला खर्च करता येणार नाही.... लाजेने चुरचुर व्हायला व्हायचं. आबा असे नव्हते. किती छान होते ते. लहानपणी गोष्टी सांगायचे. आपल्या हातात पैसे कोंबायचे आणि मटण आणायला पिटाळायचे. पैसे मोजायचे देखील नाहीत...किती आहेत ते. मच्छी मटण आणून द्यायचं काम आपलं. गुड्सा खूप आवडायचा. घेताना नीट पारखून घ्यायचो आपण. चपटा असला तर परत करायचो...मटणवाला

कौतुकाने हसायचा...ती आता आठवून हसू लागली. एखादी नळी तो फ्री द्यायचा. त्यावेळी गरमागरम नळीतून पडलेला मलिदा चपातीवर घेतला की उम्म्म... यमी... सतत नळीतून पडलेली धार.. वर चटणीचा गोळा जिभेला पाणी आणायचा. लसणाची खमंग तव्यावर परतलेली चटणी बनवावी तर आईनेच. आता एक तुकडाही तोंडात जाणार नाही इतके भटाळलोत. सभ्यपणाच्या, अति सुशिक्षितपणाच्या बुरख्यामुळे अनेक आनंदापासून आपण वंचित होतो. हे चांगलं, हे घाण, हे हवं, ते नको ..कोण ठरवतं? आपणच. जे दुसऱ्याचं अन्न ते आपलं विष कसं काय होईल? किंवा आपले उच्चभ्रू राहणीमान, खाणे पिणे इतरांना व्यर्ज कसे काय होईल? माणसाने...ढोंगी माणसाने, स्वतःच्या सोयीसाठी. स्टेटससाठी मारून ठेवलेल्या ह्या लक्ष्मण रेखा आहेत. त्यांच्यासाठीही...इतरांसाठीही.

डायरीत लिहून झाल्यावर तिने योजनाला फोन लावला.

' योजना..."

"किरण मी तुला उद्या कॉल करेन. गिरीशी बोलतेय प्लीज. "तिने फोन कट केला.

गिरी समजून घेईल ना? तिच्या बोलण्याचा परिणाम होईल ना? काय पण दिवस आलेत!! आपल्या नवऱ्याला दुसऱ्या कोणी समजावं लागतंय!!..तेही आपल्यासाठी! "ती खिन्नपणे हसली आणि परत डायरीत लिहायला लागली.

.....दुसऱ्याच्या दु:खाने द्रवीत व्हावं तरच मानवाच्या जगण्याला काही अर्थ आहे. अरे प्राणीमात्रातही भूतदया आढळते. दुसऱ्याच्या पिल्लांना दुध पाजणारी कुत्री त्या दिवशी बघितली....इथेही परत स्त्रीच. आपण स्त्री म्हणून स्त्री जातीचा कळवळा येतो असे नाही. पण ही भावना पुरुषातही असते. मग तिचा कचरा ही पुरुष मंडळी का करतात? का अती स्तुतीमुळे अजीर्ण होतंय की काय न कळे. निसर्गात:च कमकुवत असणारी म्हणून की काय स्त्री या भावनेने ओतप्रोत भरलेली आहे? ह्या विक पोइंटमुळे तरी तिला आदराचे स्थान मिळेल असा स्त्री हार्मोन्सचा उद्देश तर नसावा? विधात्याचे नाव घेणार नाही. कारण त्याला आपण मानत नाही. तो असता तर भूकबळीने लोकं मेली नसती. स्त्री रस्त्यावर नागवी केली गेली नसती. हजारो निराधार बालके पोट फुगून कचकड्या सारख्या निस्तेज डोळ्यांनी आयांची सुकलेली थानं ओढत बसले नसते. गरिबांची फाटलेली झोळी झरझरत ठेवून कोट्याधीशांच्या मालमत्तेवर पैशांचा पाऊस पडला नसता. विधाता जर आहे तर त्याला हे पाहून मजा वाटते म्हणायची. मग तो देव कसला? त्यापेक्षा आपण सामान्य लोक बरे. देवाला घाबरून का होईना दानपुण्य करतो. देव ही संकल्पना आपल्यापुरती तरी बाद झाली. पूर्वी वाटायचं..कोणीतरी येईल, आपल्याला तारून जाईल, संकटातून वाचवेल. आईचे संस्कार, वर

बाहेरचे संस्कार...घरात देव देव देव चा आलाप, बाहेर बाराही महीने चाललेलं ह्या ना त्या सणाच्या निमित्ताने चाललेलं अखंड कीर्तन. '

बाहेरच्या मंदिरात पुजारी तार स्वरात भजन म्हणत होता. मधेच खोकत होता. कर्कश आवाजात ओरडल्याने त्याच्या घशाला कोरड पडलेली होती. किरण हसून परत लिहू लागली.

' काय रतीब आहे! साईबाबाच्या मंदिरात गणपतीची आरती सुरु झाल्यावर आपल्याही मनात आपण नकळतपणे आरती बोलत आहोत. काय तोंडपाठ झाली आहे! लहान वयात इतका आरत्यांचा, श्लोकांचा अभ्यास मन लावून करायला कोणी लावला असेल? भूतदया कशाशी खातात याचं कोणाला घेणं देणं नाही..बाकी गेलं भाड में..पण या गोष्टी न चुकता झाल्या पाहिजेत. मतलबी राजकारणी.. भलेही नास्तिक असोत.. मतं पदरात पडून घेण्यासाठी हमखास सर्व देवांची पूजा करतील आणि हे सर्व अविरत कसं सुरु राहील हे पाहतील. मग कोणी दलिताची कन्या बलात्कारित होत असो..वा तिची नग्न धिंड काढली जात असो..या घटना तर होतच राहतात ना!..बरं आपणही 'छूत ची बिमारीची' लागण झाल्यासारखे डोळ्यावर कातडे ओढून बसलोत. काही खरं नाही बुवा आपले..आपलं जीवन आपणच उध्वस्त करण्याचा विडा उचललाय त्याला कोण काय करणार.'

डायरी बंद करून ती पलंगावर आडवी पडली. डोळ्यासमोर गिरिधरचाच हसरा चेहरा येत होता. सकाळी त्याने वळून देखील पाहिलं नाही. त्याच्याच विचारात डोळे आपसूक बंद होऊ लागले.

हळूहळू पलंगाखालून काळे ढग वर येऊ लागले. बघता बघता खोली काळ्या धुराने भरून गेली. हळूहळू काळ्या धुराने अक्राळ विक्राळ रूप धारण केले आणि तिच्या शरीरावर ती आकृती येउन थांबली. तिला डोके होते, हात होते, पाय होते..अधांतरी तरंगत लालबुंद डोळ्यांनी ती तिच्याकडे बघत होती. हळूच ती आकृती खाली आली आणि तिच्या संपूर्ण शरीराचा कब्जा घेतला. त्या काळ्या राक्षसाचे हात तिच्या सर्वांगावरून फिरू लागले. तिचा जीव घुसमटू लागला. सर्व शक्ती एकवटून तिने किंचाळून त्या राक्षसाला दूर ढकलले. ती जागी झाली. आपल्यावर कोणीतरी ओणवे झालेले पाहून ती घाबरून किंचाळली. तितक्यात गेलेली लाईट परत आली. गिरिधर तिला हलवून जागे करत होता. म्हणजे अंधारात आपण ह्याला भूत समजलो होतो तर? तिने न राहवून त्याला घट्ट मिठी मारली.

"किरण, काय ग झालं? किती घामाने भिजलीस तू. स्वप्न पडलं का? तरी मी सांगत होतो, त्या बायकांच्या नादी लागू नकोस. पण तू ऐकशील तर ना..हे घे पाणी पी."त्याने तिला पाणी दिले.

' जेवलीस?"

"हो...तू बस ना माझ्याजवळ..मला खूप भीती वाटते. असा एकट सोडून जाऊ नकोस ना मला...प्लीज मला जवळ घे.

तिला असं एकेरी बोलताना बघून त्याला खूप आवडलं. त्याने तिला उराशी कवटाळून घेतले. लाईट घालवला तरी आता तो जवळ असल्याने किरणला भीती वाटत नव्हती.

_____XXX_____

_____28_____

चौघीजणी बसल्या होत्या. घोलप बाई, किरण, सुनिता, प्रमिला... घोलपचा पारा आज जरा चढलेलाच होता. कारण होतं तिची नुकतीच यौवनात पाऊल ठेवू लागलेली पोर. किरण सोडली तर तिघीही याच समस्येने ग्रासलेल्या. भरीस भर म्हणून सोनीही आली. या अचानक उद्भवलेल्या मुद्यावर सर्वांची मते एकच. प्रत्येक मुद्यावर एकसाथ बरोबर....अगदी बरोबर. सर्वजणी शिकलेल्या..पण आत्ताच्या संसाराच्या ओझ्याखाली दबून चिवचिवत्या चिमण्या झालेल्या. पण एकत्र आल्या की पट्टीचा गुंडही शेपूट घालून चालू लागेल अशा जहाल. घोलपने बिस्किटांचा डबा त्यांच्या पुढ्यात आपटला.

"का गं मुले अशी करतात? घराबाहेर इतरांना हाड म्हणणाऱ्या आपण...घरात मुलं आपल्यालाच हाड म्हणतात. "

"आजकालच्या मुलांना खूपच अक्कल आलीय. खूप अडव्हांस झालीत ती. कॉम्प्यूटरचा जमाना आला आहे "

"मग कॉम्प्युटर आपल्यालाही येतो चालवायला. '

"पण त्यांच्या इतका नाही."सोनी म्हणाली.

"तू गप्प गं. "घोलप तिच्यावर खेकसली, "ते हात लावू देतील तर ना"

"तुला नाही कळायचं..पोरांना सांग....असा माझा नवरा पोरांसमोरच बोलतो. तोंडात मारल्यासारखं गप्प बसते. "सुनिता बोलली.

"ह्यांनाही कुठे काय बोलावं ते कळत नाही. एरवी बोलतातच. पण मुलांसमोर तरी गप्प बसायचं. आमच्यावेळी...."बोलता बोलता घोलप थांबली. हळूच पुढे म्हणाली,"असंच होतं "

चिवचिवणाऱ्या चिमण्या एकसाथ शांत झाल्या. जणू पहिलीने जखमेवरच हात ठेवला होता.

"आपण स्वत:ची..स्वत:च्या अशा आकांक्षांची आहुती दिली. पण परिणाम उलटाच झाला ना. आपल्याच परिवारात आपल्याला काही किंमत राहिलीय का?"

चौघींचे डोळे डबडबलेले. गंगा जमुना घळघळ वहात होत्या.

"माझं माझ्या आईशी काहीही वैर नाही. कसलाही राग नाही. पण रोज रात्री मी तिच्याशी काडकाड भांडते. निदान माझ्या मुलांना असं काही वाटत नाही. माझ्या आईचा नि माझ्या वडिलांचा सेक्स मी डोळ्यांनी बघितलाय. स्टार्ट टू एंड. अतिशय कमी वयात. त्यामुळे त्याचा इतका परिणाम झाला की माझ्या होणाऱ्या नवऱ्याबरोबर सतराव्या वर्षीच लग्नाअगोदर सेक्स करून मोकळी झाले. ही माझी चूक म्हणू का माझ्या आईची का माझ्या बाबांची? त्यांनी नाही काळजी घेतली..मी घेते..म्हणून नवऱ्याच्या लेखी मागासलेल्या विचारसरणीची काकूबाई होते. त्याला लवकर घरी यावंसं वाटत नाही. त्याला बोलूही शकत नाही. आई बापाचीच इज्जत काढायचा....काढतोही. खूप सहज उपलब्ध होणारं हत्यार आहे ते......आपले आईबाप. आख्खं घर एका बाजूला नि मी एका बाजूला होते. भावनांना आवर घालण्याचा मक्ता एकट्या स्त्रीनेच घेतला पाहिजे का? "सुनिता उद्वेगाने हाणली.

"तू गं बाई तुझ्या आईबापाचे बघितलंय. माझ्या तर मामाच्या पोरानेच सातवीत चुंबन घेतलं होतं. बोलू कोणाकडे? आईकडे? मामाकडे? चौथीत होते तेव्हा शेजारच्या पोराने त्याचं नळकांड काढून दाखवलं तेव्हा शिसारी आली होती. लग्नच नको वाटत होतं. मग माझ्या पोरीवर मी नजर ठेऊन असते तर आई 'वॉच' ठेवते म्हणून तिची तणतण त्यापेक्षा बरी वाटते. जग बदललं पण 'स्त्री जात' तर तीच आहे ना? गर्दीत छाती दाबतात म्हणून पोरीला भाजीही आणायला पाठवत नाही. ही कामे फक्त आईनेच करायची असतात असा समज करून घेऊन चहाचा कपही न उचलणारी पोरं... यांना धारेवर धरू तरी कसं? सवय आपणच लावून ठेवलीय ना."प्रमिला म्हणाली.

"पण यावर उपाय काय? हे असंच सहन करायचं?" किरणने विचारलं.

"मग काय करायचं? पोरींना या अक्राळ विक्राळ जगात तसंच सोडूनही देता येत नाही. " घोलप म्हणाली.

"सोडून द्यायला कशाला पाहिजे? धीट होऊ द्यात त्यांना." प्रमिला बोलली.

"म्हणजे त्यांनी हे सर्व फिजिकली जाणून घेतलं पाहिजे. फी न भरता शिकवणारी ही कायदेशीर संस्थाच म्हंटली पाहिजे. जनमताचा असा जबरदस्त पाठींबा असलेली सेक्स टीचिंग संस्था. "सुनिता उपहासाने हसली.

"त्यापेक्षा लग्नच करायचं नाही." प्रमिला रागाने म्हणाली

' मग शारीरिक गरजांवर कंट्रोल कसं ठेवायचं? " किरण न राहवून बोलली

“बरोबर...निसर्ग तर गप्प बसणार नाही..” प्रमिलाने तिचीच री ओढली

“त्यासाठी लग्नच केलं पाहिजे का? “घोलप हसत म्हणाली.

“छी..काहीतरीच बोलतेस तू..” किरण संकोचून बोलली. त्या विचारानेच तिच्या अंगावर शहारे आले.

“त्यात काय गैर आहे..सेक्स म्हटलं की गोंडस रुपडं समोर येतं..नि शिंदळकी म्हंटलं की घाणीत लोळल्यासारखं वाटतं का?”सोनी म्हणाली.

“नवरा सोडून इतर विचार करायचे संस्कार आपल्या भारतीय स्त्रियांवर होत नसतात गं...पचनीच पडत नाहीत.”किरण म्हणाली.

“तू मला सांग, कुठचा पुरुष स्त्री जॉबसाठी इंटरव्ह्युला गेली की फक्त चेहऱ्यावर नजर ठेवून असतो? कमरेखाली घसरत नाही? त्यांच्या यायला....कपडे असून नंग्या उभ्या आहोत की काय असं वाटतं त्यावेळी.”सुनिता चिडून बोलली

“कानाखाली हाणायची ना.. हात नाहीत का तुला? “घोलप रागाने बघत बोलली

“कोणाकोणाच्या द्यायच्या? उंबरठा ओलांडला की हे जळू जागोजागी विखुरलेले असतात. “ सुनिता

“मग सहन करायचे? हे होऊ द्यायचे?“कमीत कमी आपल्या वाटेला येत आहे असे दिसले तर प्रतिकार तरी करावा....आपला आपणच...कोणाच्याही मदतीची अपेक्षा न ठेवता.” प्रमिला म्हणाली.

“ती अपेक्षा ठेवूच नये. माकडांचा खेळ चालल्यासारखे बघे बघत असतात. आज सकाळीच एका भैयाला झोडला. अंघोळ करून चालले होते तर सकाळी सकाळी केलं का म्हणून टोन्ट मारला. मलाही देतेस का म्हणाला. आईशप्पथ असा चपलेखाली झोडला...साऱ्या शिव्या रित्या केल्या. पण एकही सभ्य पुढे आला नाही. बायकाही बघत राहिल्या. घरी जाऊन काहीच सांगितलं नाही. नवऱ्यानं दोन सबुरीच्या गोष्टी मलाच शिकवल्या असत्या. “किरण उदासपणे म्हणाली.

“हेच ते... पूर्ण कपड्यातही शरीराच्या चिंध्या करतात हे साले. नजर टोकदार सुयांसारख्या घुसत असतात शरीरात. म्हणूनच पोरींना जीन्स घाला पण शर्ट तरी ढुंगणाच्या खाली येऊ द्यात म्हणावं तर जुनाट विचारसरणीचे ठरतो आपण. पार चीर दिसेपर्यंत जीन्स घातली म्हणजे फ़ॅशन होते का गं?” घोलपने रागारागाने चिप्स तोंडात कोंबले

“वाट ओपनच की...भुकेली गिधाडे तयारच असतात. “ सुनिता उपहासाने हसली

“आपली तोंडे दिसतात. सकाळी पोरीला ओरडले तर काकूबाई म्हणून नवऱ्याने हेटाळणी केली. मग ढुंगणावरून साडीचा पदर घ्यायचा अट्टाहास कशासाठी? “घोलप चिडून म्हणाली.

“त्याला रिझवावं म्हणून सर्व तयारी करायची. मनात असो वा नसो... मग आपल्याला काय आवडतं हे त्याने समजून घ्यायला नको का? उष्टावलेल्या शरीराने रात्री अंगाला हात लावतो तेव्हा गुवाने भरलेल्या त्याच्या शरीराची किळस वाटते. नको वाटतो तो स्पर्श. जिथे घाण खाऊन आला तिथेच पडलेला बरा..असे वाटते.”प्रमिला.

“मग आपलं काय?”किरण म्हणाली

“हस्तमैथुन आहे की...निसर्गाने ही एक चांगली सोय करून ठेवली आहे. इथे मात्र त्याने स्वभावत:च स्त्री पुरुष भेद ठेवला नाही हे आपलं नशीब.”सोनी डोळा मिटत म्हणाली.

तसा त्यांच्यावरचा ताण हलका होऊन त्या खळखळून हसू लागल्या. एवढूशा ओंजळभर आनंदात त्यांची विश्वव्यापी दु:खे पार विरघळून गेली. बिच्चाऱ्या स्त्रिया..

“सुनिता काय ठरले गं तुझे? पूजेला बसणार का तू? “

सोनीच्या बोलण्याने त्या एकदम शांत झाल्या.

“हो, माझा निर्णय पक्का झाला आहे.”

“गुड, मग तू तुझा कोणी मित्र आणणार, का बंटीला सांगू? “

“माझा कोणी मित्र नाही. तू बंटीला सांग. “

“सुनिता, तुला कलपना आहे ना तिथे काय होणार आहे त्याची?”

“हो पूर्ण कल्पना आहे. मी रात्रभर विचार केला आहे. मला पैसा हवा आहे. श्रीमंत व्हायचंय मला. मग त्यासाठी भूताबरोबर झोपावं लागलं तरी हरकत नाही. तसाही माझा नवरा भूतापेक्षा कमी का आहे? फरक एवढाच आहे तो त्या बदल्यात हाड्तुड करतो...आणि ते भूत रग्गड देऊन जाईल. “

कोणी काहीच बोलले नाही. सोनीने खुश होऊन बंटीला फोन लावला.

"वो तैयार है...कहां?....जरुरी है?.... ठीक है...पता एस एम एस करो....मैं बोलती हुं उसे. "तिने फोन ठेवला.

"मी बंटीला बोलले. तो तुला आत्ता त्या म्हाताऱ्याकडे घेऊन जाईल. संध्याकाळी तुला एक लाख मिळतील. तू सांगितल्या प्रमाणे खरेदी कर. परवापासून पूजेला सुरुवात होईल."

"कुठे जायचं आहे? तो इथे येणार आहे का?"

"नाही...तुला जावं लागेल. तो पत्ता कळवतो आहे. जवळच आहे. गाडी येईल त्याची तुला घ्यायला. हा बघ पाठवला त्याने एस एम एस. घे लिहून. लगेच जा..अंघोळ केली आहेस ना?"सुनीताने एकटक बघितलं तशी ती हसली,

"तसं नाही गं, पूजेला काळजी घ्यावी लागते."

"सुनिता विचार कर.. एकटी जाऊ नकोस. आम्ही येतो हवं तर सोबत."

"तिथे बाकीच्यांना एन्ट्री नाही. तिला एकटीलाच जावं लागेल. "

"बरंय"म्हणून सुनिता गेली.

"जेवणार काय गं तुम्ही? पिठलं भात टाकते."

"नको..इच्छा नाही."

' अगं खा गं...जेवून आपल्याला परत विरारला जायचे आहे. "

"कशाला?"

"अगं विरारच्या बाबाने बोलावलं आहे. तुझ्या एक रुपयाच्या जाड कॉईनचे गिऱ्हाईक आले आहे. चार लाख मिळतील म्हणाला. "

"चार लाख!!! पूजेचा प्रकार तर नाही ना? "किरण घाबरून म्हणाली.

"नाही गं, घाबरू नकोस. मला माहित आहे..तुझ्याच्याने पूजा जमणार नाही ते. तिथेच मरून जायचीस. मग तुझ्या भुताला बोलवावं लागेल पूजेला. ही ऽ ही ऽ ही ऽ कोणीही पुरुष पूजेला बसायला तयार होईल. ही ऽ ही ऽ..."ती खो खो हसू लागली.

"चेष्टा करू नकोस घोलप. रात्री काय हालत झाली माहित आहे. झोपेत सगळं तेच दिसत होतं. अंधारात नवऱ्यालाच भूत समजले. "

"काय बोलतेस तू!!...."त्या हसू लागल्या.

"चल लवकर जेवून जाऊ. संध्याकाळपर्यंत परत यावं लागेल. सुनीताला किती वेळ लागेल?"

"एक दोन तास तरी लागतील."सोनी म्हणाली.

"मग तिलाही तिकडे परस्पर यायला सांग. किरणचा नवराही लवकर येतो. तो यायच्या आधी परत यावं लागेल. "घोलप किचनकडे पळाली.

_____XXX_____

## 29

"गिरी काय झालंय तुला? "

"काय?"

"किरणशी असा का वागतोस तू? "

दोघेही मरीन ड्राईव्हच्या कट्ट्यावर बसले होते. समुद्र रात्रीची वेळ असल्याने गर्जत होता.

"कसा? "समजून न समजल्याचे नाटक करणे त्याला जमत नव्हते.

"उगाच ड्रामा करू नकोस गिरी. मी काय म्हणतेय ते तुला चांगलंच समजतंय. उगाच वेड घेऊन पेडगावला जाऊ नकोस."

तो काहीच बोलला नाही.

"गिरी.."

"काय बोलू योजना.. मला अपराध्यासारखं वाटत आहे. मी तिला असं बोलायला नको पाहिजे होतं. पण किरण समोर आली की माझ्यातला न्यूनगंड उभा राहतो. तिची बुद्धी अफाट आहे. तिच्या वडिलांनी तिला शिकवली असती तर आज कुठच्या कुठे पोहोचली असती. लहान मुलासारखी चौकस बुद्धी आहे तिची. खूप बारकाईने निरीक्षण करते. पार खोलातच शिरते. तिचा बुद्धीचा आवाका बघीतला की मला स्वःलाच खुजं वाटायला होतं. मला हेवा वाटतो गं तिचा."

"गिरी काय बोलतोस तू हे. "योजना आश्चर्यचकित झाली.

"तू आणि हेवा. अरे तुझ्या खांद्यावर संघटना आत्मविश्वासाने उभी आहे. तू गेलास की तिचा पार बोऱ्या वाजेल..आणि तुला न्यूनगंड!! तूच तर तिला शिकवलेस ना...आणि आता बोलतोस की तुला तिचा हेवा वाटतोय!! "

"तू काहीही बोल. माझ्या कानाखाली दे हवं तर. तुझ्यापासून काही लपलं नाही आहे. खेड्यातून आलो...प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण पूर्ण केले. भावंडांची लग्ने केली. बहिणीचे लग्न केले. दोन वेळ...कधी कधी एकवेळही वडापाव खाऊन नोकरीच्या शोधत वणवण हिंडलो. जिच्यावर प्रेम केलं तिनेही दगा दिला. त्याचा सूड म्हणून मिळेल त्या स्त्रीला भोगली. स्वत:ला काही आजार

होतील याचीही भीती बाळगली नाही. किरणला बघितलं तेव्हा स्वत:चीच घृणा वाटू लागली. कशीही करून ही आपल्या आयुष्यात आली पाहिजे हे ठरवलं...पण बायको म्हणूनच. आईशप्पथ सांगतो योजना..पहिल्यांदा मिठीत घेतलं तेव्हा वाटलं ही अशीच विरघळून जाईल. इतका बेचैन झालो की माझा स्पर्शही तिला होऊ नये असे वाटू लागले. का तिला छेडलं असं वाटू लागलं. मी पाप करतोय असं वाटू लागलं. "

"अरे पण म्हणून तू तिच्या आईवडिलांबद्दल तिला टोचून बोलावं?! "

"मी पुरुष आहे योजना..पुरुष. मोडेन पण वाकणार नाही. माझा दोष मी कसा कबूल करीन? सामाजिक कार्यकर्ता असलो तरी आतील पुरुषी नाग फणा काढून उभा राहणारच ना?..तसेच झाले बघ..ती माझ्याशिवाय विचारच करत नव्हती इतकी ती मी मय झाली. अगं मी येण्याच्या वेळी ट्रेनची वाट बघत तासन तास खिडकीत उभी रहायची. खूप बरं वाटायचं सुरुवातीला. आपलं...केवळ आपलं माणूस आपली वाट बघतंय या कल्पनेनेच रोमांच यायचे अंगावर. पण मला माझ्या पुरुषार्थाचा पुरावा हवा होता. स्वत:चं मुल हवं होतं. गॅरंटी कार्डच म्हण ना हवं तर..च्यायला दिवस रात्र किड्यासारखं पोखरलं होतं डोकं. चीड येत होती. तिची नाही तर माझी. मी नामर्द तर नाही ना? का जो व्यभिचारीपणा केला त्याची फळं तर नाही ना भोगावी लागत? या विचारांनी मेंदूचा भुगा होत होता. चिडून मग तिला टाळायला लागलो. पण ती खूप प्रेम करते माझ्यावर..माझे सर्व दोष माहित असूनसुद्धा वेड्या सारखं प्रेम करते...कशाला? मी काय कोणी गंधर्व नाही...देव नाही..एखाद्याला कोणी इतकं आवडू शकतं? "

"छान!! म्हणजे ती हवी म्हणून तू नाना करामती केल्यास..आणि आता ती मिळाली तर तुला तिचं तुझ्यावर प्रेम करणं नकोय. भूक तर लागलीय...पण पंचपक्वान्नाचे ताट समोर नकोय. घाण खायची जी सवय लागलीय ती सुटत नाही म्हण ना? ".

"तू काहीही बोल...मी काहीही म्हणणार नाही. तुला तो हक्क आहे. जेव्हा गरज होती त्यावेळी पडत्या काळात उभी राहिलीस माझ्या मागे मोठ्या बहिणीसारखी. "

"मग त्या अधिकाराने एक मुस्कटात ठेवून देऊ का?"ती रागाने म्हणाली, "शहाणाच आहेस..अरे गिरी..ती खूप प्रेम करते रे तुझ्यावर. खूप सोसलंय तिने. नातं काय असतं ह्याचा अर्थ तू तिला जाणवून दिलास. एकही क्षण असं जात नाही की ती तिच्या विचारांत नसतोस. "

"नेमकं तेच तर नकोय ना मला. मी असा मुक्त विचारांचा..रांगडा..बांधून ठेवल्यासारखं वाटतं. तिला बरोबर घेऊन जातो तेव्हा अख्खं जग तिच्याभोवतीच गोळा झाल्यासारखं वाटतं. हेवा वाटतो

तिचा. कधी कधी वाटतं..का इतकं हिला हुशार केलं? गुरूच्या पुढे शिष्या निघून गेली. पण समाधान वाटण्याऐवजी ईर्षाच निर्माण झाली. पूर्वीची भोळीभाबडी किरण बदलली आहे योजना. तिची नजर, तिची देहबोली, तिचं सभाधीटपणा... सगळं सगळं बदललं. आता तिला माझ्या मदतीची गरज नाही भासत कुठलाही निर्णय घ्यायला. आता हे नोटेचे प्रकरण बघ ना..किती आत्मविश्वासाने हाताळतेय. ती फसणार नाही याची खात्री आहे मला. पण माझ्याशिवाय ती हे करतेय हेच सहन होत नाहीय मला. "

योजनाने कपाळालाच हात मारून घेतला.

"आणि मी समज करून घेतला की तू तिच्या चारित्र्यावर...."

"नाही नाही...मीच काय, कोणीही तसा विचार देखील करणार नाही, अंतर्बाह्य निर्मळ आहे ती"

"मग आईवडिलांवरून का दुखावतोस रे तिला? जन्म घेतलाय त्यांच्या पोटी. तू तर नंतर आलास आणि हक्क गाजवायला लागलास की रे! इतका मतलबी कधीपासून झालास रे तू?!"

"मला कळतेय योजना, मी चुकतोय ते. पण माफी मागणं जमत नाही मला. सॉरी बोलायला जेव्हा तिच्यापुढे उभा राहतो तेव्हा जीभ उचलत नाही. पुरुष फणा काढून उभा राहतो मनातला.....आणि पुन्हा अधिकच दुखावतो तिला. काय करावं समजत नाही. "

"वेडा आहेस..ती एकटी पडलीय रे. स्वत:पुरता ती विचारच करू शकत नाही. सर्वांना बरोबर घेऊन जाणे आवडते तिला. कधी तिला जाणून घ्यायचा प्रयत्नच केला नाहीस तू. जशी ती बाहेर दिसते तशीच ती आतही आहे रे."

"मला माहित आहे."

"मग रे... सोड ही घमेंड. तिला त्रास द्यायला जातोस तू आणि स्वत:लाच त्रास करून घेतोस. यावेळी ती खूप घाबरलेली आहे. या नोटेचं खरं कारण लोकांना समजावं म्हणून आगीत उडी घेतलीय तिने. झेपत नाही तिच्या मानसिकतेला.. पण खरं काय ते शोधून काढायचा चंगच बांधलाय तिने. तिला एकटं वाटू नये म्हणून मीही असते सोबत. पण तू असला की तिला लढाई जिंकायला बळ येईल. तुझी खरी गरज आत्ता आहे तिला. सॉरी म्हटलं नाही तरी चालेल. त्याची तिला गरजच नाही. तुझा प्रेमळ स्पर्श हवा आहे रे तिला. मित्र म्हणून जा...नवरा म्हणून नको. खरा गिरिधर बाहेर येऊ दे तुझ्यातला...जो मला माहित आहे आणि जो तू आहेस."योजनाने त्याच्या डोक्यावरून हात फिरवला. गिरिधर दोन्ही हातात डोके पकडून रडू लागला.

"मी खूप वाईट आहे गं योजना.  असं कसं करू शकलो मी? किरणला इतका त्रास द्यायला नको होता. चुकलो मी."

"तू आता सरळ घरी जा. वाटेत कुठेही थांबू नकोस. नाहीतर दु:ख झालं म्हणून पीत बसशील. तुम्हा पिणाऱ्यांचे एक बरे आहे..खुशीत असला तरी पिता आणि दु:खातही पिता. मजा आहे बाबा तुमची."दोघेही हसू लागले.

_____XXX_____

_____30_____

तो घरी आला तेव्हा जिन्यावर अंधार होता. अंदाजानेच त्याने लॉक उघडले. अंधुकशा उजेडात किरण बेडरूम मध्ये झोपलेली दिसली. मोबाईलच्या उजेडात बघितले तर ती घामाघूम होऊन तळमळत असलेली दिसली. ब्रीफकेस बाजूला ठेऊन त्याने तिला हलवले.

"किरण....ए किरण...काय झालं...उठ..किरण..."

तिने डोळे उघडले आणि ती घाबरून ओरडली.

त्याला योजनाचे शब्द आठवले. पटकन त्याने तिला हृदयाशी कवटाळले. त्याच्या मिठीतली किरणची थरथर त्याला स्पष्ट जाणवत होती. त्याला खूप पश्चात्ताप झाला.

"सॉरी किरण ' म्हणून त्याने तिच्या डोक्यावर थोपटायला सुरुवात केली. लहान कोकरासारखी ती त्याला बिलगली. विश्वासाने भितीवर मात केली होती.

_____XXX_____

_____31_____

घोलप वेड्यासारखी अनवाणी पायांनी ब्रिजवरून धावत होती.....तिच्या पाठोपाठ सुनिताही दोघीही खिदळत होत्या. घोलपचं एवढं प्रचंड शरीर प्रत्येक उडीबरोबर हिंदकळत होतं. मटणाचे गोळे इकडून तिकडे हलत होते. किरणला क्षणभर वाटलं की हिच्या अंगावरून मोठी चादर लपेटून घ्यावी...म्हणजे फक्त चेहराच बघणे सुसह्य होईल. येणारे जाणारे लोकं अशा नजरेने बघत होते की जणू काही सर्कशीतली माकडं पळताहेत. प्रमिला व किरण धापा टाकत पाठून हळूहळू येत होत्या. त्यांना ही सवय नव्हती.

“या दोघीत काहीच राम नाही बघ सुन्ये...हवा खाऊन जगताय का गं तुम्ही? “

“आम्हाला नाही बाई तुझ्यासारखं जमत. उफ़्फ़.... जाडे एवढी एनर्जी कुठून येते तुमच्यात?”

“माझा हिरो आहे ना..तो रिचार्ज करतो.”ती डोळे मिचकावत हसली.

' झालं हिचं परत सुरु. “

“अगं सुनिता, तू गेली होतीस ना बंटी बरोबर..त्या म्हाताऱ्याकडे? काय झालं गं? ' किरण म्हणाली.

“मला स्वीकारलं त्यांनी. एवढं चांगलं शरीर असताना रिजेक्ट कसं काय करतील ते. “सुनीताने सहेतुक घोलप कडे बघितलं. त्यांच्या नजरेची भाषा तिला कळली नाही.

“म्हणजे? “

“त्यांच्या भुताला एक चांगलं शरीर हवं..जे माझं आहे. परवा पूजेला बसेल मी. बंटी असेल सोबत... मग भ्यायचं कारणच नाही. आता माझी तयारीही झाली आहे. त्याच्या बरोबर बसायला काहीच अडचण येणार नाही. उलट भुतं येऊन गेली तरी मला कळणार नाही. “ती हसू लागली. घोलपही हसू लागली. तिने सुनीताला प्रेमाने जवळ घेतलं.

' माझी बाय ती. '

हा काय नवीन प्रकार?! मनात विचार येताच क्षणी ती चमकली. तिने प्रमिलाकडे बघितलं तर तिने बेफिकीरपणे आपले खांदे उडवले. त्या दोघी आता बऱ्याच लांब गेल्या होत्या.

"हे बघ किरण, सुनीताला कोणी दोन हजार रुपये दिले तरी ती जाईल....जातेही. उगाच नाही घोलप तिचे लाड करते. प्रत्येक बैठकीमागे तिला कमिशन मिळतं. खुश आहे ती तिच्यावर."

"आणि तू..."किरण तिच्याकडे एकटक बघत म्हणाली.

"एक लाख कोणी देणार असेल तरच मी जाईन. दोन हजाराला स्वत:ला विकणारी बाई नाही मी. "

"म्हणजे स्वत:ला विकणारच ना? दोन हजार रुपये काय आणि एक लाख काय! बाजार शेवटी बाजारच. "किरण उपहासाने म्हणाली. का कुणास ठाऊक. प्रमिला तिला आवडायची. सुरुवातीपासूनच ती तिला नेहमी वेगळी वाटली. पण आता तो भ्रम तुटल्यासारखा वाटला.

"फरक आहे किरण. माझ्यासाठी पैसा खूप महत्वाचा आहे. पण म्हणून मी चण्या फुटाण्यासारखी विकली जाणार नाही. "

"अगं पण ह्याला वेश्याव्यवसाय म्हणतात प्रमिला. "

"माहित आहे. अजून नवीन काय करणार आहे. जे गेली दहा वर्षे करतेय तेच तर करणार आहे ना. फक्त आता ह्या कामाचे पैसे मिळतील. "

"म्हणजे तू आताही तेच काम करतेस?! "किरण आश्चर्याने म्हणाली.

"मनाविरुद्धचा संभोग अजून काय असतो किरण? चौदा वर्षांची होते तेव्हा नवऱ्याने पळवली. रोज पाळत ठेवायचा. बायकोही होती त्याला. तरीही त्याला चौदा वर्षांची पोर आवडली. गावी राहायचे...घरात संडास नाही….हगायला लांब शेतात जावं लागायचं. ह्याने सगळी तयारी करून ठेवली होती. शेतातून येताना पकडली आणि गाडीत कोंबली. थेट मुंबई गाठली... वाटेत आडरानात नासवली मला. दहा दिवस मुंबईच्या हॉटेलमध्ये बलात्कार करत होता...सतत. पस्तीस वर्षाच्या पुरुषासमोर कोवळ्या पोरीचा काय टिकाव लागणार? लाडेलाडे बोलायचा...तुला राणीसारखं ठेवीन...सर्व सत्ता तुझ्या हातात देईन..पहिलीवर, तिच्या पोरांवर सत्ता गाजव म्हणाला. दे म्हंटलं सत्ता...मंगळसूत्र बांध गळ्यात...तुझी रखेल म्हणून नाही राहायचं मला...तरच नांदते म्हणाले. एका पायावर तयार झाला. म्हणाल्याप्रमाणे केलं. आता नाक घासतो माझ्यासमोर. पहिलीही नरम पडलीय. हवं नको ते सगळं मी बघते...पण ते सगळं माझ्या शरीराच्या बदल्यात दिलेला मोबदला वाटतो....जबरदस्तीचा. त्याच्या सोबतीची प्रत्येक रात्र स्वत:ला विकल्यासारखी वाटते. घरी जाऊ शकत नाही आता. काय म्हणतील घरचे...आणि अशी...अशी ही आत्ताची प्रमी स्वीकारतील असं

वाटतं तुला? छे ss नाती खूप जवळून बघितलीत मी. कोणालाही रिस्क नको असते. धोका पत्करायला कोणालाही नको असतं. जो तो आपल्यापुरती जमीन खणत असतो. "

किरण अवाक होऊन तिच्याकडे बघत होती. श्यामाचे शब्द तिच्या कानात गुंजत होते.

' ताई तुझ्या लग्नाचे जर लवकर बघ...नाही तर तुझ्यासाठी मी थांबून रहायची नाही....'

प्रमिला बोलतच होती.

"मी परिस्थितीपुढे झुकले. पण त्या दिवसापासून आत्तापर्यंत त्याला बोटावर नाचवायची एकही संधी सोडत नाही मी. "तिचे डोळे आग ओकत होते.

"पण म्हणून तू स्वत:चा सौदा करणार?!"

"केला कुठे...एक लाखाची बोली लावणार असतील तर....."

"प्लीज प्रमिला, तू तरी असं नको करू. तू त्यांच्यापैकी नाहीस... वेगळी आहेस तू. पुन्हा नव्याने दुसऱ्या दलदलीत पडू नकोस गं. तुला काय वाटतं यांची थेरं माझ्या लक्षात आली नसतील? केव्हाच ओळखलं आहे मी. पण.....जाऊ दे. या पैशांच्या व्यवहाराचे काय होते ते बघू दे. मी देईन तुला...पण ह्या घाणेरड्या वाटेवरून जाऊ नकोस. "

प्रमिला हसू लागली.

"नको जीव लावूस इतका. आजकाल त्याला मूर्खपणा म्हणतात. बरं बाई, नाही जात...खुश? पण ह्या महामाया काय करतात ते तर बघू. दोन चार शिंतोडे त्या पैशातले आपल्या अंगावर उडाले तर काय बिघडलं. चल लवकर, त्या बघ जिना उतरल्या पण."

घोलप आणि सुनिता हात हलवून त्यांना लवकर येण्याचा इशारा करत होत्या.

_____XXX_____

साहित्य प्रतिष्ठान

_____32_____

चारी बाजूला उंचच उंच इमारती....कुठेही गार्डन नाही की बसायला बेंच नाहीत... चिंचोळे रस्ते, भूलभुलैया सारख्या गल्ल्या. चौघी एका इमारतीच्या गेट समोर थांबल्या होत्या. मघाशी गेलेला मुलगा परत आला.

"बॉसने बोलवलं आहे."

किरण इमारतीत शिरू लागली तसं त्याने थांबवलं.

"इधर नही..बिल्डींगच्या पाठीमागे."

इमारतीच्या पाठीमागे त्याने नेलं. दोन बिल्डींग मधल्या पाठच्या जागेत टेबल खुर्च्या मांडून काही गुंडांसारखी दिसणारी माणसे बसली होती. त्यांना बघताच खुर्च्यांवरून उठून बसली.

"या...बसा बसा...अरे थंडा सांग."वयस्कर दिसणाऱ्या माणसाने पोऱ्याला हुकुम सोडला.

"हे हाफिज भाई "घोलपने ओळख करून दिलि.

उंचापुरा, तगडा, केस पिकलेले म्हणून म्हातारा म्हणावं असं व्यक्तिमत्व. चेहऱ्यावरच्या कापल्याच्या खुणा त्याचा कुख्यात गुंड असल्याचा इतिहास सांगत होत्या. गळ्यात बोटभर जाडीच्या सोन्याच्या चार-पाच चेन, सगळ्या बोटात रत्नांच्या अंगठ्या, मनगटात गळून पडेल असं वाटणारं सोन्याचं ब्रेसलेट आणि टेबलावरच रिव्हॉलव्हर. किरणने घाबरून आवंढा गिळला. गिरीला पत्ता पण लागणार नाही इथे आपलं काही कमीजास्त झालं तर.

"नमस्ते "तिने आपणहूनच नमस्कार केला. आपल्याला चांगलं समजावं म्हणून. तिच्या कल्पनेनुसार तिला सोज्वळ बाई समजून जाऊ देण्याची...सुखरूप जाऊ देण्याची पळवाट. तिच्या अपेक्षेप्रमाणे तो तिला बघून मनमोकळं हसला.

"नमस्कार, घोलप तुझ्या कंपूत ससा कसा काय अडकला? चांगल्या बायांनाही फसवायला लागलीस काय तू? "

'अरे नही हाफिज भाई...ती त्यातली नही. साधीसुधी घरगुती बाई आहे.  पण तिच्याकडे नोट आहे...पाच हरणांची.  आणि जुने कॉईन्स   आहेत."

"अच्छा...दाखव कुठे आहे नोट? "

"बंटीकडे "

"बंटी? मग नको. त्याच्या हद्दीत मला घुसायचे नाही. आमचे उसूल ठरलेले आहेत. एकमेकांच्या हद्दीत यायचे नाही आणि आलाच तर सोडायचे नाही. आत्तापर्यंत कोणी नियम तोडला नाही. मी पण नाही. नोट सोडून बोल. हां त्याच्याकडून काम नाही झालं तर मग मला दे. ते चालेल. '

"कॉईन्स तर बघून घ्या."

सर्व कॉईन्स  त्याने टेबलावर मांडले. एकेक कॉईन बघून तो परत डब्यात टाकू लागला. शेवटी आंबेडकरांचा अर्धा चेहरा असलेला एक रुपयाचा कॉईन  त्याने उचलला.

"या कॉईनला एक गिऱ्हाईक आहे. चार लाख देईल तो. बोल लावू का फोन त्याला? "

घोलप किरणच्या कानात कुजबुजली.

"हे बघ आपण सर्वांनी सारखे वाटून घ्यायचे. तयार आहेस का? मी तुला इथे आणलं म्हणून तुला कळलं. नाहीतर या रुपयाला कोणीच विचारलं नसतं आणि तुला कळलं नसतं.  "

"अगं पण तो कॉईन एका गरीब बाईचा आहे. तिला जास्त मिळायला हवेत."

"आपण दहा हजार देऊ. यापेक्षा जमणार नाही. नाहीतर जाऊ मग. काय बोलतेस बोल."

पैसा बोलत होता, नाचत होता.

"ठीक आहे."

ती खुशीत आली.

"लावा भाई फोन...पण त्यातले तुम्हाला किती द्यायचे? "  तिचं अजूनही तुणतुणं सुरूच होतं. टेबलावरच्या रिव्हॉलव्हरचीही तिला भीती वाटत नव्हती.

बुढा हसायला लागला.

"घोलपबाय, तू सुधारणार नाहीस. तुमच्या बायकांकडून एवढ्या छोट्याशा रकमेतून काय घ्यायचे. जा ऐश करा. आधी मला फोन लावू दे त्याला. दे रे लावून. "

"आत्ता लावतो बॉस....लागला"

"अरे रामा, तो कॉईन माझ्याकडे आला आहे. तुला हवा होता ना? कधी येतोस बोल.....अरेरे...साल्या त्या बायका इतक्या लांबून आल्यात....कोणी दुसरा नाही का?...हं जाऊ दे...आला की सांग."त्याने फोन ठेवला.

"माफ करा, त्याला कॉईन भेटला. दुसऱ्या कोणाला पाहिजे असेल तर फोन करेन म्हणाला. एक तासा आधीच व्यवहार झाला त्याचा. तुम्ही थोडं आधी आला असता तर चार लाख मिळाले असते. "निराशेने त्याने मान हलवली. सगळ्यांचे चेहरे पडले.

"काही होणार नाही का आता? कोणी दुसरा असेल ना ओळखीचा? "घोलपला अजूनही आशा वाटत होती.

"नाही घोलपबाय...तुला कशाला खोटं बोलेन मी...तुझ्याशी तर आपले व्यवहार आहेत."

इथेही!!! किरण चक्रावून गेली. लवकरात लवकर इथून सटकले पाहिजे. पाठची बाजू असल्याने बिल्डींग मधील बायका किचनच्या खिडकीतून कचरा बाहेर टाकत होत्या. वासाने डोकं उठलं होतं. सगळ्याजणी बाहेर पडल्या तेव्हा कुठे तिच्या जीवात जीव आला.

"छे आपलं नशीबच गांडू. थोडं लवकर आलो असतो तर...तुझ्यामुळे उशीर झाला किरण"

"मी काय उशीर केला! तुला पिठलं भात खायचा होता आणि मला दोष देतेस."

"ठीक आहे ठीक आहे...आता सर्व भिस्त या सुनीतावर आहे. हे बघ सोने, डोळे अजिबात उघडू नकोस. हिम्मत कर...सर्वांची पिडा निघून जाईल. आयुष्यभर बसून खाऊ. ह्या घाणीतून बाहेर पडू. मलाही वैताग आलाय ह्या जीवनाचा. रात्र खायला उठते एकटी असल्यावर. जुने गावाकडचे दिवस आठवतात. गरिबीत होतो पण मजा यायची. भूक लागली की शेतातले कणसं खुडून खायचो. ताटलीला साडीचा तुकडा बांधून मासळी पकडायचो. तिथेच दगडांची चूल करायचो. जरा दगडावर रगडली की स्वच्छ व्हायची मासळी. भाजल्यावर मिठाबरोबर खायला मजा यायची. पोट गच्च भरायचं. या मुंबईने खाऊन टाकलं मला. मिनाक्षीची घोलपबाय झाले. माझं मन आणि माझं शरीर वेगवेगळ केलं या मुंबईने. कधी आरशासमोर उभी राहते तर स्वत:ला ओळखताच येत नाही. कसले कसले नाद लागलेत. "ती तिथल्याच एका दगडावर बसली.

"अशी उदास होऊ नको बाई तू.  आता एवढं सगळं केलं बंटी बरोबर  आणि आता त्या भुताला घाबरतेय होय?  तू काही काळजी करू नकोस.  बस अजून दोन दिवस...मग जग आपलं असेल."

"होय बाई,  एवढं कर..निघून जाऊ आपण इथून."

"चल आता, ह्या किरणची चिंता आहे. आपण तर वाऱ्यावरच सोडलेल्या आहोत."

त्या पुन्हा स्टेशनच्या दिशेने चालू लागल्या. निराशेने पायही पटपट उचलत नव्हते. प्रत्येकीच्या मनात एकच विचार तरळत होता....थोडे आधी आलो असतो तर....

_____XXX_____

______33______

सकाळपासून कोणाचाच फोन येत नव्हता. घोलपला फोन लावला तर स्विच ऑफ येत होता. प्रमिला तर नवऱ्याबरोबर गावी गेली होती. सुनीताची रिंग होत होती. पण ती उचलत नव्हती. आठ दिवस होऊन गेले होते पूजा होऊन. योजनाही युरोपला गेली होती. घोलपकडे जाऊन बघावं का? पण बरोबर कोणीही नाही. सकाळपासून तब्येतही ठीक नव्हती. उलटीसारखे वाटत होते. पाळीही चुकली होती. डाऊट आला म्हणून प्रेग्नेन्सी टेस्टची स्ट्रीपही आणून ठेवली होती. दोन्ही चिंता होत्या. युरीन टेस्ट घ्यायची हिम्मत झाली नाही. काहीच नसल्याची साईन आली तर.....हिम्मतच होत नव्हती. उद्या बघू...आणि असेल तर....आज नकोच...उद्याच. तिने स्ट्रीप परत कपाटात ठेवून दिली. घोलपला परत फोन केला यावेळी रिंग वाजली.

"हां बोल गं."पलीकडून तोच घोलपचा झोपेत असल्यासारखा आवाज.

"अगं फोन का स्विच ऑफ करून ठेवलाय? आठ दिवस झालेय तुमचा सगळ्यांचा पत्ता कुठेय? काही सांगणार का नाही? का टांग देताय मला?"

"तुला कशाला टांग देऊ बाई...नशिबानेच टांग दिलीय आपल्याला. "

"म्हणजे?!"काहीच न कळून ती बोलली.

"तुला यायला जमेल का घरी माझ्या?"

"नेहमी तर ये म्हणते...आता विचारतेस का? आले अर्ध्या तासात....आणि सुनिता?"

"ती माझ्याच घरी आहे रात्रीपासून. ये तू...त्या तुझ्या म्हातारीला...योजनेला नको आणूस प्लीज."

"तू युरोपला गेलीय. मी एकटीच येतेय."किरणने फोन ठेवला.

काय नवीन भानगड करून ठेवलीय या लोकांनी...भयानक आहे सर्व....एक मन म्हणत होतं, जाऊ दे..गेलं खड्ड्यात सारं. पण दुसरं मन म्हणत होतं...बस, हे शेवटचंच. धीर एकटवून ती बाहेर पडली.

ती आत शिरताच बंटी बाय म्हणून निघून गेला. याला काय झालं?

"काय गं, हा असा काय निघून गेला? काहीच न बोलता! "

सुनिता, घोलप, सोनी...तिघीही एकमेकींकडे बघायला लागल्या.

"त्याचं सोड...जाऊ दे त्याला. तू ये, बस..चहा घे...वेफर्स खाशील? सुनिता जा गं..स्टीलचा डबा आण ना आतला...वेफर्स, चिवडा सगळं आहे त्यात. "

सुनीताने डब्यातलं सगळं सामान ताटात ठेवलं. परत शांतता. किरणला काहीच कळेना.

"अरे कोणी सांगताल का नाही? काय झालं पूजेचं?"

"पूजा फसली"

"म्हणजे?!"

"ही घे तुझी नोट..जिची आहे तिला देऊन टाक. "घोलपने पाच रुपयाची नोट परत दिली.

"हे काय!! पूजा झाली नाही काय? "

"मादरचोद निघाला तो"

"कोण?"किरणला असल्या शिव्यांची आता सवय झाली होती. त्यामुळे यावेळी तिला त्याचं काहीच वाटलं नाही.

"बंटी"

"त्याने काय केलं?"

"पूजेच्या बहाण्याने हिच्यावर सामुहिक बलात्कार केला गेला तिकडे."

"काय sss!! "तिने घाबरून सुनिताकडे बघितलं. ती मान खाली घालून बसली होती. सोनीकडे बघितलं तर ती वर बघेनाच.

"तुम्ही पोलिसांत तक्रार करा आधी..उठ लगेच."

"आणि मग हिच्या नवऱ्याला हिला लगेच घटस्फोट द्यायला बरं असंच ना? "

तिला काय बोलावं तेच सुचेना.

"तो दरवाजा लाव आधी. उगाच बोभाटा नको. "खुल्या दरवाजाकडे तिने बोट दाखवलं.

“सॉरी”दरवाजाला कडी घालून ती मटकन खाली बसली.

“हे असं कसं झालं? सोनी तुला तर सर्व माहित होतं ना? तुझ्यावरच पूजा झाल्याचं तू सांगितलं होतं आम्हाला. “

“माझ्यावरही तीच परिस्थिती ओढवली होती किरण. मी फसले गेले. नवऱ्याचा मित्र म्हणून घरात घुसला आणि माझ्यावर रेप केला. त्यावेळेपासूनच मी त्याच्या जाळ्यात ओढले गेले. त्याची मदत करणे मला भाग पडले गेले. नाहीतर माझे विडीओ क्लिप्स त्याने सगळीकडे पसरवले असते. “

“सोनी!...म्हणून तू सुनीताला फसवलेस?”

“तिला माहित होतं. पूजेला जाण्याआधी त्यानेच तिची टेस्ट घेतली होती. इथून आपल्यासामोरून गेली त्याच दिवशी. पण पूजेचं मात्र त्याने लपवलं. पण तिथे तरी अजून काय होणार होतं? तिथे काय सती सावित्रीचा जप होणार नव्हता. भुताच्या मार्फत का होईना..रेपच होणार होता ना आणि त्यासाठी ती स्वत:हून तयार झाली होती. पैसे मिळाले त्याचे तिला. फक्त पाऊस तसा नाही पडला, जसा तुम्ही विचार केला होता. आता त्यातून किती घ्यायचे ते तुम्ही ठरवा. “सोनी म्हणाली.

“सुनिता काय झालं गं हे? तू सविस्तर सांगशील का?”

“तुला काय करायच्यात नसत्या चांभार चौकशा? “घोलप तिच्यावर ओरडलीच.

“का म्हणजे? कळायलाच पाहिजे. “तीही स्वर कठोर करून म्हणाली. सगळ्यांचा बेत तिच्या लक्षात यायला लागला होता. तिची नजर बघून घोलप गप्पं झाली.

“सुनिता सांगशील का काय झालं ते? आपण पोलिसात नको जाऊयात...पण बोलशील का नाही काही? “किरणने सुनीताला गदागदा हलवत विचारले.

“काय होणार होतं दुसरं...मी आपणहून स्वीकारलेला मार्ग होता तो. तू नको म्हणत होतीस. पण मी ऐकलं नाही. त्या दिवशी इथून त्याच्याबरोबर निघाले तेव्हा मित्राच्या घरी त्याने नेलं. तिथे त्याने माझ्याशी संबंध ठेवले. आधी....पूजेच्या आधी मोकळेपणा यावा म्हणून. त्याचे त्याने दोन हजार रुपये दिले. त्यावेळी त्याने माझ्यावर जबरदस्ती केली नाही. मी स्वत:हून तयार होते. पूजेच्या रात्री अवघड वाटू नये म्हणून. पूजेच्या रात्री त्याने एके ठिकाणी नेलं. जंगलात....कोणत्या ते माहित नाही. कारण माझ्या डोळ्यांवर पट्टी बांधली होती. उघडली तेव्हा जंगलातल्या एका घरात होते. वाडाच होता तो. हॉलमध्ये पूजेचा विधी चालला होता. सगळे पंडित....जवळपास आठ दहा जण

होते...सगळे पूजा करत होते. भीतीदायक वातावरण होतं ते. सगळीकडे धूपाचा वास पसरला होता. भयानक मंत्रोच्चार होत होता. मला आणि बंटीला अंघोळ करून यायला सांगितलं. ओलेत्यानेच मला त्याच्या मांडीवर बसवलं. पण आमच्या अंगावरचे कपडे काढले नाहीत. एक तास आम्ही तसेच बसलो होतो. नंतर आम्हाला एका बंद खोलीत पाठवलं. आत कोणीच नव्हतं. सोफा, खुर्ची, टेबल सर्व होतं. घाबरण्यासारखं मला तरी काहीच वाटलं नाही. तरीही हातपाय थरथर कापत होते माझे. तेव्हा बंटीने धीर दिला. आम्ही दोघे कॉटवर डोळे मिटून बसलो. अचानक आवाज यायला लागले. कर्कश किंचाळण्याचे. खूप सारे जण ओरडत होते असं वाटत होतं. मी घाबरून बंटीला बिलगले. डोळे उघडायचं धाडस होत नव्हतं. अचानक कोणीतरी मला पकडलं. हा स्पर्श बंटीचा नव्हतं. केसाळ प्राणी वाटत होता. त्याने तेच केलं जे बंटीने केलं. तो बाजूला झाला तेव्हा अजून कोणीतरी मला पकडलं. मी हादरलेच. एकाच वेळी इतकी भुतं?! बाप रे...मी काय होईल ते होवो..पैसे मिळाले नाही तरी हरकत नाही असा विचार करून डोळे उघडले आणि भीतीने किंचाळलेच. "

"काय दिसलं तुला?"किरणने उत्सुकतेने विचारलं.

"तिथे भूत वगैरे कोणी नव्हतं. सात आठ जण नंगे उभे होते. जे माझ्यावर बलात्कार करत होते आणि बंटी व्हीडीओ शुटींग घेत होता. "ती रडायला लागली.

"माय गॉड!! तरी मला शंका आलीच होती. मी तुला आधीच सांगितले होते की नको जाऊस....नको जाऊस. पण तू ऐकलं नाहीस. आता रडत बसून काय उपयोग. ऐक माझं...पोलिसांना सांग. ते तुझं नाव लपवून ठेवतील. पण तो नराधम तरी पकडला जाईल. "

"काही उपयोग नाही. त्याची पोच वरपर्यंत आहे. आरामात सुटेल तो. त्याचा व्यवसायच आहे हा."

"व्यवसाय...असला?!"

"त्याने त्याच्या बायकोलाही धंद्याला लावली आहे..तर माझी काय कथा"

"शेवटी पैशांचा पाऊस सोडाच...पण एक रुपया पण पडला नाही. इज्जत गेली ती गेली. काय मिळालं तुला?"

"एक लाख रुपये"सुनिता आता बऱ्यापैकी सावरली होती.

"एक लाख रुपये?! "

सुनीताने पर्स उघडून नोटांचं बंडल तिला दाखवलं.

"बंटी आता हेच द्यायला आला होता. त्या दिवशीच्या सीडी तो परदेशात विकणार आहे. त्याचे त्याला खूप पैसे मिळणार आहेत. मिळाल्यावर अजून देणार आहे तो. एका अर्थी पैशांचा पाऊसच तर पडतो आहे माझ्यावर...या तऱ्हेने..."ती हसून म्हणाली.

"आणि तुझ्या नवऱ्याने ती सीडी बघितली म्हणजे?"

"इथे नाही लावत ती. त्यांच्याकडेच.....तो ती काळजी घेतो. "

"किती सहजतेने बोलतेस तू हे सुनिता!!"

"मग काय करू? जीव देऊ? मला श्रीमंत व्हायचंय किरण. मी आधीच सांगितलं होतं. पूजेमध्ये काय होणार हे मला आधीच माहित होतं. फरक फक्त इतकाच होता की भूताऐवजी खरी माणसं आली. माणसाला एकदा फाशी दिली काय आणि दहादा दिली काय...फाशी ती फाशीच. मला मरून मार्ग दिसला आहे. मी त्या मार्गावरून जाऊन मला पाहिजे ते मिळवणार. कोणाचा बाप मला आता अडवू शकत नाही. तू ही नाही. तुला तुझा नवरा तरी आहे...तुझ्यावर प्रेम करणारा. माझा तर सगळा गोंधळच आहे. झाकली मुठ सव्वा लाखाची. घोलपच्या मदतीने मी पुढे येणार. ती आहे माझ्या सोबत. अजून काय हवं मला..."ती घोलपच्या खांद्यावर मान टाकत म्हणाली. घोलपने तिला जवळ घेत तिच्या कपाळाची पप्पी घेतली. तिच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवायला लागली. विचित्र दृश्य दिसत होतं ते. किरणच्या मनात शंका चमकून गेली. दुसऱ्याच क्षणी तिने तो विचार झटकला. या वातावरणातून कसंही करून बाहेर पडायला हवं...झालं ते बस झालं. याहून अधिक जाणून घ्यायची तिची इच्छा नव्हती. ती बाहेर जायला वळणार तोच घोलपने तिला थांबवलं.

"थांब किरण, हे बघ तू वाईट समजू नकोस. हा माझा धंदाच आहे. पण शप्पथ मला हे पूजेचं माहित नव्हतं.. तुमच्यासारखीच मी पण हे खरं समजून चालले होते. यातून चांगले पैसे मिळाले असते तर बाहेर पडले असते मी. पण देवालाच मंजूर नव्हतं. सुनिता तर तयार झालीय. आज एक शेठ तिला महिन्याला वीस हजार द्यायला तयार झालाय. मी त्यातून काहीही घेणार नाही. माझे मला तो पोहोचते करेल. तू सुंदर आहेस. तुझ्यावर तर लाखो उधळतील लोकं. तू बोलत असशील तर...."

"खबरदार...."किरण गरजली. तिचे डोळे आग ओकू लागले.

"खबरदार जर माझ्या नादी लागताल तर. इकडचं थोबाड तिकडे करून ठेवीन. तुला काय मुर्ख वाटले मी. मी कधीच ओळखलं होतं....काहीतरी गौडबंगाल आहे ते. पण काय ते कळत नव्हतं.

तुम्हाला वाटलं मी तुमच्यापैकीच आहे. हे धंदे चालले होते काय तुमचे पूजेच्या नावाखाली? मी एकटी असते तर तुमची अशी वाट लावली असती की....पण....तुम्हालाही पोरं आहेत....मुलींच्या आया आहात तुम्ही. त्यांच्या भविष्याची राखरांगोळी होईल म्हणून गप्प आहे. त्यांच्यासाठी तरी सुधरा. आणि लक्षात ठेवा..यापुढे माझ्या घरातच काय, माझ्या घराच्या आसपासच्या गल्लीत जरी फिरताना दिसलात तर याद राख. उभ्या चिरून मिरच्या भरीन...सांगून ठेवते. सोशल वर्कर म्हणे!"किरण बोट दाखवून ओरडली. सगळ्याजणी जणू गोठून गेल्या. ती निघाली तरी तिला अडवायची कोणाची हिम्मत झाली नाही.

_____XXX_____

_____34_____

सकाळी तिला लवकर जाग आली. बाहेर बघितलं तर अजून उजाडायचं होतं.  गिरिधर अजूनही झोपेतच होता. मोबाईलमध्ये बघितलं तर पहाटेचे पाच वाजले होते. तिने हळूच त्याचा हात अंगावरून दूर केला. बाथरुमला जाणार तोच तिला आठवण झाली. कपाटातून तिने प्रेग्नेन्सी टेस्टची प्लेट काढली.

' करूया का नको..... बघू काय होतंय ते..'

ती प्लेट घेऊन बाथरूम मध्ये गेली. बाहेर आली तेव्हा तिच्या चेहऱ्यावर मंद हसू होतं. एकवार तिने गिरीकडे नजर टाकली. तो एखाद्या निरागस बाळासारखा झोपला होता. न राहवून ती त्याच्या चादरीत घुसली. हळूच जवळ जात ती त्याच्या कानात कुजबुजली.

“अहो पप्पासाहेब उठा...पहाट झाली.”

“अं...पप्पा!!  सकाळी सकाळी कसली चेष्टा करतेस?  झोप जरा...मलाही झोपू दे.  “त्याने तिला जवळ ओढत परत डोळे मिटले. तिने त्याला स्ट्रीप दाखवली. त्याने डोळे उघडले. स्ट्रीपवरच्या रेड लाईन बघून त्याने टुणकन उडी मारली. तिच्या हातातून स्ट्रीप खेचत तो परत बघू लागला. आनंदाने त्याने आरोळी ठोकली.

“किरण....म्हणजे मी बाप होणार!!...यार तुसी ग्रेट हो....आय लव्ह यु डियर...”त्याने जोरात मिठी मारली. खूप दिवसांनी त्यांच्या बेडरूममध्ये आनंदाचे शब्द गुंजत होते. किरण त्यात डुबून गेली. इतकी की मागच्या सर्व क्लेशकारक घटनांचा तिला विसर पडला. तिचा संसार मार्गी लागला होता. एका सरळमार्गी गृहिणीला अजून काय हवं होतं.

______अपूर्ण______

_____35_____

"ए भेंचोद.....एक कबाब लाना.....सा sss ली ए गुड्डी...चांदनी.....मर गयी क्या भोसडी की....लाव जल्दी..."बंटी दारूचा ग्लास भारत ओरडला.

"आ रही हुं....मरे क्युं जा रहे हो?..."बंटीची बायको चांदनी हातात प्लेट घेऊन ओरडत बाहेर आली.

"लो ठुसो "हातातली प्लेट तिने त्याच्यासमोर आदळली, "मर क्युं नहीं जाते तुम..."

"क्या करे जानेमन, मेलो तर तुझ्या जवानीवर मिळणारा पैसा मोजणार कोण? खणखण आवाज करतेस तू. मला आवडतो तो आवाज..."त्याने तिला फ्लाइंग किस दिला. ती रागाने जायला लागली. तसा त्याने तिचा हात पकडला.

"रुक हरामजादी..जाती किधर है..चल एक हरी पत्ती निकाल. "

"कहां से लाऊ हरी पत्ती? मेरा बाप बैठा है क्या जो रोज हरी पत्ती देता है?"

"बाप तो नहीं... लेकिन वो हरामजादे क्या फोकट में करते है क्या तेरे को "त्याने हाताच्या मुठी वळवून हलवल्या. तशी ती पिसाळली.

"भडवे...शरम नहीं आती क्या तेरे को औरत का पैसा खाते हुए? "

"कायकू?...तेरे से शादी ही इसीलिये की है....साली छिनाल... मेरेकू भडवा बोलती है? भडवा ही तो हुं... तुझ्यासारख्या कमसिन शरीराचा सौदा केला की नोटा मिळतात मला....करकरीत...ते तुला जे देतात त्यातले माझे कमिशन मागतो मी...मी जर नाही शोधून आणले ते झवाडे तर तुला असले टकाटक कसे राहता आले असते?...बऱ्या बोलाने पैसे काढ. "त्याने तिचा हात पिरगाळला..तशी ती किंचाळली.

"मारो मत मुझे..रहम करो...अब तुम्हारे बच्चे की मां बननेवाली हुं मैं."

तसा त्याने झटक्यात हात सोडला.

“अरे विसरलोच मी...बच्चे की नहीं, बच्ची की...सोनोग्राफी में तो बच्ची दिखाई दे रही थी ना....वो नर्स को पाच सौ की पत्ती दिखाई थी तो भडवीने बताया था... रांड साली... सॉरी आता नाही तुला मारणार. तुझ्यानंतर तीच तर सहारा बनणार आहे माझा. तिला खूप शिकवणार. माझ्या तालमीत तयार करणार... हायफाय इंग्लिश फेकणारी...टॉपची रांड बनवणार मी तिला...टॉपची रांड...”तो हसू लागला तशी त्याची बायको..चांदनी घाबरून कोपऱ्यात बसली.

“तू तिलाही धंद्याला लावणार?! “

“हो “

“तुझी पोरगी आहे ती...”

“माझी?!! छिनाल रोज सतरा जणांकडे जातेस...त्यातलीच एखाद्याची उपज असेल ती.. आणि माझी जरी असली तरी मला काही फरक पडला नसता. अपुन को तो बस पैसा मंगताय आणि ह्या धंद्यात त्याची काही कमी नाही. पैशाचा पाऊस पडतो पाऊस......चल पैसे काढ...मघाशी जाऊन आली होतीस नां? किती दिले त्याने?”

“दोन हजार”

“बस्स...? रेट वाढव तुझा...आता तर तुझी फिगर छान खुलून दिसेल. मजा येईल...पाच हजार कर.. मी आणतो थांब निवडून. तू मात्र तयार रहा हं.. दे इकडे ते पैसे. “

तिने हजार रुपये ठेवून उरलेले त्याच्या तोंडावर फेकले. ती चरफडत गप्प बसली. तेवढ्यात त्याचा मोबाईल वाजला.

“सोनी? “फोन उचलत तो बोलला,”बोल सोनी, यावेळी का मरायला लागलीस? शांती से पीने दे ना मादरचोद “

“तू आ रहा है क्या मेरे घर पर?”

“क्युं.. तडप रही है क्या मोटी?”

“वो तो कब से तडप रही हुं. पण काम वेगळंच आहे. एक पोरगी गटवलीय...ये लवकर “

“पण मी जाम पिलोय...तिला संशय येईल. एक तासाने येतो. तू कसंही करून थांबव तिला. लिंबू पाणी पितो, म्हणजे उतरेल. तू रुका के रख तब तक उसको. “

त्याने फोन ठेवला.  गडबडीने उठताना त्याचा धक्का लागून टेबलावरचा ग्लास खाली पडून फुटला.

"शुभ शकुन झाला....चांदनी तयार रहा...लवकरच पैशांनी अंघोळ करू आपण...च्यायला सुनिता लकी निघाली आपल्यासाठी. "तो शिळ घालत बाथरूम मध्ये घुसला.

“ही श्वेता “सोनीने त्या मुलीची ओळख करून दिली. पंचविशीची ती तरुणी नाकीडोळी भारी वाटत होती. चेहऱ्यावर असहाय दु:खाची झालर. बंटीने तिच्यावरून नजर फिरवली. अंगाने सडपातळ होती. पण फ़िगरला जे हवं होतं ते सर्व होतं तिच्यात.

“नमस्ते “तिने हात जोडून नमस्कार केला. नाजूक गोड आवाज...त्याने मनातल्या मनात हिशोब केला.

“नमस्कार.. बसा ना मॅडम ..उभ्या का? काय घेणार? थंड का चहा कॉफी?”

“नको काही नको”

“असं कसं, सोनी फ्रीज मध्ये काही असेल ना?”

“लिम्काची बॉटल आहे.”

“अरे मग आण ना....मग...सोनीने तुम्हाला सगळं सांगितलं असेलंच?”

“हो...म्हणजे...माझा नाईलाज आहे...वडिलांसाठी हास्पिटलमध्ये पैसे भरायचे आहेत...भाऊ लंगडा आहे...गरिबी....”

“शू ss शू ss शू ss” तो तिच्या तोंडावर हात ठेवून म्हणाला.

“तयार आहे की नाही सांगा “

“हो..”

“मग प्रश्नच मिटला...तुझ्या वडिलांसाठी एका रात्रीत पैसे उभे राहतील. डोंट वरी..”

“पण मला भीती वाटते...”

“अरे मी आहे ना...मी राहील पूजेला तुझ्या सोबत. मग तर झालं...मी...बघ मला. मला बघून घाबरायला होतं का तुला?”तशी ती हसली.

“नाही तुम्ही खूप चांगले वाटता.. देवमाणूस. तुम्हाला कशाला घाबरेल मी”

“बस तर मग...”

"पण पूजा...म्हणजे पैसे कसे पडतात? राग येत असेल तर नाही विचारत.."

"अरे राग कसला यार...सांगतो ना...सोनी तू जरा शेजारच्या हॉटेलमध्ये जाऊन बिर्याणीची ऑर्डर दे. आज खूप भूक लागलीय. काल गुरुवारचा उपास होता बाबांचा." सोनी त्याच्याकडे बघून हसली

"हे बघ श्वेता...ही पाचची नोट बघितलीस? '' त्याने खिशातून पाच रुपयाची नोट काढली. किरणने रागाने जिना उतरत असताना फेकली होती. कोपऱ्यात लपून बसलेल्या बंटीने ती उचलली होती आणि परत घोलपच्या रुममध्ये शिरला होता.

' हे बघ' तो तिच्याजवळ सरकला.

"ही पाच हरणं दिसताहेत ना? तीन उभी..दोन बसलेली?"

"हो..."

"त्यातली दोन बसलेली हरणं पूजा पूर्ण झाली की पळतात आणि त्या घरात जातात जिथे लॉकर मध्ये खूप संपत्ती ठेवलेली असते.... तेच पैसे ही हरणं तोंडात घेऊन पूजेच्या ठिकाणी पळत घेऊन येतात. "

"बाप रे ऽऽ खरं!! ??"

"मग काय खोटं बोलतो?...बिलिव्ह मी..तुला कशाला खोटं बोलेन मी.."बोलत बोलत त्याने तिच्या खांद्यावर हात टाकला. तिनेही काहीही न बोलता तसाच राहू दिला. तो पुढे बोलतच होता... उत्साहाने.. टेप पुन्हा रिव्हाइंड होत होती.

______सुरुवात_ नव्या कादंबरीची______

# ई साहित्य प्रतिष्ठान

कशी वाटली कादंबरी?

मराठीमध्ये नवीन लेखकांची एक फ़ळी दमदारपणे पाऊल ठेवते आहे. येणाऱ्या काळात याच तरूण लेखकांचं साम्राज्य निर्माण होईल. यातील काही तरूण मंडळी मराठी साहित्याला जागतिक पटलावर नेऊन पोहोचवतील असा आमचा ठाम विश्वास आहे. सुषमा जाधव या त्यापैकी एक.

या गुळगुळीत दुनियेच्या शायनिंग त्वचेच्या खाली एक भयानक खरूज आणि लूत भरलेलं वास्तव आहे. या वास्तवात हजारो जीव किड्या मुंगीसारखं आपलं आयुष्य व्यतीत करतात. आपल्या मध्यमवर्गाचं कधी तिकडे लक्ष गेलंच तर आपण लगेच तोंड दुसरीकडे फ़िरवतो. कारण हे वास्तव हिडीस, जळजळीत, तापदायक आणि झोप उडवणारं असतं. मराठीत अशा वास्तवाची तोंडओळख करून देणाऱ्या अनेक कादंबऱ्या झाल्या. त्यातल्या काही गाजल्याही. पण तीही तोंडओळखच राहिली. तोंडापलिकडचे अवयव मराठी सारस्वतांना फ़ारसे झेपले नाहीत. कदाचित काही लेखक पुढे आलेही असतील. पण त्यांना पुरेसा मोठा प्लॅटफ़ॉर्म मिळाला नाही. त्यांच्या साहित्याला मोठा वाचकवर्ग मिळाला नाही. त्यांची दखल घेतली गेली नाही. मराठी साहित्य मृत्युंजय आणि विनोदाभोवतीच घुटमळत राहिलं. बाकीचे आले. आणि गेले.

ही परिस्थिती आता बदलेल. आताचे नवे लेखक अधिक आत्मविश्वासाने लिहीत आहेत. आणि त्यांना लाखो वाचकांपर्यंत पोहोचवणारे माध्यम आता त्यांच्या हाताशी आहे. ई माध्यम. ई पुस्तके. ब्लॉग, फ़ेसबुक, ट्विटर. कमी खर्चात, जगभरातील अनेक देशांत, लाखो वाचकांपर्यंत नेणारे साधन.

मराठी साहित्य सखोल आणि व्यापक व्हायचे असेल तर हे साधन बळकट व्हायला हवे. ते धंदेवाईक लोकांच्या हाती सिमीत राहू नये. त्याला मोठा पाया मिळावा. यासाठी तुमची मदत हवी. आपल्या ओळखीच्या जास्तीत जास्त साक्षर लोकांच्या ईमेल्स पत्ते आम्हाला पाठवा. किमान दहा तरी. त्या सर्वांना आम्ही अशीच जबरदस्त पुस्तके विनामूल्य पाठवू.

आपल्या ओळखीच्या किमान दहा मराठी साक्षर लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. esahity@gmail.com या पत्त्यावर. मराठी साहित्याच्या एका नव्या युगाचे केवळ साक्षीदार नाही तर भागीदार व्हा. अशा सर्व लोकांना आम्ही ई साहित्य प्रतिष्ठानच्या योजनांमध्ये सहभागी करून घेऊ. पावला-पावलाला त्यांचा सल्ला घेऊ. पुढच्या वाटचालीत ते आमचे पाठीराखे असतील. त्यांना प्रत्येक पुस्तक सर्वात आधी जाईल.

चला तर. काही घडवूया !

# लेखिकेची ओळख



नाव ;- सुषमा जाधव

शिक्षण : बी.ए. , डिप्लोमा इन जर्नालिझम

प्रकाशित साहित्य :- कविता संग्रह ..नांगरून ठेवलेलं शेत (ई पुस्तक आणि छापील पुस्तक)

कार्य : * सामाजिक कार्यकर्ती

* नगर विकास रचना महिला तक्रार समितीच्या एन जी ओ च्या प्रतिनिधी म्हणून नियुक्त सदस्य .

* कोकण सहकार विभाग महिला तक्रार समितीच्या एन जी ओ च्या प्रतिनिधी म्हणून नियुक्त सदस्य

* स्वयं सहायता महिला संघटनेच्या अध्यक्ष

* प्रगती बहुद्देशीय संस्था पुलगाव च्या सदस्य

पत्ता ;- ५/२०१ , गुरुशरणम को ऑप. हौसिंग सोसायटी ,

विश्राली नाका, रायगड बाजार रोड , जुने पनवेल,

जिल्हा - रायगड , पिन - ४१०२०६

* मो. नं. ८६५२५४७७६९